CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | बुधवार, २९ एप्रिल २०२६ । वर्ष ४ थे अंक ५२ । पाने १२ । किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

**विचारपुष्प**



जोपर्यंत आपण स्वत: कर्तव्यकठोर होऊन नियमांचे पालन करणार नाही तोपर्यंत इच्छित कार्य आपल्या हातून पूर्ण होणार नाही. जीवनात प्रगती करायची असेल तर स्वत:साठीही नियम बनवून त्याचे पालन केल्यास प्रगतीकडे जाण्यासाठी राजमाग मोकळा होतो.

- भारतरत्न नानाजी देशमुख
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान



सदाफुलीसह



# चुकीला माफी नाही!

## मुख्यमंत्र्यांनी लोकप्रतिनिधींना दिली तंबी

**सोलापूरकरांना सांगू इच्छितो...**

मी हात जोडून नमन करेन की, सोलापूर जिल्ह्यातल्या जनतेने भारतीय जनता पार्टीवर ऐतिहासिक विश्वास दाखवला आहे. खरोखरच सोलापूरकरांना मी सांगू इच्छितो, आम्ही तुमच्या कर्जात आहोत. हे कर्ज विकासाच्या माध्यमातून फेडण्याचा प्रयत्न करणार, तुमच्या प्रेमाच्या कर्जात तर जन्मभर राहू. पण तुम्ही विकासाकरता जे कर्ज दिले ते पाच वर्षात प्रामाणिकपणे प्रयत्न करून प्रत्येक व्यक्तीच्या आशा, आकांक्षा या पूर्ण करण्याचे काम करणार आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

**मी माझ्यामुळेच निवडून आलोय असा समज असेल तर...**

**लोक विकासाबरोबर व्यवहाराकडेही पाहतात**

**एखादयाला पदावरून काढावं लागलं तरी हरकत नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

सोलापूर महापालिका, जिल्हा परिषद, विविध पंचायत समित्यांच्या निवडणुकीत मतदारांनी भारतीय जनता पार्टीला भरभरुन मतदान केले. हा विजय विकासाचा विजय असून, ज्यांचा विकासावर विश्वास आहे अशांचा विजय आहे हे लक्षात ठेवा. भ्रष्ट कारभार वा चुकीच्या कामांना आपल्याकडे माफी नाही, अशी तंबी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर दौऱ्याप्रसंगी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींना दिला. दरम्यान, सोलापूर शहर-जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींवर या 'तंबी'चा कितपत असर पडेल? याविषयींच्या चर्चांना उधाण आले होते.

सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या घवघवीत यशामुळे सोलापूरकरांचे कृतज्ञता व्यक्त करण्याच्या अनुषंगाने ते सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते. सोलापूर शहरातील हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर त्यांच्या प्रमुख उपस्थितीत विजय संकल्प मेळावा घेण्यात आला. सोलापूरच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जे काही करता येईल ते-ते करु, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. दरम्यान, बार्शी येथील श्री भगवंत प्रकट दिनोत्सवनिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'श्रीं'चे मनोभावे दर्शन घेतले.

निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सांगतो की, माझ्यामुळे मी निवडून आलोय, असा समज असेल तर तो काढून टाका. कारण अशा समजमुळे आपला व्यवहार बदलत जातो, लोक जसं तुमच्या विकासाकडे पाहतात तसेच तुमच्या व्यवहाराकडे सुध्दा पाहतात; विकास कमी झाला तरी चालेल तुमच्या व्यवहार कसा आहे? हे महत्त्वाचे आहे. पारदर्शी आणि प्रामाणिकपणे काम झालं पाहिजे. कुठल्याही प्रकारचा भ्रष्टाचार खपवून घेतले जाणार नाही. याठिकाणी एखाद्याला पदावरून काढावं लागलं तरी हरकत नाही, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.

**(मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोलापूर दौऱ्यातील अन्य बातम्या पान ८ आणि ९ वर)**

# नद्या घेणार मोकळा श्वास!



## महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची स्थापना
## राज्यातील ५४ प्रदूषित नदी पट्ट्यांचा होणार कायापालट



◆ **मुंबई, २८ एप्रिल**

वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे श्वास कोंडलेल्या राज्यातील नद्यांचे आता खऱ्या अर्थाने पुनरुज्जीवन होणार आहे. केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र 'राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्यातील तब्बल ५४ प्रदूषित नदी पट्टे स्वच्छ करून नद्यांचे पर्यावरणीय आरोग्य सुधारण्यासाठी हे प्राधिकरण 'सर्वोच्च यंत्रणा' (अंब्रेला एजन्सी) म्हणून काम करणार आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२५ च्या अहवालानुसार, संपूर्ण देशात सर्वाधिक म्हणजेच ५४ प्रदूषित नदी पट्टे एकट्या महाराष्ट्र राज्यात आहेत. प्रक्रिया न केलेले सांडपाणी, औद्योगिक रसायने आणि घनकचरा यामुळे नद्या केवळ प्रदूषित झाल्या नसून, मानवी आरोग्य आणि जलचरांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही गंभीर स्थिती लक्षात घेता, १ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्राधिकरणाच्या स्थापनेवर शिक्कामोर्तब करण्यात आले होते.

**प्राधिकरणाची शक्तिशाली रचना**

या प्राधिकरणाचे मुख्यालय मुंबईत असेल आणि त्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्यभर असेल. राज्याचे मुख्यमंत्री या प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील, तर पर्यावरण मंत्री उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळतील. याशिवाय वित्त, जलसंपदा, उद्योग आणि ग्रामविकास यांसारख्या महत्त्वाच्या विभागांचे मंत्री याचे सदस्य असतील, ज्यामुळे विभागांमधील समन्वय अधिक सुलभ होईल. हे प्राधिकरण केवळ कागदावर मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देणार आहे.

**नदी मंच** : स्थानिक समुदाय आणि भागधारकांशी संवाद साधण्यासाठी 'नदी मंच' तयार केले जातील.

**डेटा आधारित देखरेख** : नद्यांच्या प्रदूषणाची रिअल-टाइम माहिती मिळवण्यासाठी विशेष डॅशबोर्ड तयार केला जाईल.

**अतिक्रमण निर्मूलन** : नदीकाठचे क्षेत्र निश्चित करून अतिक्रमणे रोखणे आणि सांडपाणी प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उभारणे हे प्राधिकरणाचे मुख्य काम असेल. तज्ज्ञांचा सहभाग आणि सचिवालय प्राधिकरणाला तांत्रिक मदत करण्यासाठी आयआयटी मुंबई, नीरी (नागपूर) आणि टेरी यांसारख्या नामांकित संस्था 'नोडल एजन्सी' म्हणून काम पाहतील. तसेच, दर तीन महिन्यांनी कार्यकारी समितीची बैठक होऊन प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला जाईल. राज्यातील नद्यांचे पावित्र्य आणि प्रवाह टिकवण्यासाठी उचललेले हे पाऊल भविष्यातील शाश्वत विकासासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. *(तभा वृत्तसेवा)*

**भक्कम आर्थिक तरतूद**



नदी पुनरुज्जीवनासाठी निधीची कमतरता भासू नये, यासाठी शासनाने 'मिश्र वित्त पुरवठा' धोरण स्वीकारले आहे. तातडीचा निधी म्हणून राज्य शासनातर्फे चालू आर्थिक वर्षासाठी सुरुवातीला १०० कोटी रुपये दिले जातील. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तब्बल २ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वाळू आणि गौण खनिज उत्खननातून मिळणाऱ्या महसुलातील १० टक्के हिस्सा दरवर्षी या प्राधिकरणाकडे वर्ग केला जाईल.

# 'व्हीएसआर' कंपनीला तीन महिन्यांत १४५ कोटी रुपये दिले?

**आमदार रोहित पवार यांचा पुन्हा गंभीर आरोप**

**मुंबई** : 'व्हीएसआर' विमान कंपनीला तीन महिन्यांत १४५ कोटी रुपये दिले आहेत. अपघाताच्या अगोदरच्या दिवशी १५.७२ कोटी रुपये. अपघाताच्या दिवशी ९.८१ कोटी रुपये आणि अपघाताच्या दुसऱ्या दिवशी १६.८६ कोटी रुपयांचे बिल काढण्यात आले. सर्वसाधारण महिन्याला दहा कोटी रुपयांचे बिल निघत असताना जानेवारी ते मार्च महिन्यांत अचानक इतकी मोठी रक्कम का देण्यात आली, असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस, आमदार रोहीत पवार यांनी उपस्थितीत केला आहे.

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा 'व्हीएसआर' कंपनीच्या विमान अपघातात मृत्यू झाला होता. या कंपनीला जानेवारी ते मार्च, या तीन महिन्यांत सुमारे १४५ कोटी रुपयांची बिले काढण्यात आली आहेत, याकडे पवार यांनी लक्ष वेधले आहे. महाराष्ट्र शासनाकडून २०२५ - २६ या आर्थिक वर्षात विमान कंपन्यांची २१० कोटी रुपयांहून अधिकची बिले काढली आहेत. एप्रिल २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत जवळपास ६४ कोटी रुपयांची बिले काढली गेली आहेत. म्हणजे दर महिन्याला सरासरी ८ कोटी रुपयांची बिले काढली आहेत. त्यानंतर जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांची अनुक्रमे ४२ कोटी रुपये, ३२ कोटी रुपये आणि ७१ कोटी रुपये, अशी एकूण तब्बल १४५ कोटी रुपयांहून अधिकची बिले काढण्यात आली आहेत. अजित पवार यांच्या अपघाताच्या अगोदरच्या दिवशी १५.७२ कोटी रुपयांची, अपघाताच्या दिवशी ९.८१ कोटी रुपयांची तर अपघाताच्या दुसऱ्या दिवशी १६.८६ कोटी रुपयांची बिले काढण्यात आली आहेत. सर्वसाधारण महिन्याला १० कोटी रुपयांची बिले निघतात. पण, जानेवारी ते मार्च महिन्यात अचानक इतकी मोठी रक्कम व्हीएसआरला का दिली गेली.




## खरीप हंगामात खतांचे लिंकिंग रोखण्यासाठी राज्यात 'उत्तर प्रदेश पॅटर्न'

**मुंबई** : खरीप हंगामात कोणत्याही खताचे अन्य खते, औषधांसोबत लिंकिंग (जोडणी) होणार नाही. त्यासाठी राज्यात उत्तर प्रदेश पॅटर्नची अंमलबजावणी केली जाईल, अशी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन हिताची घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली. कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या अन्य मागण्यांबाबतही सकारात्मक निर्णय झाल्यामुळे माफदा संघटनेने बंद मागे घेतल्याचे जाहीर केले. महाराष्ट्र फर्टीलायझर पेस्टीसाईडस् सीडस् डिलर्स असोशिएशनने (माफदा) आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवार, २७ एप्रिलपासून बेमुदत बंद पुकारला होता. कृषी विभागाने तातडीने दखल घेऊन मंगळवारी मंत्रालयात बैठकीचे आयोजन केले होते. कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला अधिकारी, माफदाचे पदाधिकारी उपस्थित होते. खतांच्या लिंकिंगचा प्रश्न अत्यंत जुना आणि जटील आहे. या लिंकिंगमुळे विक्रेते आणि शेतकऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी होते. अनेक वर्षांपासून हा प्रकार सुरू आहे. यंदाच्या खरिपात लिंकिंगचा प्रश्न सुटला पाहिजे. राज्याच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात लिंकिंग झाले नाही पाहिजे. यासाठी उत्तर प्रदेशच्या धर्तीवर खत कंपन्यांवर अनुदान नसलेली खते, औषधांची विक्री करण्यास बंदी घातली जाईल.



# परिषदेसाठी भाजपाने केले उमेदवार जाहीर

## यादीत संजय भेंडे, प्रज्ञा सातव यांचा समावेश



सुनील कर्जतकर | माधवी नाईक | संजय भेंडे | विवेक कोल्हे | प्रमोद जठार

◆ **मुंबई, २८ एप्रिल**

भारतीय जनता पक्ष (भाजपा)च्या केंद्रीय निवडणूक समितीने महाराष्ट्रात होणाऱ्या विधान परिषद द्वैवार्षिक निवडणुका २०२६ साठी उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. पक्षाच्या केंद्रीय कार्यालयातून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकानुसार, महाराष्ट्रासाठी पाच उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. यामध्ये सुनील विनायक कर्जतकर, सौ. माधवी नाईक, संजय नत्थुजी भेंडे, विवेक बिपीनदादा कोल्हे आणि प्रमोद शांताराम जठार यांचा समावेश आहे.

दरम्यान, विधान परिषदेत रिक्त झालेल्या जागेसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीसंदर्भातही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. काँग्रेसच्या सदस्य प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे ही जागा रिक्त झाली होती. त्यानंतर त्यांनी भाजपात प्रवेश केला. आता त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर भाजपानेही सातव यांनाच संधी दिली. भाजपाने जाहीर केलेल्या पाच नावांमध्ये माधवी नाईक यांचंही नाव असून ते अनेक वर्षांपासून भाजपा संघटनेत काम करतात. तर, संजय भेंडे भाजपाचे उपाध्यक्ष असून ते नागपूर भाजपाचे जिल्हाध्यक्ष राहिले आहेत. तसेच, प्रमोद जठार यांनाही भाजपाने संधी दिली असून जठार हे कोकणातील भाजपाचे ज्येष्ठ नेते आहेत. कोकणावर अन्याय होत असल्याची भावना भरुन काढण्याचा प्रयत्न भाजपाकडून करण्यात आला.

विवेक कोल्हे हे ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांचे नातू तर माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे पुत्र आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत आशुतोष काळे यांना राकाँने कोपरगावमधून संधी दिल्यानंतर भाजपाकडून कोल्हे यांना महायुतीचा धर्म पाळण्याचे आदेश दिले होते. *(तभा वृत्तसेवा)*

**या आमदारांचा कार्यकाळ संपणार**

उद्धव ठाकरे (शिवसेना उबाठा), नीलम गोऱ्हे (शिवसेना शिंदे), शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी शरद पवार), अमोल मिटकरी (राष्ट्रवादी अजित पवार), गोपीचंद पडळकर (भाजपा), रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजपा), राजेश राठोड (काँग्रेस), प्रवीण दटके (भाजपा), रमेश कराड (भाजपा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी मधुकर पवार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. २८ एप्रिल-**

शरदचंद्र पवार वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी मधुकर पवार यांची निवड करण्यात आली आहे.



प्राचार्य डॉ पवार हे छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज मध्ये मराठी विभाग प्रमुख महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून काम केले आहे. आता त्यांची शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी निवड करण्यात आले आहे. या निवडीबद्दल त्यांच्या संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक तानाजी माने, संस्थेचे संचालक ज्ञानेश्वर सपाटे, सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# नवीन मिळकती शोधण्याचे उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ३४ कर्मचाऱ्यांना दंड

**महापालिका उपायुक्त लोकरे यांची कारवाई**

**एकूण ३५ हजार रुपयांचा दंड**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

महापालिकेचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासन विविध उपाययोजना करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मालमत्ता कर विभागाकडून नवीन मिळकतींचा शोध घेण्याची मोहीम सुरू आहे. या कामासंदर्भातील उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या ३४ कर्मचाऱ्यांना एकूण ३५ हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे.

महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी ही कारवाई केली आहे. महापालिका मालमत्ता कर विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना दि.८ एप्रिल रोजीच्या आदेशान्वये नवीन मिळकतीचा शोध, अपार्टमेंट मधील शिल्लक फ्लॅट / गाळ्यांची दररोज किमान ५ मिळकतींची आकारणी करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. याअंतर्गत एप्रिल महिन्यात एकंदरीत नवीन मिळकतींचा शोध घेऊन आकारणी करावयाची आहे. याचेही उद्दिष्ट देण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर दि.२७ एप्रिलपर्यंतचा सर्व्हेक्षण व आकारणीचा एकत्रित अहवाल पाहता दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे सर्व्हेक्षण व आकारणीची कार्यवाही झालेली नसल्याचे दिसून आले आहे. नवीन मिळकतीचा शोध घेणे व आकारणी करण्याबाबत वारंवार सूचना, आदेश, निर्देश देण्यात आलेले आहेत. तरीही ३४ कर्मचाऱ्यांनी दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे काम केले नाही. या कर्मचाऱ्यांनी उद्दिष्ट पूर्ण केले नाही. ही बाब अत्यंत गंभीर व कार्यालयीन शिस्तीस बाधा पोहोचविणारी असल्याने त्यांना दंड करण्यात आला आहे. महापालिका प्रशासनाने दिलेल्या उद्दिष्टानुसार नवीन मिळकतीचा शोध घेऊन आकारणीची कार्यवाही न करणे, आदेशाचे पालन न करणे या कामकाजातील निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी संबंधित ४ कर निरीक्षक व ३० वसुली क्लार्क अशा एकूण ३४ जणांना कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आली.

तथापी त्यांच्या कामकाजामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. यामुळे या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६(२) (ड) च्या तरतुदीनुसार आर्थिक दंड करण्यात येत आहे. एप्रिल पेड इन मे वेतनातून हा दंड वसूल केला जाणार आहे.




## सोलापुरात ऑटो-टॅक्सी चालकांचा निषेध; सभासद शुल्क कमी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे आज धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा व मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळा अंतर्गत सभासद झालेल्या चालकांना ओळखपत्र वितरणाचा कार्यक्रम पार पडला. मात्र, शहरात सुमारे १७ हजार चालकांची संख्या असतानाही या उपक्रमाला अत्यंत अल्प प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

दरम्यान, या कल्याणकारी मंडळाच्या धोरणाविरोधात वाहतूक संघटना संयुक्त महासंघ यांच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. सभासद नोंदणीसाठी आकारण्यात येणारी ८०० रुपयांची फी अवास्तव असल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांनी तोंडावर काळ्या पट्ट्या बांधून प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर निदर्शने केली. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांनी सभासद शुल्क बांधकाम कामगारांप्रमाणे नाममात्र १ रुपया ठेवण्यात यावे, अशी मागणी केली. तसेच, चालकांच्या कल्याणासाठी शासनाने स्वतंत्र निधीची तरतूद करावी, असेही त्यांनी नमूद केले. या आंदोलनात महासंघाचे महासचिव प्रदीप शिंगे, जिल्हाध्यक्ष इरफान कल्याणी, इमरान शेख, तुफान शेख,यासीन मुल्ला,अफसर,सचिन, मजहर, यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# लोकमंगल बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त ५१ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

लोकमंगल बँकेच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त बँकेच्या प्रधान कार्यालयात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. रक्तदान शिबीराचे उदघाटन बँकेचे अध्यक्ष आमदार सुभाष देशमुख, हेडगेवार रक्तपेढीचे संचालक मिलिंद फडके, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर व नगरसेविका कलावती गदगे यांच्या हस्ते रक्तदान शिवीराचे उद्घाटन झाले.



रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी बँकेचे संचालक देवानंद चिलवंत, सौरभ अंबुरे, निलेश पटेल सतिश लामकाने, अशोक सापटनेकर, सिध्दार्थ सर्जे, नरेंद्र काटीकर,, प्रल्हाद कांबळे, जितेंद्र नाईक-लाड बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य सुरेश श्रीराम व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी बँकेचे अधिकारी सुदन सुरवसे, प्रशांत अंबुरे, राहुल कोल्हटकर, राहुल कुलकर्णी, धर्मराज मळगे, संजय चव्हाण, विनायक यारगल, चेतन ढेकळे, राजेंद्र देशमुख, पंकज यादव, ओंकार कंटीकर यांनी परिश्रम घेतले.

# उत्तरादी मठाच्या छत बांधकामास प्रारंभ

**रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते पूजन : भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती**

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

माध्व संप्रदायाचा महाराष्ट्रातील सर्वात मोठा उत्तरादी मठ आणि श्री बालाजी मंदिर सोलापुरात विजयपूर रस्त्यावर बांधण्यात येत आहे. या मठाच्या दुसऱ्या मजल्याच्या छत बांधकामास (काँक्रीट स्लॅब भरणी) मंगळवारी भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. यावेळी पं. राघवेंद्र आचार्य आद्य, राम तडवळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



विजयपूर रस्त्यावरील पाटील नगर येथे श्री श्री १००८ श्री सत्यात्मतीर्थ महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली १६ हजार ७०० चौ. फूट जागेत मे २०२४ पासून भव्य मठाचे आणि श्री बालाजी मंदिराचे बांधकाम सुरू आहे. मार्च २०२७ मध्ये हे बांधकाम पूर्ण होणार आहे. या मठाच्या तळमजल्यावर श्री बालाजी मंदिर निर्माण करण्यात येणार आहे. पहिल्या मजल्यावर भक्त निवासासाठी १० खोल्या आणि एक मोठे सभागृह तर दुसऱ्या मजल्यावर ७ हजार ५०० चौ. फुटांचे भव्य सभागृह बांधण्यात येणार आहे. याशिवाय मठामध्ये गोशाळा, वेद पाठशाळा तयार करण्यात येणार आहे. दुसऱ्या मजल्याच्या छत बांधकाम प्रारंभाप्रसंगी (काँक्रीट स्लॅब भरणी) पंडित अमित आचार्य पुजार यांनी पौरोहित्य केले. यावेळी पं. गोविंद गवई, परशुराम जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष आनंद खंडेलवाल, विश्व मध्व महापरिषदेचे सोलापूर शहराचे अध्यक्ष बी. जी. कुलकर्णी, निशिकांत खेडकर, डॉ. एस. डी. गोटे तसेच विश्व मध्व महापरिषदेचे संचालक, भाविक उपस्थित होते.

## क्रीडा

# सोलापूरचा धाराशिववर दणदणीत विजय

**महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन निमंत्रित क्रिकेट : कर्णधार संदेश गाडेचे द्विशतक, ईश्वर सहारणचे ८ बळी**


संदेश गाडे


ईश्वर सहारण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल -**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षांखालील मुलांच्या इन्व्हिटेशन टूर्नामेंटमध्ये सोलापूरच्या संघाने वर्चस्व गाजवत धाराशिव संघावर दणदणीत विजय नोंदवला. कर्णधार संदेश गाडे याने २१९ धावांची द्विशतकी खेळी साकारली. ईश्वर सहारणचे ८ बळी घेत त्याला साथ दिली. संदेशला सामनावीर पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

पुणे येथे झालेल्या या स्पर्धेत सोलापूर संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधार संदेश गाडेने मैदानाचा ताबा घेत उस्मानाबादच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. त्याने केवळ २३० चेंडूत २१९ धावा कुटत शानदार द्विशतक झळकावले. संदेशला ययाती देवकते (३१), श्रवण माळी (२७) आणि ऋग्वेद पाटील (२६) यांनी चांगली साथ दिली. यामुळे सोलापूरचा पहिला डाव ३५१ धावांवर संपला. उस्मानाबादकडून गोलंदाजीत हकानी हुसेनने ४, रवींद्रने ३ तर पृथ्वीराजने २ बळी घेतले.

प्रत्युत्तरात फलंदाजीसाठी उतरलेला. उस्मानाबादचा संघ सोलापूरच्या गोलंदाजीसमोर ढेपाळला. त्यांचा पहिला डाव केवळ १५७ धावांत आटोपला. सोलापूरच्या ईश्वर सहारनने अवघ्या २९ धावांत ५ बळी घेत उस्मानाबादचे कंबरडे मोडले. त्याला श्रवण माळीने २ बळी घेऊन उत्तम साथ दिली.

**फॉलोऑन व सोलापूरचा विजय**

पहिल्या डावात मोठी आघाडी मिळाल्यामुळे सोलापूरने उस्मानाबादला फॉलोऑन दिला. दुसऱ्या डावातही सोलापूरच्या गोलंदाजांनी आपली पकड कायम ठेवली. दुसऱ्या डावात उस्मानाबादची स्थिती ८ बाद १६७ धावा अशी असताना सामन्याची वेळ संपली. नियमानुसार, पहिल्या डावातील मोठ्या आघाडीच्या जोरावर सोलापूर संघाला विजयी घोषित करण्यात आले. दुसऱ्या डावात सोलापूरकडून ईश्वर सहारन, श्रवण माळी यांनी प्रत्येकी ३, तर सार्थक कन्नाने २ बळी घेतले.

# सोलापूरच्या पृथ्वीराज कणसे, वाल्मिकीची शानदार कामगिरी

**महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा**


अनुज वाल्मिकी


पृथ्वीराज कणसे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १६ वर्षांखालील मुलांच्या निमंत्रित साखळी क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या खेळाडूंनी मैदान गाजवले आहे. 'साऊथ झोन' संघाकडून खेळताना कर्णधार पृथ्वीराज कणसे आणि गोलंदाज अनुज वाल्मिकी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनने खेळाडूंसाठी सतत सराव सामने आयोजित केल्यामुळे या मुलांच्या कामगिरीत सुधारणा झाली आहे. या स्पर्धेत अजूनही दोन सामने शिल्लक असून, सोलापूरच्या या सुपुत्रांकडून अशाच मोठ्या कामगिरीची अपेक्षा क्रीडा प्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

**पृथ्वीराजचा ३ सामन्यांत ३६० धावा**

पृथ्वीराज याने फलंदाजीमध्ये सातत्य राखत प्रतिस्पर्धी संघांच्या गोलंदाजांचा समाचार घेतला आहे. त्याने आतापर्यंत खेळलेल्या ३ सामन्यांतील ५ डावांमध्ये २ शतके आणि १ अर्धशतक झळकावत एकूण ३६० धावा कुटल्या आहेत. त्याने मेट्रो संघाविरुद्ध १३० चेंडूत १२५ धावा (शतक), सेंट्रल झोनविरुद्ध १७० चेंडूत १६७ धावा, सी.एन.ए. संघाविरुद्ध ११५ चेंडूत ५७ धावा (अर्धशतक) केल्या.

**अनुजचे ३ सामन्यांत २२ बळी**

गोलंदाजीमध्ये अनुजने आपल्या फिरकीची जादू दाखवत प्रतिस्पर्धी संघांचे कंबरडे मोडले आहे. त्याने ३ सामन्यांच्या ५ डावांत तब्बल २२ बळी घेण्याचा पराक्रम केला आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक सामन्यात त्याने किमान ५ बळी घेण्याची किमया साधली आहे. त्याने मेट्रो संघाविरुद्ध पहिल्या डावात ७ आणि दुसऱ्या डावात ३ बळी (एकाच सामन्यात १० बळी घेण्याचा विक्रम), सेंट्रल झोनविरुद्ध पहिल्या डावात ५ आणि दुसऱ्या डावात २ बळी, सी.एन.ए. संघाविरुद्ध ९७ धावांच्या बदल्यात ५ बळी.



# युनिक स्कूलमध्ये क्रीडा उपक्रमाचा समारोप

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित युनिक इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित केलेला क्रीडा उपक्रमाचा समारोप झाला. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमप्रसंगी आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक जलतरणपटू ओम अवस्थी, प्रा. डॉ. एम. बी पाटील यांच्या हस्ते क्रिकेट, कबड्डी, तायक्कांदो, खो-खो, ॲथलेटिक्समध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवलेल्या खेळाडूंना बक्षीस देण्यात आले. संस्थापक राजशेखर शिवदारे व सर्व पदाधिकारी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले. शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी व पार्थ तिवारी, मुख्याध्यापिका पूजा बाजपेयी, क्रीडाशिक्षक अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला.

**सत्कारमूर्ती खेळाडू :** श्रीराज नाईकनवरे (फुटबॉल), संगमेश मुस्तापुरे ,हर्षदा पाटील क्रिकेटमध्ये, ॲथलेटिक्समध्ये समर्थ लोणार, भक्ती देशमुख, कबड्डी मध्ये विक्रांत चव्हाण, आदिती पवार, खो-खो मध्ये अनंत देवकते, प्रांजल उप्पिन, तायक्कांदो मध्ये सचिन बिद्री ,मानसी बिराजदार, या विद्यार्थ्यांना मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच यावर्षी राबविण्यात आलेल्या उपक्रमात सर्वोत्कृष्ट क्रीडा प्रशिक्षक म्हणून विशाल बिराजदार सर यांनाही मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले .



## सांगोल्यात उद्या जिल्हा अजिंक्यपद कराटे स्पर्धा

**सांगोला, दि.२८ एप्रिल-**

स्पोर्टस कराटे डो असोसिएशन सोलापूर यांच्यावतीने व कराटे डू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि कराटे इंडिया ऑर्गनायझेशन यांच्या मान्यतेने ३० एप्रिल रोजी सांगोला शहरातील तालुका क्रीडा संकुल येथे कॅडेट ज्युनियर व सब ज्युनिअर जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा होईल.

या स्पर्धा वजनी गटाप्रमाणे काता व कुमिते या दोन्ही गटात होतील. यातून नाशिक येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद कराटे स्पर्धेत करिता संघ निवडण्यात येतील. जिल्ह्यातील मान्यताप्राप्त संघटनांना व विद्यार्थ्यांना ९९७०६०६९०९ या मोबाईलवर संपर्क साधावा.

**जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज मिळेनात**

# क्रीडा पुरस्कारांची तारीख पे तारीख

**सोलापूर, दि. २८ एप्रिल -**

गुणवंत खेळाडू व प्रशिक्षक आणि युवा संस्था व युवकांसाठी दिला जाणारा जिल्हा क्रीडा व युवा पुरस्काराचा सोहळा लांबणीवर पडला आहे. अपुऱ्या अर्जांमुळे युवा पुरस्कारासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे, तर क्रीडा पुरस्कारांच्या वितरणासाठी आता थेट १५ ऑगस्टपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार असल्याने क्रीडाप्रेमींमध्ये नाराजी आहे.

**३१ मेपर्यंत संधी**

जिल्हा युवा पुरस्कारासाठी यंदा अपेक्षित प्रमाणात अर्ज प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे १ मे रोजी होणारे पुरस्कार वितरण पुढे ढकलण्यात आले आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी माहिती दिली की, आता इच्छुक पात्र युवक आणि युवा संस्थांना ३१ मे २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करता येतील. १८ ते ३५ वर्षे योगटातीलपात्र युवकास १० हजार रुपये आणि युवा संस्थेस ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. युवक क्षेत्रातील कामगिरी आणि संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. ज्या युवक व युवा संस्थांनी अद्याप अर्ज केलेले नाहीत, त्यांनी २०२५-२६ या वर्षातील आपल्या कामगिरीचा अहवाल विहित नमुन्यात जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथे सादर करावा.

**क्रीडा पुरस्कार १५ ऑगस्टला**

दुसरीकडे, बहुप्रतिक्षित जिल्हा क्रीडा पुरस्कार देखील लांबणीवर पडले आहेत. वास्तविक, २६ जानेवारी २०२६ रोजी हे पुरस्कार जाहीर होणे अपेक्षित होते, परंतु आचारसंहितेमुळे ते रखडले. मात्र प्रशासनाने आता हा सोहळा १५ ऑगस्ट २०२६ रोजी करण्याचे निश्चित केले आहे. वारंवार पुरस्कार लांबणीवर पडत असल्याने खेळाडू व प्रशिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.




# समाज कल्याण केंद्र लॉन टेनिस क्लबचा चौकार

**पी.पी. क्लब टेनिस प्रीमियर लीग स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल -**

पुंडलिक पाटील क्लबच्या टेनिस प्रीमियर लीग स्पर्धेत येथील समाज कल्याण केंद्र लॉन टेनिस क्लबच्या चौघांनी आपल्या कौशल्याच्या जोरावर अजिंक्यपदे पटकाविली. दोघांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. शौर्य बेंद्रे, रिषिकेश चव्हाण, यशवंतराजे पवार व रुद्रप्रताप चव्हाण यांनी अनुक्रमे १०, १२, १४ आणि १६ वर्षाखालील अशा विविध वयोगटांत ही कामगिरी केली.

समाज कल्याण केंद्र क्लबचे संगमनाथ नागोजी तसेच मुख्य प्रशिक्षक सुधीर सालगुडे आणि पूजा सालगुडे यांनी सर्व विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंचे विशेष कौतुक केले.

**अंतिम निकाल :** १० वर्षाखालील: शौर्य बेंद्रे विजयी विरुद्ध अविनाश बाबलादी ६-६ अशा बरोबरीनंतर टायब्रेकरमध्ये ७-०. १२ वर्षाखालील : रिषिकेश चव्हाण विजयी विरुद्ध अयान बोल्ली ६-४. १४ वर्षाखालील : यशवंतराजे पवार विजयी विरुद्ध वीर गायकवाड ६-१. १६ वर्षाखालील मुले: रुद्रप्रताप चव्हाण विजयी विरुद्ध अमन लदाफ ६-३.



मराठी भाषेची लिपी रोमन असल्याचे विधान करून खासदार संजय राऊत यांनी मराठी भाषेचा आणि अस्मितेचा अपमान केला आहे. ज्यांना साधी देवनागरी लिपी माहीत नाही, त्यांनी मराठीच्या नावावर गळा काढणे म्हणजे 'ढोंगीपणा' होय.
- **नवनाथ बन**, भाजपा प्रवक्ते

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
बुधवार, २९ एप्रिल २०२६ 



पडळकर हे खूप महान नेते आहेत. ते थेट डोनाल्ड ट्रम्प यांच्या लेव्हलचे नेते आहेत. आम्ही भारतात आणि महाराष्ट्रात राहणारे छोटे लोक आहोत. यामुळे त्यांच्या लेव्हलला जाऊन आम्ही बोलू शकत नाही.
**-विश्वजित कदम**, काँग्रेस आमदार



आर्मेनियाचे लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल एडवर्ड अर्यान भारताच्या भेटीवर आले आहेत. त्यांचे स्वागत करताना सीडीएस अनिल चौहान

# 'ॲक्ट ईस्ट, ॲक्ट फास्ट'साठी कटिबद्ध



## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**गंगटोक, २८ एप्रिल**

आमचे सरकार केवळ आपल्या ॲक्ट ईस्ट धोरणाशीच कटिबद्ध नाही, तर ईशान्येकडील आठ राज्यांसाठी 'ॲक्ट फास्ट' करण्यासाठीही दृढनिश्चयी आहे. ईशान्येतील ही राज्ये भारताची अष्टलक्ष्मी आहेत. ही राज्ये समृद्धी, संपत्ती आणि शुभत्वाच्या बहुआयामी स्वरूपाचे प्रतिनिधित्व करतात, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी सांगितले.

पर्यटन हा सिक्कीमच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. आपल्या सरकारचा भर राज्याची अर्थव्यवस्था सुधारण्यावर असून, त्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढेल, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

सिक्कीमची पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. यामध्ये पश्चिम बंगालमधील बागडोरा येथून एक द्रुतगती मार्ग उभारणे आणि पर्यटकांचा ओघ वाढवण्यासाठी गंगटोक येथे रिंग रोड बांधण्याच समावेश आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सिक्कीमच्या राज्यस्थापनेच्या ५० वर्षांच्या वर्षभर चाललेल्या सोहळ्यांच्या सांगतेनिमित्त येथील पालजोर स्टेडियमवर आयोजित एका भव्य कार्यक्रमात दिलेल्या ३५ मिनिटांच्या भाषणात सांगितले.

राज्यासाटी रोप-वे आणि स्काय-वे प्रकल्प विचाराधीन आहेत, तर पर्यटकांचा ओघ वाढावा या उद्देशाने नाथू-ला येथे एक द्रुतगतीमार्ग उभारला जाईल. सिक्कीमसह ईशान्य भारत ही भारताची अष्टलक्ष्मी आहे. सरकार 'ॲक्ट ईस्ट, ॲक्ट फास्ट' या संकल्पाने कटिबद्ध आहे, असे मोदी म्हणाले.

सिक्कीममध्ये निसर्ग आणि संस्कृती जिवंत होतात. येथील लोक निसर्गसंवर्धनाचे खरे ब्रॅण्ड ॲम्बसेडर्स आहेत, हे राज्यातील रस्त्यांवरील स्वच्छता आणि येथील हवेची शुद्धता दर्शवते, असे राज्याच्या जैवविविधतेवर भाष्य करताना मोदी म्हणाले. सिक्कीमसह ईशान्य भारत हा सेंद्रिय शेतीसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून भविष्यवेधी आणि शाश्वत विकासाचे केंद्र बनण्याच्या मार्गावर आहे, असा ठाम दावा मोदींनी केला. (वृत्तसंस्था)

### शांतता, आध्यात्मिकता, आरोग्याचे माहेरघर

**शांतता, आध्यात्मिकता आणि आरोग्याचे माहेरघर असल्याबद्दल नरेंद्र मोदी यांनी सिक्कीमची मुक्तकंठाने प्रशंसा केली आणि पर्यटकांना या हिमालयीन राज्याला मोठ्या संख्येने भेट देण्याचे आवाहन केले. श्रद्धा आणि राजकीय निष्ठा यांच्या आधारे देशाच्या विभाजनाचे प्रयत्न होत असताना सिक्कीम हे 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चे प्रतिबिंब दर्शवते, असे मोदी म्हणाले.**

### सिक्कीममध्ये 'इको-वेलनेस' पर्यटनाला वाव

**सिक्कीममध्ये इको-वेलनेस पर्यटन क्षेत्राला प्रचंड वाव आहे आणि सरकार त्यास चालना देत आहे. तब्बल हजार होमस्टे उभारले जात आहेत तसेच साहसी पर्यटनाच्या पायाभूत सुविधांनाही बळ मिळत आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.**

# पाकिस्तानचा अफगाणिस्तानवर क्षेपणास्त्र हल्ला; सात ठार

**काबुल, २८ एप्रिल**

अफगाणिस्तानच्या पूर्वेकडील कुनार प्रांतात सोमवारी झालेल्या हल्ल्यांमध्ये सात लोकांचा मृत्यू झाला, तर ७५ हून अधिक लोक जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. जखमींमध्ये विद्यापीठाचे विद्यार्थी, मुले आणि सामान्य नागरिक यांचा समावेश आहे.

असदाबादमध्ये घरांसोबतच सैयद जमालुद्दीन अफगाणी विद्यापीठालाही लक्ष्य करण्यात आले, असे स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले. हे हल्ले पाकिस्तानकडून करण्यात आल्याचा आरोप तालिबान सरकारचे उपप्रवक्ते हमदुल्लाह फितरत यांनी केला. सोमवारी दुपारी २ वाजता सुरू झालेल्या या हल्ल्यांमध्ये मोर्टार आणि क्षेपणास्त्र डागण्यात आले, असे त्यांचे म्हणणे आहे. दुसरीकडे, पाकिस्तानने हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. विद्यापीठ आणि निवासी भागांना लक्ष्य केल्याच्या बातम्या पूर्णपणे चुकीच्या असल्याचे पाकिस्तानच्या माहिती मंत्रालयाचे म्हणणे आहे. यापूर्वी रविवारी अफगाणिस्तानच्या कंदाहार प्रांतात पाकिस्तानसोबतच्या सीमेवर पुन्हा हिंसक चकमकीची घटना घडली होती. स्पिन बोल्डक परिसरात रात्रीच्या वेळी दोन्ही बाजूंनी गोळीबार झाल्याचा दावा खामा प्रेसने सूत्रांच्या हवाल्याने केला. यात पाकिस्तानचे सहा सैनिक मारले गेले. एका सैनिकाला ओलीस ठेवून नेण्यात आल्याचेही सांगण्यात आले. मध्यरात्री चालवलेल्या या ऑपरेशनमध्ये तालिबानी सैनिक पाकिस्तानी सैनिकांची शस्त्रेही घेऊन गेले होते. (वृत्तसंस्था)

# 'डिजिटल अरेस्ट'साठी वापरली जाणारी ९४०० व्हॉटस्ॲप खाती बंद

## महान्यायवादी आर. वेंकटरामणींची माहिती

**नवी दिल्ली, २८ एप्रिल**

भारतामध्ये डिजिटल अरेस्ट घोटाळ्यांशी संबंधित जानेवारी २०२६ पासून १२ आठवड्यांच्या कालावधीत ९,४०० हून अधिक खात्यांवर बंदी घालण्यात आली आहे. सरकारी यंत्रणांच्या समन्वयाने राबवण्यात आलेल्या एका विशेष मोहिमेचा हा भाग होता, असे व्हॉट्सॲपचे म्हणणे महान्यायवादी आर. वेंकटरामणी यांनी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयासमोर सादर केले.

डिजिटल अरेस्ट वाढत्या प्रकरणांनंतर सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेत सुनावणी सुरू केली आहे. व्हॉट्सॲपच्या तपासात या घोटाळ्यांच्या कार्यपद्धतीबद्दल महत्त्वाची माहिती समोर आली आहे. भारतीय युजर्सना लक्ष्य करणारी बहुतेक खाती आग्नेय आशियातील, विशेषतः कंबोडियातील स्कॅम सेंटर्समधून चालवली जात असल्याचे निष्पन्न झाले आहे. हे फसवणूक करणारे दिल्ली पोलिस, मुंबई मुख्यालय, सीबीआय आणि एटीएस विभाग यांसारख्या नावांचा वापर करत होते तसेच, अधिकृत वाटावे यासाठी प्रोफाइल पिक्चर म्हणून सरकारी यंत्रणांचे लोगो वापरून लोकांवर दबाव निर्माण करत होते, असे आर. वेंकटरामणी यांनी न्यायालयास सांगितले.

डिजिटल अरेस्टसारख्या सायबर गुन्हे रोखण्यासाठी मेटा कंपनीच्या मालकीच्या व्हॉट्सॲपने काही उपाययोजना केल्या आहेत. बनावट ओळख शोधण्यासाठी लोगोची पडताळणी करणारी यंत्रणा सुरू करण्यात आली आहे. यामध्ये खात्यांच्या नावांची नोंद ठेवणे, घोटाळ्यांचे बदलणारे स्वरूप ओळखण्यासाठी लार्ज लँग्वेज मॉडेल प्रशिक्षित करणे, जुन्या गुन्हेगारांना लवकर पकडण्यासाठी संशयास्पद खात्यांचा डेटाबेस तयार केला आहे, असे याबाबत न्यायालयात माहिती देताना सांगितले. (वृत्तसंस्था)

### व्हॉट्सॲपने केली कारवाई

**केवळ वैयक्तिक तक्रारींवर कारवाई न करता तसेच भारत सरकारच्या यंत्रणांकडून मिळणाऱ्या माहितीला केवळ एक अहवाल न मानता त्या माहितीचा वापर करून गुन्हेगारांचे संपूर्ण नेटवर्क शोधून ते नष्ट करतो. सरकारी यंत्रणांनी सुमारे ३,८०० संशयास्पद खात्यांची माहिती दिली होती, मात्र व्हॉट्सॲपने स्वतःच्या अंतर्गत तपास यंत्रणेद्वारे त्याहून कितीतरी अधिक खात्यांवर कारवाई केली.**

# अज्ञात हल्लेखोरांमुळे 'तोयबा'च दहशतीत

## हाफीजचा निकटवर्तीय शेख आफ्रिदीला उडवले

**लाहोर, २८ एप्रिल**

अज्ञात हल्लेखोरांमुळे पाकिस्तानातील दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाच प्रचंड दहशतीत आली आहे. या संघटनेचा प्रमुख आणि मुंबई हल्ल्याचा सूत्रधार हाफीज सईदचा निकटवर्तीयाला अज्ञात हल्लेखोरांनी पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा येथे गोळ्या घालून ठार केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथून २५० किमी अंतरावरील खैबर प्रांतातील लांडी कोटाल येथे रविवारी त्याची हत्या करण्यात आली. अज्ञात सशस्त्र हल्लेखोरांनी आफ्रिदीवर अंदाधुंद गोळीबार केला. यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. या हल्ल्याची जबाबदारी कोणत्याही गटाने स्वीकारली नाही, अशी माहिती एका सूत्राने वृत्तसंस्थेला दिली.


प्रतिबंधित लष्कर-ए-तोयबाच्या प्रादेशिक रचनेत आफ्रिदी महत्त्वाचा होता. खैबर पख्तुनख्वामध्ये तोयबाच्या भरतीमध्ये आणि कारवायांच्या समन्वयामध्येही त्याने भूमिका बजावल्याचे वृत्त आहे. त्याच्या हत्येस जबाबदार असलेल्यांना पकडण्यासाठी स्थानिक प्रशासनाने तपास सुरू केला आहे.

आफ्रिदी हा सुप्रसिद्ध धार्मिक विद्वान होता. तो खैबरमधील झाखाखेल जमातीचा सदस्य होता आणि अहल-ए-हदीस विचारसरणीच्या प्रमुख विद्वानांमध्ये त्याची गणना केली जात असे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### १५ मे रोजी प्रदर्शित होणार 'पती पत्नी और वो २'

**मुंबई** : आयुष्मान खुराना यांचा नवीन कॉमेडी चित्रपट 'पती पत्नी और वो २'१५ मे रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात त्यांच्यासोबत सारा अली खान, रकुल प्रीत सिंग आणि वामिका गब्बी मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन मुदस्सर अजीज यांनी केले आहे. अलीकडेच चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला होता, त्यानंतर त्याचे एक गाणेही समोर आले. या चित्रपटाचे जगभरातील प्रदर्शनाचे हक्क झी स्टुडिओने सुमारे ३५ कोटी रुपयांना विकत घेतले आहेत. यापैकी भारतात प्रदर्शनाचे हक्क २७ कोटी रुपयांना आणि विदेशात प्रदर्शनाचे हक्क आठ कोटी रुपयांना निश्चित झाले आहेत. हा चित्रपट २०१९ मध्ये आलेल्या 'पती पत्नी और वो' या फ्रँचायझीचा दुसरा भाग आहे.




### गाणे पाहून रडला आमिर

**मुंबई** : आमिर खानच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये तयार झालेला 'एक दिन' हा चित्रपट १ मे रोजी प्रदर्शित होत आहे. रविवारी मुंबईत चित्रपटाचा म्युझिकल इव्हेंट होता. या कार्यक्रमामध्ये आमिर खानने अभिनेत्री साई पल्लवी आणि मुलगा जुनैद खानसोबत बसून चित्रपट पाहिला. यावेळी अभिनेता खूप भावूक झाला. एका दृश्यात गाणे पाहून आमिर रडला. थोड्या वेळाने त्यांनी चित्रपटाचे गाणेही गुणगुणले. चित्रपट 'एक दिन'मधून दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. मन्सूर खान आणि आमिर खान यांच्या निर्मितीखाली बनलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन सुनील पांडे यांनी केले आहे. हा चित्रपट हिंदीसह तेलुगू आणि तमिळ भाषेत प्रदर्शित होणार आहे.



### रिहाना पोहोचली मुकेश अंबानींच्या घरी

**मुंबई** : पॉप स्टार रिहाना तिच्या 'फेंटी ब्युटी' या मेकअप ब्रँडच्या भारतातील लॉन्चसाठी सध्या मुंबईत आहे. यावेळी ती मुकेश अंबानींच्या घरीही गेली. अंबानी कुटुंबाने रिहानाचे स्वागत अगदी पारंपरिक पद्धतीने केले. रिहानाने कुटुंबासोबत दुपारचे जेवण केले आणि घरातील सदस्यांसोबत नाचतानाही दिसली. रिहानाचे स्वागत ढोल-ताशांच्या गजरात आणि फुलांनी केले. यावेळी रिहानाने पारंपरिक संगीतावर नृत्यही केले. तिने मजेत अंबानी कुटुंबातील सदस्यांवर फुलेही उधळली. रिहाना आणि अंबानी कुटुंब यांच्यातील मैत्री खूप जुनी आहे. यापूर्वी मार्च २०२४ मध्ये त्या अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग फंक्शनसाठी जामनगरला आली होती.



# भारताचा रशियात युरिया प्रकल्प

## विस्कळीत खतपुरवठ्यावर तोडगा

**नवी दिल्ली, २८ एप्रिल**

इराण-अमेरिका, इस्रायल युद्धामुळे विस्कळीत झालेल्या खतांच्या पुरवठ्यावर भारताने युद्धपातळीवर तोडगा काढला. भारताने रशियासोबतच्या २० हजार कोटी रुपयांच्या संयुक्त युरिया प्रकल्पाची वेगाने उभारणी सुरू केली आहे. हा प्रकल्प येत्या दोन वर्षांत कार्यान्वित होण्याची शक्यता असून, भारताची खतांसाठीची परदेशावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे.

भारताच्या तीन प्रमुख कंपन्या आणि रशियाची युरालकेम यांच्या संयुक्त विद्यमाने रशियातील समारा येथील तोग्लियात्ती येथे हा प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पाची वार्षिक उत्पादन क्षमता २० लाख टन इतकी असेल, अशी माहिती भारताच्या खत मंत्रालयांतर्गत असलेल्या इंडियन पोटॅश लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक पी. एस. गेहलोत यांनी दिली.

भारतीय शेती प्रामुख्याने नायट्रोजनयुक्त युरियावर अवलंबून आहे. सध्या अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे युरियाचा तुटवडा निर्माण झाला आहे. भारत दरवर्षी सुमारे ३०० लाख मेट्रिक टन युरियाचे उत्पादन करतो, तर आपली गरज ४०० लाख मेट्रिक टन आहे. ही तूट भरून काढण्यासाठी भारत ७१ टक्के युरिया मध्य पूर्वेतील देशांकडून आयात करतो. मात्र, हॉर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी झाल्यामुळे गॅस आणि खतांच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या भारत भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत या संदर्भात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या. आता रशियातील प्रकल्पासाठी इंडियन पोटॅश लिमिटेड, राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड आणि नॅशनल फर्टिलायझर्स लिमिटेड या तीन सरकारी कंपन्या मिळून १०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करीत आहेत. (वृत्तसंस्था)

### युरियाची प्रचंड मागणी

- **२०२५ मध्ये भारताचा युरिया वापर ३८७ लाख मेट्रिक टन इतका होता.**
- **भारताने ३०६ लाख मेट्रिक टन उत्पादन केले, तर ८१ लाख मेट्रिक टन युरिया आयात करावा लागला.**
- **२०२५ मध्ये भारताने २.३ अब्ज डॉलर्सचा युरिया आयात केला.**
- **२०२६ मध्ये सरकारने हॉर्मुझची सामुद्रधुनी टाळून रशिया, अल्जेरिया, नायजेरिया आणि ओमानमधून २५ लाख टन युरिया आयात करण्यास मंजुरी दिली आहे. याचा दर ९३५ ते ९५९ डॉलर्स प्रति टन इतका आहे.**

# मध्यप्रदेशात १५० वर्षांनंतर जंगली म्हशींचे पुनरागमन



**परिसंस्थेसाठी नवा टप्पा**

**बालाघाट, २८ एप्रिल**

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी मंगळवारी आसामच्या काझीरंगा राष्ट्रीय उद्यानातून आणलेल्या चार जंगली म्हशींना कान्हा व्याघ्र प्रकल्पात सोडले. नामशेष मानल्या गेलेल्या या प्रजातीचे १५० वर्षांनंतर राज्यात पुनरागमन झाले आहे.

मध्य प्रदेशातील वन्यजीव आणि परिसंस्थेसाठी हा एक अतिशय खास दिवस आहे. या निर्णयामुळे राज्यातील जंगल समृद्ध होईल आणि पर्यटनावर सकारात्मक परिणाम होईल, असे यादव म्हणाले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जंगली म्हशींची संख्या पुनरुज्जीवित करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, मध्य प्रदेश आसाममधून प्रत्येकी ५०० किलो वजनाचे ५० मोठे प्राणी आणत आहे. ईशान्येकडील राज्यातील काझीरंगा राष्ट्रीय उद्यानातून खास तयार केलेल्या वाहनांमधून या चार म्हशींना यापैकी तीन मादी आहेत यांना मध्य प्रदेशात आणण्यात आले. मुख्यमंत्री यादव यांनी बालाघाट जिल्ह्यातील कान्हा व्याघ्र प्रकल्पाच्या सुपखर-तोपला परिसरात त्यांना सोडले. (वृत्तसंस्था)

### एक गौरवशाली वन्यजीव इतिहास

**आज आपले राज्य चित्ता आणि बिबट्यांचे राज्य आहे. हे राज्य आता गिधाडांचे राज्यही बनले आहे,'' असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मगरी, घडियाळ आणि लांडगेही पुरेशा संख्येत आढळतात, असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, मध्य प्रदेशला एक गौरवशाली वन्यजीव इतिहास आहे.**

# दहशतवादाशी लढताना दुटप्पीपणा नको

## राजनाथसिंह यांची रोखठोक भूमिका

**नवी दिल्ली, २८ एप्रिल**

'राज्य पुरस्कृत'सीमापार दहशतवादाकडे शांघाय सहकार्य संघटनेने (एससीओ) दुर्लक्ष करता कामा नये. कारण, या संकटाचा सामना करताना कोणत्याही प्रकारच्या दुटप्पीपणाला थारा नाही, असे संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी मंगळवारी स्पष्ट केले. पाकिस्तानकडून विविध दहशतवादी गटांनी दिल्या जाणाऱ्या पाठिंब्याचा एक स्पष्ट संदर्भ यामागे होता. राजनाथसिंह शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेसाठी किर्गिस्तानच्या दौऱ्यावर आहेत.

दहशतवादाची केंद्रे आता यापुढे न्यायोचित शिक्षेपासून मुक्त राहणार नाहीत, असा दृढ निर्धार भारताने 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान दाखवून दिला, असे राजनाथसिंह यांनी किर्गिस्तानातील बिश्केक येथे आयोजित एससीओ परिषदेला संबोधित करताना सांगितले.

राज्य प्रायोजित सीमापार दहशतवादाकडे आपण दुर्लक्ष करता कामा नये. कारण, हा दहशतवाद एखाद्या राष्ट्र-राज्याच्या सार्वभौमत्वावरच हल्ला करतो, असे राजनाथसिंह म्हणाले. येथे दुटप्पीपणाला स्थान नाही. दहशतवाद्यांना चिथावणी देणाऱ्या, त्यांना आश्रय देणाऱ्या आणि सुरक्षित ठिकाणे उपलब्ध करून देणाऱ्यांविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यास एससीओने मागे-पुढे बघू नये, असे सिंह म्हणाले.



संरक्षणमंत्री राजनाथसिंह किर्गिस्तानच्या दौऱ्यावर आहेत. मंगळवारी त्यांनी बिश्केक शहरातील विजय चौकात हुतात्म्यांना श्रद्धांजली दिली

दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी एकत्रित जागतिक प्रयत्न आवश्यक आहेत, असे राजनाथसिंह यांनी जोरकसपणे सांगितले.

आपल्याला अतिरेकीपणा, मूलतत्त्ववाद आणि दहशतवाद यांच्या रूपाने एका वाढत्या आव्हानाचाही सामना करावा लागत आहे. नव्याने आकारास येत असलेल्या जागतिक व्यवस्थेपैकी दहशतवाद हा सर्वांत गंभीर धोका बनला आहे. या पृष्ठभूमीवर आपल्या सामायिक मूल्यांवर आधारित एक संघटना एससीओचा उदय झाला. दहशतवादाविरुद्धच्या सामायिक लढ्यात एससीओने अशा कृत्यांचा निषेध केला, असे राजनाथसिंह म्हणाले. (वृत्तसंस्था)

### एकपक्षीय धोरणांचे वाढते प्रमाण

**राजनाथसिंह यांनी सध्याच्या भू-राजकीय उलथापालथींचाही उल्लेख केला. आज जग वाढत्या एकपक्षीय धोरणांचा आणि संघर्षांच्या रूपाने एक कठोर वास्तवाला सामोरे जात आहे. मागील काही वर्षांत घडलेल्या संघर्षांच्या मालिकेत चिंताजनक वारंवारतेने मौल्यवान जीव आणि मालमत्तांची हानी झाली आहे. संरक्षण आणि सुरक्षेची जबाबदारी सांभाळणारे घटक म्हणून ही परिस्थिती हाताळण्यासाठी आत्मपरीक्षण करण्याची आणि प्रभावी उपाययोजना करण्याची हीच योग्य वेळ आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.**

# व्हाईट हाऊसवर गोळीबार करणाऱ्यावर गुन्हा

**वॉशिंग्टन, २८ एप्रिल**

वॉशिंग्टन येथे झालेल्या एका शासकीय मेजवानीदरम्यान गोळीबाराची घटना घडली होती. या प्रकरणातील संशयितावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या जीवावर उठल्याचा गंभीर आरोप ठेवण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

सदर आरोपी, कोल थॉमस ॲलन, याने ही कारवाई पूर्वनियोजित स्वरूपात केल्याचे तपासात स्पष्ट होत आहे. अटकेनंतर तो कोणतीही प्रतिक्रिया देत नसला तरी, हल्ल्यापूर्वी त्याने आपल्या कुटुंबीयांना आणि माजी नियोक्त्याला पाठवलेल्या संदेशातून त्याचे उद्दिष्ट उघड झाले. लोकशाही व्यवस्थेला धाक दाखवण्यासाठी हिंसाचाराचा मार्ग स्वीकारणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. आरोपीवर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न आणि बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याचे आरोप ठेवण्यात आले आहेत. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# निसर्गाशी वैर घातकच!

निसर्गावर सतत चालून जाणाऱ्या माणसाच्या अंगावर कधीतरी निसर्ग येणारच ना...! तो येतोय; आलाय. पृथ्वीचे नैसर्गिक कवच कमकुवत करून कथित विकासाच्या मार्गावर बेधुंद धावणाऱ्या पावलांना तीव्र होत चाललेल्या उष्णतेच्या लाटा कधीतरी अडवणारच. त्या तशा अडवीत आहेत. निसर्गाशी संघर्ष करून कॉंक्रीटची जंगले उभारणाऱ्या माणसाला सावलीसाठी शेवटी पुन्हा झाडांच्याच छायेत यावं लागणार. कारण माणसांच्या जगण्याचा मूळ आधार त्याच्या सभोवतालचा निसर्गच आहे. निसर्गाशी वैर करून विकासाचे नवे मार्ग शोधता येत नसतात; उलट असा विकास शेवटी विनाशाचाच मार्ग ठरतो, हे सिद्ध झाले आहे. हवा, पाणी, अन्न, ऋतूंचा समतोल आणि आरोग्य या मानवी जीवनाच्या सर्व मूलभूत गरजा निसर्गावरच अवलंबून आहेत. मात्र, विकासाच्या नावाखाली माणसाने निसर्गाचा समतोल बिघडविला आहे. अतिरेकी वृक्षतोड, वाढते प्रदूषण, बेफाम शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अनियंत्रित वापरामुळे पर्यावरणाची घडी विस्कटली आहे. त्याचे सर्वाधिक तीव्र परिणाम आज वाढत्या तापमानाच्या रूपाने आपल्याला भोगावे लागत आहेत. सध्याच्या तापमानामुळे आपण पृथ्वीवर आहोत की एखाद्या अग्निग्रहावर, असा प्रश्न पडण्यासारखे वातावरण आहे.

एप्रिल महिन्यातच मे महिन्याहून अधिक तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत आहेत, विहिरी कोरड्याठाक पडल्या आहेत, उष्माघाताचे रुग्ण दररोज वाढत आहेत. बेवारस लोक तर जिवाला मुकत आहेत. आपल्याला पृथ्वीच्या संपूर्ण संहाराच्या दिशेने जायचे नसेल तर निसर्गाशी चाललेला संघर्ष तत्काळ थांबवावाच लागेल. निसर्ग आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट देतो; पण आपण त्याच्या अस्तित्वावरच घाव घालत आहोत. त्यामुळे वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन आणि इतर वायूंचे प्रमाण सतत वाढत चालले आहे. 'ग्लोबल वॉर्मिंग' ही आता केवळ शास्त्रीय संकल्पना राहिलेली नाही; ती प्रत्येकाच्या दैनंदिन आयुष्यात उतरलेले वास्तव आहे. तापमानातील वाढ ही फक्त उन्हाच्या झळांपुरती मर्यादित नाही; तापमानवाढीचा परिणाम शेती, अर्थव्यवस्था, आरोग्य आणि सामाजिक स्थैर्यावरही खोलवर होत असतो. शेतकऱ्यांसाठी तापमानवाढ म्हणजे थेट संकटाचे दार असते. तापमानवाढीमुळे पिकांना योग्य वेळी पाऊस मिळत नाही, जमिनीतील ओलावा कमी होतो, विहिरी आटतात आणि उत्पादन खर्चही वाढत जातो. शेती हा ग्रामीण जीवनाचा कणा आहे; तोच डगमगला तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडते. शेतकऱ्यांच्या संकटाचा परिणाम थेट बाजारपेठेवर, महागाईवर आणि सर्वसामान्यांच्या जगण्यावर होतो. सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. उष्माघात, निर्जलीकरण, त्वचारोग, रक्तदाबातील चढउतार, हृदयविकार आणि श्वसनाचे आजार झपाट्याने वाढत आहेत. लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला आणि दिवसभर उन्हात काम करणारे कामगार यांना सर्वाधिक धोका असतो. रस्त्यावर काम करणारे मजूर, पोलिस, वाहतूक कर्मचारी, बांधकाम मजूर आणि शेतकरी हे दररोज जीव धोक्यात घालून आपले कर्तव्य पार पाडत असतात. त्यांच्यासाठी हे वाढणारे तापमान जीवघेणे ठरत आहे.

कॉंक्रीटच्या उंच इमारतींपेक्षा हिरवी झाडे, वेगवान रस्त्यांपेक्षा जिवंत नद्या आणि तात्पुरत्या सुविधांपेक्षा शाश्वत पर्यावरण अधिक महत्त्वाचे आहे. निसर्गाशी समतोल साधणे ही आता अपरिहार्यता बनली आहे. कारण निसर्ग वाचला तरच माणूस वाचेल. पाणीटंचाई ही वाढत्या तापमानाची आणखी एक गंभीर बाजू आहे. उन्हाळा वाढला की पाण्याची गरज वाढते; दुसरीकडे जलस्रोत मात्र दिवसेंदिवस आटत जातात. तलाव कोरडे पडतात, विहिरींचा तळ दिसतो, नद्यांचा प्रवाह कमी होतो आणि भूजल पातळी झपाट्याने खाली जाते. अनेक गावांमध्ये टँकरच्या भरवशावर जगावे लागते. पाण्यासाठी वाद होतात, संघर्ष वाढतात आणि काही ठिकाणी स्थलांतराची वेळही येते. भविष्यातील युद्धे पाण्यासाठी होतील, हा इशारा लवकरच खरा ठरेल असे वाटू लागले आहे. या बदलामुळे मानवी जीवनातील मानसिक ताण मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. सततची उष्णता, पाण्याची चिंता, शेतीतील नुकसान, आरोग्याचे वाढते प्रश्न आणि महागाईच्या ताणामुळे अस्थिरता आणखी गडद होत चालली आहे. पर्यावरणाचा प्रश्न केवळ निसर्गप्रेमाचा विषय राहिलेला नाही; तो थेट सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि माणसाच्या जीवनाच्या गुणवत्तेशी जोडला गेला आहे.

या पृष्ठभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो; तो असा की विकासाच्या नावाखाली आपण नेमके काय गमावत आहोत? उंच इमारती, रुंद रस्ते, नवे उद्योग आणि वेगाने वाढणारे शहरीकरण ही विकासाची चिन्हे नक्कीच असू शकतात; पण जर त्यासाठी झाडे कापली जात असतील, नद्या मरत असतील, डोंगर नाहीसे होत असतील आणि तापमान असह्य होत असेल, तर अशा विकासाला टिकाऊ किंवा शाश्वत कसे म्हणायचे? पर्यावरणाचा नाश करून उभा राहिलेला विकास शेवटी मानवी अस्तित्वालाच धोका निर्माण करणार आहे. यावर उपाय नाहीत असे नाही; पण त्यासाठी तातडीची आणि सामूहिक कृती आवश्यक आहे. वृक्षलागवड आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे वृक्षसंवर्धन, पावसाच्या पाण्याचे संधारण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पर्यावरणपूरक शहर नियोजन, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर, प्रदूषणावर नियंत्रण आणि शाश्वत विकासाच्या धोरणांना प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. उष्णतेच्या वाढत्या लाटांचा सामना करण्यासाठी शासनानेही स्वतंत्र आणि प्रभावी कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. नागरिकांनीही आपल्या जीवनशैलीत बदल करणे तितकेच गरजेचे आहे. पाणी वाचवणे, प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, झाडे लावणे, ऊर्जा बचत करणे आणि पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नाही; ती सामाजिक बांधिलकी आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळणे म्हणजे केवळ निसर्गाचे नुकसान नाही, तर ती माणसासाठी धोक्याची घंटा आहे. आज आपण सावध झालो नाही, तर उद्या उष्णतेच्या या लाटा आपल्याला जगणे कठीण करतीलच. निसर्गाशी संघर्ष करून नव्हे, तर त्याच्याशी समतोल साधून मानवी जीवन सुरक्षित, समृद्ध आणि शाश्वत राहू शकते.

आज राज्यातील तापमानाची स्थिती पाहिली तर हा इशारा किती गंभीर आहे, याची जाणीव अधिक तीव्रतेने होते. विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा यांसारख्या शहरांनी ४६ अंशांच्या पुढे झेप घेत राजस्थानलाही मागे टाकले आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि इतर शहरांमध्येही एप्रिल महिन्यातच मेच्या झळा जाणवत आहेत. हे वाढलेले तापमान म्हणजे निसर्गाचा संयम संपत चालल्याच्या स्पष्ट खुणा आहेत. निसर्ग आपल्याला थांबून विचार करण्यास भाग पाडत आहे की, विकासाच्या या शर्यतीत आपण जगण्याचाच पाया तर उखडून टाकत नाही ना? प्रश्न फक्त वाढत्या तापमानाचा नाही, तर पुढील पिढ्यांसाठी आपण कसे जग सोडून जाणार आहोत, याचाही आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समतोल असला पाहिजे. निसर्गाला विसरून माणूस विकासाची लढाई कधीच जिंकू शकत नाही; कारण शेवटी त्याचे अस्तित्वही त्याच निसर्गावर उभे आहे. म्हणूनच आता निर्णयाचा क्षण आला आहे. कॉंक्रीटच्या तात्पुरत्या सुखासाठी भविष्य धोक्यात घालायचे की शाश्वत पर्यावरणासाठी आजच जबाबदारी स्वीकारायची. कारण निसर्गाचा राग सहन करण्याइतकी ताकद माणसाकडे नाही; पण निसर्गाशी मैत्री करून जगण्याइतकी शहाणपणाची संधी अजूनही आपल्या हातात आहे.

## विशेष

# 'स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर'चा उदय

प्रा. सुखदेव बखळे

गेल्या काही वर्षांमध्ये भारताने पायाभूत सुविधा उभारणीमध्ये मोठी झेप घेतली आहे. महामार्ग, रेल्वे, शहरे आणि डिजिटल नेटवर्क या सर्व क्षेत्रांमध्ये गुंतवणूक वाढली आहे; परंतु आता या विकासाची दिशा बदलत आहे. 'पीएम गती-शक्ती नॅशनल मास्टरप्लॅन' सारख्या उपक्रमांमुळे विविध प्रकल्पांचे एकत्रित नियोजन शक्य झाले आहे, तर 'इंडिया एआय मिशन'मुळे डेटा आणि संगणकीय क्षमता वाढवून निर्णय प्रक्रिया अधिक सक्षम केली जात आहे. या बदलाचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम म्हणजे 'स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर' या संकल्पनेचा उदय. आता केवळ रस्ते बांधणे महत्त्वाचे नाही, तर ते वाहतुकीच्या बदलत्या गरजांनुसार कसे कार्य करतील, हे बघितले जाते. शहरांचा विकास केवळ विस्ताराने नाही, तर व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेने मोजला जाऊ लागला आहे. 'एआय'चा वापर नियोजन प्रक्रियेत अधिक अचूकता आणतो. विविध डेटाचे विश्लेषण करून भविष्यातील गरजा ओळखता येतात. उदाहरणार्थ, वाहतूक, ऊर्जा किंवा पाणीपुरवठा यासारख्या क्षेत्रांमध्ये मागणीतील बदल आधीच लक्षात घेऊन नियोजन करता येते. यामुळे संसाधनांचा अपव्यय कमी होतो आणि प्रकल्प अधिक परिणामकारक ठरतात. तथापि, या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे काही प्रश्नही निर्माण होतात. डेटा हा या संपूर्ण प्रक्रियेचा कणा आहे; पण तो किती सुरक्षित आणि सर्वसमावेशक आहे? अनेक ठिकाणी डिजिटल पायाभूत सुविधा अपुरी आहे. 'नीती आयोगा'च्या अहवालांनुसार, राज्यस्तरीय संस्थांमध्ये डेटा व्यवस्थापनाची स्थिती अजूनही समाधानकारक नाही. दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे कौशल्यांची कमतरता. 'एआय' आणि डेटा विश्लेषणाचा प्रभावी वापर करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक आहे.

जागतिक बँकेच्या मते भारताला स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चरच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर तज्ज्ञांची गरज आहे. याशिवाय, 'एआय'च्या वापरामुळे सामाजिक परिणामांचाही विचार करावा लागतो. स्वयंचलित प्रणालींमुळे काही पारंपरिक रोजगारांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे कौशल्यविकास आणि पुनर्प्रशिक्षण (रीस्किलिंग) यावर भर देणे आवश्यक आहे. नैतिकतेचा प्रश्नही येथे महत्त्वाचा ठरतो. निर्णयप्रक्रियेत 'एआय'चा वापर करताना पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाने मानवी निर्णयक्षमतेला पूरक ठरावे, त्याची जागा घेऊ नये, हे येथे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. या सर्व बाबी लक्षात घेतल्यास भारतासाठी पुढील वाटचाल स्पष्ट आहे. पायाभूत सुविधा विकासात 'एआय'चा वापर वाढवणे आवश्यक आहे; परंतु तो विचारपूर्वक आणि संतुलित पद्धतीने करणे गरजेचे आहे. यासाठी मजबूत डेटा प्रणाली, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि स्पष्ट धोरणात्मक चौकट या तीन गोष्टींवर विशेष भर द्यावा लागेल. या तिन्ही बाबींचा समन्वय साधला, तर भारताला



पायाभूत सुविधा विकासात जागतिक नेतृत्व मिळवण्याची संधी आहे. हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचा भाग आहे. योग्य प्रकारे व्यवस्थापन केले, तर 'एआय' भारताच्या विकासाला नवी दिशा देऊ शकतो. अन्यथा, ही संधी गमावली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतातील पायाभूत सुविधा क्षेत्र एका निर्णायक टप्प्यावर उभे आहे. दीर्घकाळापासून 'रस्ते, पूल आणि इमारती' या पारंपरिक चौकटीत मोजला जाणारा विकास आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा आणि प्रगत विश्लेषण यांच्या आधारे नव्याने आकार घेत आहे. हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर विकासाच्या संकल्पनेतील मूलभूत परिवर्तन आहे. प्रश्न केवळ पायाभूत सुविधा उभारण्याचा नाही, तर त्या किती बुद्धिमान, कार्यक्षम आणि शाश्वत असतील, हा आहे. केंद्र सरकारच्या विविध उपक्रमांमुळे भारताने या परिवर्तनाला स्पष्ट दिशा दिली आहे. हजारो ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्सच्या मदतीने डेटा प्रक्रिया क्षमता वाढवली जात आहे, तर राष्ट्रीय पातळीवरील प्रकल्पांचे एकात्मिक नियोजन करून संसाधनांचा अधिक परिणामकारक वापर साधण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रयत्नांमुळे 'विकास' हा शब्द अधिक व्यापक मानला जात आहे. त्यात तंत्रज्ञान, नियोजन आणि अंमलबजावणी यांचा सुसंवाद आवश्यक ठरतो. पारंपरिक पायाभूत सुविधा नियोजनात अनेकदा स्थिर गृहितकांवर आधारित निर्णय घेतले जात. एकच अंदाज, एकच आराखडा आणि त्यानुसार अंमलबजावणी ही पद्धत दीर्घकाळ वापरली गेली; येथेच 'एआय' आणि प्रगत विश्लेषणाची भूमिका महत्त्वाची ठरते. आता नियोजन संभाव्यतेवर आधारित होत आहे. विविध परिस्थितींचे मॉडेल तयार करून, जोखीम मोजून व सतत अद्ययावत डेटा वापरून निर्णय घेतले जात आहेत.

'प्रिडिक्टिव मॉडेलिंग'ने या प्रक्रियेला नवे परिमाण दिले आहे. 'मशीन लर्निंग'च्या मदतीने विविध डेटा संचांचे विश्लेषण करून मागणीतील बदल, खर्चातील वाढ, क्षमता मर्यादा आणि पर्यावरणीय धोके आधीच ओळखता येतात. यामुळे प्रकल्प सुरू होण्यापूर्वीच संभाव्य अडचणी स्पष्ट होतात. परिणामी, भांडवलाचे योग्य वाटप, वेळेत प्रकल्प पूर्ण होणे आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर शक्य होतो. याचबरोबर, 'एआय' संचालित डिजिटल ट्विन्स ही संकल्पना पायाभूत सुविधा क्षेत्रात क्रांतिकारक ठरत आहे. एखाद्या प्रकल्पाचे आभासी प्रतिरूप तयार करून त्यावर विविध परिस्थितींमध्ये प्रयोग करता येतात. अतिवृष्टी, हवामानबदल, लोकसंख्यावाढ किंवा वाहतुकीतील बदल या सर्वांचा परिणाम आधीच तपासता येतो. त्यामुळे प्रत्यक्ष अंमलबजावणीपूर्वीच त्रुटी दुरुस्त करता येतात आणि प्रकल्प अधिक सक्षम बनतो. पायाभूत सुविधा क्षेत्र हे स्वभावतः भांडवलीदृष्ट्या खर्चीक आणि जोखमीने भरलेले आहे. कच्च्या मालाच्या कमतीतील चढ-उतार, करारातील अडचणी, वेळापत्रकातील विलंब या सर्वांचा प्रकल्पांवर मोठा परिणाम होतो. अशा परिस्थितीत प्रगत विश्लेषणामुळे गुंतवणूक निर्णय अधिक सुजाणपणे घेता येतात. कोणते प्रकल्प प्राधान्याने राबवायचे, कोणते पुढे ढकलायचे आणि कोणत्या ठिकाणी जोखीम अधिक आहे, याचे स्पष्ट चित्र समोर येते.

'नीती-आयोगा'च्या अभ्यासानुसार, अनेक राज्यस्तरीय संस्थांकडे अजूनही केंद्रीकृत आणि डिजिटल डेटा प्रणालींचा अभाव आहे. अनेक ठिकाणी अजूनही हाताने नोंदी ठेवण्याची पद्धत प्रचलित आहे. अशा परिस्थितीत 'एआय' आणि विश्लेषणाच्या प्रभावी वापरासाठी आवश्यक असलेली पायाभूत सुविधा उपलब्ध नाही. याशिवाय, कौशल्यांची कमतरता हा मोठा अडथळा आहे. डेटा सायन्स, 'एआय' अभियांत्रिकी आणि प्रणाली एकत्रीकरण या क्षेत्रांत प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज मोठ्या प्रमाणावर आहे. या पृष्ठभूमीवर, भारतासमोरची खरी कसोटी सुरू होत आहे. प्रयोग आणि प्रात्यक्षिकांच्या टप्प्यापलीकडे जाऊन 'एआय'चा व्यापक आणि परिणामकारक वापर करण्याची वेळ आली आहे. यासाठी मजबूत डेटा पायाभूत सुविधा उभारणे, कौशल्य विकासावर भर देणे आणि स्पष्ट शासन व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. भारताचा पायाभूत सुविधा विकास हा केवळ भौतिक विस्ताराचा प्रश्न राहिलेला नाही. बुद्धिमत्ता, तंत्रज्ञान आणि मानवी विवेक यांच्या संगमातून घडणारी ती प्रक्रिया आहे. हा संगम योग्य प्रकारे साधला गेला, तर भारत केवळ आपली अंतर्गत गरज भागवणार नाही, तर जागतिक स्तरावरही विकासाचा नवा आदर्श निर्माण करू शकेल. अन्यथा, तंत्रज्ञानाची संधी असूनही अपेक्षित परिणाम साधता येणार नाहीत. पायाभूत सुविधा क्षेत्रातील हा बदल केवळ स्वीकारणे नव्हे, तर त्याचे सुजाण आणि जबाबदार व्यवस्थापन करणे हीच खरी गरज आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# ट्रान्सलोकेटेड ट्री नर्सरी...

दिवसेंदिवस वाढणाऱ्या चटक्यांची दाहकता वाढण्यात आपलाही वाटा सिंहाचा आहे. आपल्याला विकास हवा, पण विकास करताना डोळ्यासमोर होणाऱ्या विनाशावर आपण गप्प असतो. मात्र तळपत्या सूर्याला 'बोल' लावून मोकळे होतो. पण तो का तापतो, याचा कधी विचार केलाय का? झाडं कापली जात असताना आपल्या मनाला वेदना होतातच ना? पण प्रशासनातील कर्त्या-करवित्यांच्या मनाचे काय? कुठल्या पर्यायाचा विचार न करताच थेट झाडे कापण्याची परवानगी देणाऱ्यांनाही उन्हाचे चटके बसतच असतील ना? आपण भारतातच राहतो... एका राज्यात सहा हजारांहून अधिक झाडांचे पुनर्रोपण करण्याचा धाडशी प्रयोग होत असेल, तर आमच्याकडे कित्येक दशके वाटसरूंना सावली देणाऱ्या झाडांचा जीव का घेतला जातो. काम सोपं करण्याच्या नादात निसर्गाप्रति आपल्यात आलेला कृतघ्न भाव आपल्याच 'भावी' पिढीचे भवितव्य 'भस्म' करते आहे, हे नक्की! 'ट्रान्सलोकेटेड ट्री नर्सरी' म्हणजेच पुनर्स्थापित वृक्ष रोपवाटिका अनेक प्रश्नांचे एकमेव उत्तर ठरू शकते. बस, सोपा मार्ग स्वीकारून शाश्वत विकासाचे अवास्तव स्वप्न पाहण्याची मानसिकता तेवढी बदलायला हवी. वाटायला, प्रत्येकालाच वाटतं, झाडं कापली जाऊ नयेत, पण त्यासाठी प्रयत्न करणारे किंवा यासाठी पुढे येणारे किती आहेत, हा प्रश्नच आहे. विकास कोणाला नको आहे, पण तो करताना 'विनाश' नको व्हायला, याचीही काळजी घ्यावीच लागेल ना? जो निसर्ग आपल्याला नि:स्वार्थ भावनेने सर्वस्व देतो, वेळ आल्यावर आपण आपल्या स्वार्थासाठी त्याच्या या नि:स्वार्थ सेवेची परतफेड त्याच्याच 'मुळा'वर घाव घालून करतो. राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे सुरू असलेल्या कामात ८० ते १२० वर्षे जुनी शेकडो झाडे कापून जो कृतघ्न भाव यंत्रणेने निसर्गाप्रति दाखविलाय, तो चिंतनीय असाच आहे. जे भंडाऱ्यात घडतंय, ते



भविष्यात आणखी कुठे घडेल. कदाचित अनेक ठिकाणी हे घडूनही गेलं असेल. पायाभूत सुविधा, शाश्वत विकास या सर्व गोष्टी करताना कधीतरी झाडांचा जीव न घेता 'मार्ग' निघू शकतो का? याचा विचार उच्चविद्याविभूषित अधिकारी, नियोजनकर्ते यांच्याकडून झाला आहे का? दुर्दैवाने हे होत नाही, हेच वास्तव आहे. काम सोपं आणि सुटसुटीत करण्याच्या नादात वृक्ष कापण्यासाठी दिली जाणारी परवानगी म्हणजे आपल्या निसर्गाप्रतिच्या उदासीनतेची परमोच्च पातळी म्हणावी लागेल. १०० वर्षे जुने एखाद झाड कापताना जर कुणालाच दुःख होत नसेल तर ही असंवेदनशीलता नक्कीच घातक आहे. आज आमच्याकडे निसर्गाप्रतिची संवेदनशीलता दिसत नसली, तरी भारताचाच एक अविभाज्य घटक असलेल्या आंध्र प्रदेशात मात्र त्यांनी हे करून दाखविले. विकास त्यांनीही केला, पण तो झाडावर कुऱ्हाड चालवून नाही, तर त्यांचे पुनर्रोपण करून, त्यांना जगवून! आंध्र प्रदेशातील अमरावती येथे देशातील पहिली ट्रान्सलोकेटेड ट्री नर्सरी म्हणजे पुनर्स्थापित वृक्ष रोपवाटिका तेथील अमरावती विकास महामंडळाने तयार केली. विकासाच्या आड येणारी झाडे मुळासकट काढून त्यांना शास्त्रोक्त पद्धतीने जतन करून जगविले गेले. वयाच्या १५ वर्षांपासून ते ३०-४० वर्षांपर्यंतच्या झाडांना वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून जमिनीतून काढून एका विशिष्ट प्रकारच्या बॅगमध्ये काही वर्षे जगवून पुनर्रोपण करण्याचा अनोखा प्रयोग येथे सुरू आहे. आज सहा हजारांहून अधिक झाडांचे पुनर्रोपण झाले. वड, पिंपळ, चिंच, आवळा, बहावा अशा अनेक झाडांना तेथील अधिकाऱ्यांच्या संवेदनशीलतेने जीवनदान दिले. जागतिक बँकेने कौतूक केले. आशियाई विकास बँकेच्या १३ सदस्यांच्या पथकाने या प्रकल्पाला भेट देत जागतिक स्तरावर अनुकरणीय असा प्रकल्प असल्याचे सांगितले. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दखल घेत 'अमरावती' मॉडेल शासकीय यंत्रणेने राबवा असे सांगितले. जे आंध्र प्रदेशात शक्य होऊ शकले, ते आपल्याकडे का नाही? आम्हीसुद्धा कधीकाळी पालखी मार्गासाठी १०२५ वडाच्या झाडांचे पुनर्रोपण केले आहे. नागपुरात १८८ वर्षे जुने वडाचे झाड काढून गोरेवाडा जैवविविधता प्रकल्पात लावले आहे. जर आम्ही करू शकतो तर, त्या दृष्टीने प्रयत्न का होत नाहीत. आज आम्हाला मानसिकता बदलण्याची गरज आहे. सर्वस्व गमावून बसण्याआधी भानावर न आल्यास सूर्याला 'बोल' लावण्यासाठीही आपण वाचणार नाही, हे नक्की!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# मोक्षदायिनी सप्तपुरी

प्रा. दिलीप जोशी

आपली भारतीय संस्कृती नैतिक आणि आध्यात्मिक पायावर उभी आहे. चराचरात भगवंत पाहणारे आपण भारतीयत्वाच्या, हिंदुत्वाच्या धाग्यांनी कायम सांधले गेलो आहोत. म्हणूनच इथल्या नद्या, पर्वत, सागर आणि तीर्थक्षेत्रे आपल्या एकात्म भावाचे प्रतीक आहेत. यातलाच भाग म्हणजे आपली हिंदू तीर्थक्षेत्रे आहेत. तीर्थक्षेत्रे भारताला एकाच धाग्यात जोडून ठेवतात. त्यातील सप्तपुरींना मोक्षदायिका म्हणून विशेष स्थान आहे.

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवन्तिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥

गरुड पुराणाच्या १६ व्या अध्यायातील ११३ वा श्लोक आपल्याला सर्वश्रुत आहे. यातील वर्णन केलेल्या सप्तपुरी मोक्षदायी नगरी आहेत. यातील अयोध्या श्रीरामजन्मभूमी म्हणून विश्वविख्यात आहे.

अयोध्या नगरी नित्या सच्चिदानन्दरूपिणी ।
यस्यांशेन वैकुंठो गोलोकादि प्रतिष्ठितः ॥

शरयू नदीच्या तीरावर असलेली अयोध्या नगरी वैवस्वत मनुनिर्मित नगरी आहे. वेद आणि विविध पुराणांत उल्लेख असलेली अयोध्या स्वर्गाचे द्वार असल्याची श्रद्धा आहे. 'अष्टवक्रा नवद्वारा देवानां पुरयोध्या'नुसार अयोध्या ईश्वराने बनवलेले नगर असून जिथे सूर्यवंशी राजे रघुराजे, दशरथ राजे, श्रीरामचंद्र राजे अशा रघुवंशी महापराक्रमी युगपुरुषांच्या पराक्रमाची गाथा आहे. अयोध्या म्हणजे जिथे युद्ध होत नाही कारण इथे सर्व महापराक्रमी, चक्रवर्ती सम्राटांची वंशावळ आहे. कनकभवन, हनुमानगढी, लक्ष्मण किल्ला, नागेश्वर मंदिर अशी पवित्र स्थाने असलेली अयोध्या शरयू नदी आणि भगवान श्रीराम यांच्या अस्तित्वामुळे मोक्षदायी पुरी आहे. याच मालिकेत दुसरे नाव आहे मथुरा नगरीचे. भगवान श्रीकृष्णाची जन्मभूमी असलेली मथुरा यमुना नदीच्या पवित्र तटावर वसलेली असल्याने आणि मथुरेच्या सभोवताली गोकुळ, वृंदावन, गोवर्धन ही पवित्र तीर्थक्षेत्रे असल्यामुळे मोक्षदायी आहे.

नास्ति मे मथुरायाश्च तुल्यं भुवि नभस्तले ।
पाताले च महाभागे मथुरा मम विश्रुता॥

महाकवी कालिदासाच्या रघुवंशात ही नगरी भगवान श्रीरामाचे बंधू शत्रुघ्न राजे यांनी लवणासुराचा वध करून वसविली आहे. मधू नावाच्या राक्षसाची ही राजधानी म्हणून हिचे नाव मधुवन, मधुपुरी, मधुनगरी असाही उल्लेख आहे. राजा अग्रसेन; त्यानंतर कंसाची राजधानी म्हणूनही प्रसिद्ध आहे. श्लोकातील पुढील मोक्षदायी नगरी म्हणजे मायापुरी. मायापुरीला सध्या आपण हरिद्वार म्हणतो.

''हरिद्वारे यदा याता विष्णुपादोदकी तदा ।
तदेव तीर्थं प्रवरं देवानामपि दुर्लभम् ॥''

पुराणात मायापुरी हरिद्वारला कपिला, गंगाद्वार असेही म्हणतात. इथूनच गंगा मैदानी प्रदेशात प्रवेश करते म्हणून गंगाद्वार. शिवालिक पर्वतरांगांच्या पायथ्याशी आणि पापनाशिनी गंगानदीच्या काठावर असलेले हरिद्वार कुंभमेळ्यासाठी प्रसिद्ध आहे. समुद्रमंथनानंतर अमृतकुंभातील अमृताचे काही थेंब इथे पडल्यामुळे इथे कुंभमेळा भरतो. तिथेच ब्रह्मकुंड देखील आहे. भगवान श्रीविष्णूंचे पदचिन्ह इथेच आहे. पदचिन्ह म्हणजे पौडी म्हणून त्या ठिकाणाला 'हर की पौडी' म्हणतात. हा सर्व उल्लेख स्कंद पुराणात आहे. याच मायापुरी हरिद्वार येथे आदिशक्तीचे अंग पडल्यामुळे इथे शक्तिपीठ आहे जे मायादेवी नावाने प्रसिद्ध आहे. विशेष म्हणजे याच ठिकाणी भगवान शिवाचे श्वसूर श्री दक्ष राजा यांनी यज्ञ केला होता. इथेच दक्षयज्ञ विध्वंस भगवान शिवांनी केला. म्हणून येथील दक्षेश्वर महादेव मंदिर प्रसिद्ध आहे. पुढील मोक्षदायी नगरी म्हणजे काशी विश्वनाथ नगरी. भगवान शिवाच्या त्रिशुळावर स्थित काशी नगरी पवित्र गंगेच्या तीरावर वसली आहे. वेद आणि पुराणात विशेष उल्लेख असलेली ही नगरी. स्कंद पुराणातील विशेष असा काशीखंड तर स्तुती करताना थांबतच नाही. १५०० विविध मंदिरे आणि २५ विशेष घाट असलेली ही पुण्यपुरी. राजा काश यांनी वसविले म्हणून काशी. वरुणा नदी आणि असी नदीच्या तीरावर वसलेले नगर म्हणून वाराणसी. काशी म्हणजे शिव व शिव म्हणजे काशी याचा साक्षात्कार इथे आल्यावर होतो.

शिवः काशी शिवः काशी, काशी काशी शिवः शिवः ।

पुढील मोक्षदायी पुरी म्हणजे कांची पुरी. दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेली ही नगरी तामिळनाडूत वेगावती नदीच्या तीरावर वसलेली पुण्य नगरी. शिव कांची आणि विष्णुकांची अशा दोन प्रभागात विभागलेली ही नगरी श्री वरदराज पेरुमल हे विष्णुमंदिर विष्णुकांची येथे तर श्री कैलासनाथर हे शिवमंदिर शिवकांची येथे आहे. सर्व नगरींमध्ये कांची सर्वश्रेष्ठ आहे.

पुष्पेशू जाती, पुरुषेशू विष्णू, नारीशू रंभा, नगरेशू कांची असा श्लोकच आहे. कांची इथेच कांची कामकोटी शक्तिपीठ आहे. आद्य शंकराचार्यांनी इथेच कामकोटी कामाक्षी मंदिरात श्रीचक्र स्थापन केले आहे. कांची म्हणजे ब्रह्मदेव. इथे ब्रह्मदेवाने तपश्चर्या केली होती त्यामुळे देवीचे दर्शन झाले होते. अजून विशेष म्हणजे इथे पालीची पूजा होते. ''कांची नरदकाचा राजा'' भिंतीवर लिहिले तर पाल येत नाही अशी जुनी श्रद्धा आहे.

पुढील मोक्षदायी पुरी म्हणजे अवंतिका नगरी.

अवन्तिकायां विहितावतारं । मुक्तिप्रदानाय च सज्जनानाम् ।
अकालमृत्योः परिरक्षणार्थं । वन्दे महाकालमहासुरेशम् ॥

सध्या जे उज्जैन महाकाल आहे त्याचे प्राचीन नाव अवंतिका होय. क्षिप्रा नदीच्या तीरावर वसलेले हे नगर उज्जैयनी, कुमुद्वती, विशाला, प्रतीकल्प नावाने देखील ओळखले जात असे. दूषण नावाच्या राक्षसाचा वध भगवान शिवाने करून लोकांचा काल बनलेल्या राक्षसापासून भयमुक्त केले. कालाचाही काल असलेला महाकाल. इथेही दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. इथेच भगवान श्रीकृष्ण, सुदामा ज्या गुरुकुल आश्रमात शिक्षा ग्रहण करीत होते तो सांदीपनी ऋषींचा आश्रम आहे. कालगणनेचे केंद्र पूर्वापार इथेच आहे. येथील काळभैरव प्रसिद्ध असून तो अवंतिका नगरीचा कोतवाल आहे. राजा विक्रमादित्य यांची राजधानी असलेल्या नगरीत शनि मंदिर आणि मंगळनाथ मंदिर कृपादायी आहेत. महाकालेश्वराची भस्मारती फलदायी आहे. आरतीसाठी पूर्वी चिताभस्म वापरत असत म्हणून इथे महास्मशान आहे. मोक्षदायी पुरीमध्ये महत्त्वपूर्ण नाव म्हणजे द्वारावती अर्थात द्वारका पुरी. गोमती नदी आणि सिंधू सागराच्या तीरावर वसलेली ही नगरी प्राचीन कुशस्थळी म्हणून प्रसिद्ध होती. भगवान श्रीकृष्णाने जरासंघादी राक्षसांपासून दूर समुद्रात एका बेटावर बसवलेली ही नगरी. प्रत्यक्ष देवशिल्पी विश्वकर्मा भगवंतांनी श्रीकृष्ण भगवंतांच्या सूचनेनुसार द्वारका पुरीचे निर्माण केले. श्रीमद् पूज्यपाद आदि शंकराचार्यांनी चार धामांपैकी एक असे शारदा पीठ इथेच निर्माण केले. यामुळे हे नगर मोक्षदायी पुरी म्हणून मान्यताप्राप्त पुरी आहे.

सातही पुरी भारताला एकाच धाग्यात जोडण्याचे काम करतात. ''पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळीती'' आसेतुहिमाचल एकसंध राहण्याचे एकमेव कारण म्हणजे आपली तीर्थस्थळे धार्मिक, आध्यात्मिक भावनांनी जोडली आहेत. मोक्षदायी सप्तपुरींची यात महत्त्वाची भूमिका आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### तरुणांनी सावध राहायलाच हवं!

आजकाल सगळंच ऑनलाईन झालंय. सोशल मीडिया, नोकरी, मैत्री, नाती सगळीकडे तरुण-तरुणी पुढे आहेत. जसं जग बदलतंय तसं धोके पण वाढलेत. त्यामुळे स्वतःला जपणं, शांतचित्ताने निर्णय घेणं आणि मन खंबीर ठेवणं गरजेचं झालंय. ऑनलाईन असो किंवा प्रत्यक्षात, नात्यांमध्ये फसवणूक, खोटी माहिती, इमोशनल ब्लॅकमेल, डोकं फिरवणं असे प्रकार वाढलेत. म्हणूनच कुणाच्याही जवळ जाण्याआधी थोडं थांबा, विचार करा... आपल्या हिंदू संस्कृतीत नेहमी सांगितलंय की 'संस्कार', 'विवेक' आणि 'मर्यादा' महत्त्वाच्या आहेत. फक्त मनाला वाटतं म्हणून निर्णय घेऊ नका. डोकं वापरा, बरोबर-चूक काय ते तपासा. नातं असो वा आयुष्यातला कोणताही मोठा निर्णय असो, स्वतःचा विचार, घरच्यांचा सल्ला आणि आपले संस्कार हे सोबत ठेवा. तरुण वयात प्रेमात किंवा मैत्रीत आपण पटकन गुंततो. पण खरं-खोटं-उद्देश हे समजून घेणं गरजेचं आहे. कारण एक चुकीचा विश्वास अख्खं आयुष्य बदलू शकतो. शिकणं जसं महत्त्वाचं आहे तसंच चांगले संस्कार, घरच्यांशी मोकळेपणाने बोलणं आणि आपल्या मूल्यांशी प्रामाणिक राहणं तितकंच महत्त्वाचं आहे. हिंदू धर्माची शिकवणच अशी आहे, ज्ञानासोबतच चारित्र्य आणि चांगली वागणूक हाच आयुष्याचा पाया आहे. आई-वडिलांनी पण मुलांशी मित्रासारखं वागावं. त्यांना काहीही मनातलं मोकळेपणाने सांगता आलं पाहिजे. सोशल मीडियावर अनोळखी लोकांशी बोलताना तर जपून राहा. जर कुणी फसवत असेल, दबाव टाकत असेल, चुकीच्या मार्गाला नेत असेल तर घाबरू नका. थेट कायदेशीर तक्रार करा. समाजात शांतता, एकमेकांचा आदर आणि समजूतदारपणा ठेवला तरच आपण मजबूत राहू.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

### विवाहासाठी पालकांची संमती...

अनिल फेकरीकर यांचा उपरोल्लेखित शीर्षकाचा लेख वाचनात आला. लव्ह जिहाद तसेच इतर फसवणुकीच्या घटना रोखल्या जाव्यात, ही लेखकाची तळमळ समजण्यासारखी आहे. प्रशंसनीय आहे. परंतु त्यासाठी त्यांनी जो उपाय सुचवला आहे, तो मान्य करण्यात अनेक अडचणी आहेत. पहिली गोष्ट म्हणजे सज्ञान व्यक्तींच्या विवाहाला अशी परवानगी घेण्याचा कायदा घटनेच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करतो की काय, हे पाहावे लागेल. तसे उल्लंघन होत असेल तर असा कायदा पारित होणारच नाही किंवा घटना दुरुस्ती करून मग पारित करावा लागेल. बरे असा कायदा पारित झाला, तरी व्यवहारात त्याची अंमलबजावणी होणार म्हणजे काय होणार? वधू-वरांच्या पालकांनी सह्या केलेले संमतीपत्र विवाह नोंदणी कार्यालयात सादर करावे लागेल. मग विवाह कायदेशीर होईल. अशा संमती पत्रावर मुलांनी आई-वडिलांवर भावनिक दबाव टाकून (करून) सह्या घेतल्या तर मग काय करायचे? वधू-वरांचे पालक म्हणजे दोघांचे आई-वडील म्हणजेच दोन पक्ष आणि चार व्यक्ती झाल्या. त्यातल्या एका पक्षाने संमती दिली आणि एकाने दिलीच नाही किंवा वधूच्या अथवा वराच्या आईने संमती दिली आणि वडिलांनी दिली नाही किंवा उलट तर मग काय करायचे? की, संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थायी समितीत असते त्याप्रमाणे एका जरी पालकाने नकाराधिकार वापरला की विवाह होणार नाही असे ठरवायचे? नमुन्यादाखल ह्या दोन अडचणी सांगितल्या. अशा अनेक अडचणी निर्माण होतील. उदा. अनाथ मुलांच्या विवाह संबंधित प्रश्न. या सगळ्या प्रकारात होईल ते इतकेच की आजच्या काळात, अगोदरच लग्न जमणे हा प्रश्न बिकट झालेला आहे; तो आणखी अवघड होईल. जेथे विवाहासंबंधी मुले आणि पालक यांच्यात मतभेद होतात, तेथे सर्व ठिकाणी पालकांची बाजू बरोबर आणि मुलांची बाजू सर्वथा चूक असे काही नसते. अनेक वेळा पालक प्रेमविवाहाला जात-पात, घराणे हुंडा, आर्थिक प्रतिष्ठेच्या चुकीच्या कल्पना यामुळे विरोध करतात. असा विरोध करून पालकांनी प्रेमविवाह रोखला तरीही ते रास्तच आहे, असे लेखक महोदयांना वाटते काय? मुळात पालकांनी मुलांवर असे संस्कार केले पाहिजे की आपली मुले चुकीचा निर्णय घेणारच नाहीत...!

**मकरंद कुलकर्णी**/पुणे

### घरांतील ध्वनी प्रदूषण

बाहेरच्या वातावरणात अनेक ध्वनी प्रदूषण आहे. पण घरातही खूप जास्त ध्वनी प्रदूषण आहे. ध्वनी प्रदूषणांची सुरुवात सकाळपासूनच होते. घरांत आधी टीव्ही सुरू होतो. प्रत्येक सदस्याला वेगवेगळे कार्यक्रम पाहायचे असतात. कधी प्रत्येक खोलीत स्वतंत्र टीव्ही असतो. स्वयंपाकघरात कुकरची शिटी ध्वनी प्रदूषणच! ज्येष्ठांना त्याचा त्रास होतो. मग होतो मिक्सरचा रणगाड्यासारखा आवाज. दुपारी लागते वॉशिंग मशीन. त्याचा तासभर आवाज होतोच. उन्हाळ्याचे दिवस आहेत तर कुलर चालू राहणारच; या आवाजांना काहीच करता येत नाही. पूर्वी हे आवाज नव्हते. चुली-शेगड्या होत्या. मध्यंतरी स्टोव्ह होते; तो स्टोव्ह खूप आवाज करायचा. आता गॅस आहे; त्याचा आवाज नाही, पण गॅसवर चिमणी लावली तर तो आवाज होतोच. असे दिवसभर घरांत ध्वनी प्रदूषण सुरू असते. लहान बाळ-ज्येष्ठ व्यक्तींना हे सहन करावेच लागते. आधुनिकता आहे करणार काय?


**अंजली पळणीटकर**/नागपूर

# उड्डाणपूल अडचणीबाबत १५ दिवसांत बैठक

## मुख्यमंत्री फडणवीस यांची सोलापुरातील मेळाव्यात ग्वाही

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल -**

सोलापुरातील नियोजित दोन उड्डाणपुलांच्या केंद्र सरकारसंबंधित मिळकतींच्या भूसंपादनाविषयीच्या अडचणीबाबत १५ दिवसात बैठक लावून प्रश्न मार्गी लावणार, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सोलापुरात दिली.



भाजपच्या विजयी मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. तत्पूर्वी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी उड्डाणपूलांच्या भूसंपादनविषयक अडचणी मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या. केंद्र सरकारच्या रेल्वे, संरक्षण व दूरसंचार अशा तीन खात्यांच्या मिळकती या योजनेत बाधित होणार आहेत. यासंदर्भातील एनओसी मिळाल्यास भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. हा संदर्भ घेत मुख्यमंत्री म्हणाले की, यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून केंद्रीय स्तरावर १५ दिवसात बैठक घेऊन एनओसी मिळवून देऊ. सोलापूर शहरातील नवनिर्वाचित नगरसेवकांनी पुढील पाच वर्षानंतर नागरिकांकडे मत मागण्यापूर्वी प्रत्येक घरात दररोज मुबलक पाणी येईल, या पद्धतीने काम करण्याची गरज आहे. शहरातील १३ चाळी, २२ सोसायटी यांचा प्रश्नदेखील मार्गी लावणार आहोत.



### नगरसेवकांना मुख्यमंत्र्यांच्या टिप्स

नगरसेवकांनी विकास कामे तर करावीच पण जनतेशी चांगल्या पद्धतीने व्यवहार करावा. त्यांना सन्मानाची वागणूक देऊन त्यांच्या प्रश्नांची प्रामाणिकपणे सोडवणूक करावी. आपण केवळ पक्षामुळे निवडून आलो, याचे भान ठेवावे. पारदर्शी पद्धतीने काम करावे. आगामी पाच वर्षांनी मतदारांना मत मागण्यासाठी जाण्यापूर्वी प्रत्येक घरात दररोज मुबलक पाणी येईल या पद्धतीने काम करावे, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

## महत्वाचे...

### दोन सराईत चोरट्या महिला जेरबंद; तीन लाखांचे दागिने हस्तगत

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

शहर गुन्हे शाखेच्या पथकाने गड्डा यात्रा, लग्नकार्य तसेच घरातून दागिन्यांची चोरी करणाऱ्या दोन सराईत महिलांना अटक केली. त्यांच्याकडून चोरीचे ३ लाख ८ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले. निता किरण काळे (वय ४५, रा. शिरापूर, लोकमंगल साखर कारखाना जवळ, ता. मोहोळ) आणि मोनिका प्रशांत रोहिटे (वय ३२, रा. थोबडे वस्ती, जुनी लक्ष्मी मिल चाळ,सोलापूर) अशी चोर महिलांची नावे आहेत. शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद माने यांच्या सूचनेनूसार गुन्हे शाखेच्या पथकाने तपास करताना फौजदार मुकेश गायकवाड व त्यांच्या पथकाने वरील दोन्ही महिलांना ताब्यात घेतले. चौकशीत निता काळेने गड्डा यात्रेत चोरी केल्याची कबुली दिली. तिच्याकडून एक तोळ्याचे चांदीचे ब्रेसलेट, रोख सहा हजार रुपये जप्त केले. मोनिका रोहिटेने हिप्परगा येथे लग्नकार्यात चोरी केल्याची कबुली दिली. तिच्याकडून तीन लाख रुपयांचे पावणेतीन तोळ्याचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. सदरची कामगिरी शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार मुकेश गायकवाड, पोलीस अमलदार नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, अजिंक्य माने, सुमित्रा बारबोले, निलोफर तांबोळी, बाळु काळे, सतिश काटे यांनी पार पाडली आहे.

# साखरपेठ परिसरातील गारमेंट केंद्राला भीषण आग

**अग्निशमन विभागाच्या रेस्क्यू व्हॅनसह अग्नीदूत पथकाकडून आगीवर नियंत्रण**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.२८ एप्रिल -**

शहरातील साखरपेठ परिसरात स्वस्तिक मिठाई समोरील गल्लीत आज सायंकाळी सुमारे साडेसहा वाजण्याच्या सुमारास शालेय गणवेश तयार करणाऱ्या जुन्या दुमजली गारमेंट केंद्राला भीषण आग लागली. आगीत मोठ्या प्रमाणात कापड व तयार गणवेश जळाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सैफन सगरी यांच्या रेडीमेड शालेय गणवेशाच्या केंद्रात अचानक आग लागली. नागरिकांनी धूर व ज्वाळा दिसताच तात्काळ अग्निशमन विभागाला कळवले. रविवार पेठ येथील मुख्य अग्निशमन केंद्र जवळ असल्याने अग्निशमन दलाच्या दोन बंबांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, अरुंद रस्ता असल्याने गाड्यांना थेट आगीच्या ठिकाणी पोहोचता आले नाही. सुमारे १०० ते १५० मीटर अंतरावर गाड्या उभ्या करून अग्निशामक कर्मचाऱ्यांना पाईपच्या सहाय्याने आतमध्ये प्रवेश करून पाण्याचा मारा करावा लागला. गारमेंटमध्ये मोठ्या प्रमाणावर कापड साठा असल्याने आगीने काही वेळातच तीव्र रूप धारण केले.



दरम्यान, घटनेची माहिती मिळताच नगरसेवक प्रवीण दर्गो पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्याला हातभार लावला. पोलिसांनीही तात्काळ घटनास्थळी दाखल होत बघ्यांची गर्दी नियंत्रणात आणली. नागरिकांची गर्दी झाल्याने काही काळ अग्निशमन दलाच्या कामात अडथळे निर्माण झाले होते. आगीची तीव्रता लक्षात घेऊन अग्निशमन विभागाचे रेस्क्यू व्हॅन, ऑक्सिजन मास्क व ऑक्सिजन टाक्यांसह 'अग्नीदूत' पथक घटनास्थळी दाखल झाले. अखेर अग्निशमन दलाच्या सुमारे सहा बंबांच्या मदतीने जवळपास ४५ मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. आ. विजयकुमार देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिली. यावेळी माहिती देताना मालक सगरी यांना अश्रू अनावर झाले होते.

---

### सांगोले नगरपरिषद, सांगोले, जि. सोलापूर

**शुध्दीपत्रक**

जा.क्र./सांनप/बांध/२०९३ दि. २८/०४/२०२६

सांगोले नगरपरिषद, जि. सोलापूर मार्फत दै. बिझनेस लाईन (राष्ट्रीय स्तर इंग्रजी पेपर) मध्ये दि. २२/०४/२०२६ रोजी प्रसिध्द केलेल्या ई-निविदा सूचना मधील सांगोला नगरपरिषद, क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नगरपरिषदेचे खुले सभागृह बांधणे Tender ID 2023_DMA_1297082_1) या कामाची निविदा तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात येत आहे.

शिक्का

**सही/-**
**(डॉ. सुधीर गवळी)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद सांगोले**

---

### लोकमंगल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

**२४ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(फक्त सभासदांकरिता)**

**सन्माननीय सभासद बंधु आणि भगिनींनो,**

लोकमंगल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था मर्या., मु.पो. बीबी दारफळ, ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर या आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा वार रविवार दि.०३/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. 'श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान' मु. पो. वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात येत आहे, तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे. सोलापूर.

**सभेपुढील विषय**

१) मागील दि. ०४/०५/२०२५ रोजी झालेल्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.
२) सन : २०२५-२६ या सालाचे तेरीज पत्रक, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक वाचून मंजूर करणे.
३) सन : २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
४) सन : २०२५-२६ चे व्यवस्थापन समितीने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
५) सन: २०२६-२७ या सालाकरिता मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी घेणे.
६) सन : २०२६-२७ या सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व फी ठरविणे.
७) सन : २०२६-२७ या आर्थिक सालाकरिता शासन मान्य नामतालिकेवरील वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
८) मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे.

**सही/-** **श्री. सुदन नागनाथ सुरवसे** **(सचिव)**

**सही/-** **सौ. सरोजनी भारत निमक** **(अध्यक्षा)**

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : १७/०४/२०२६**

**(टीप : कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस कोरमची आवश्यकता भासणार नाही.)**

---

### टी.सी. हरवली आहे

दिनांक १५/०४/२६ रोजी तुळजापूर ते नळदुर्ग प्रवासादरम्यान, आरती वामनराव उंबरे या नावाची तेरणा कॉलेज तेर या संस्थेची १२ वी पास टी.सी. हरवली आहे, ज्यांना सापडली असेल त्यांनी खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस देण्यात येईल

**आरती वामनराव उंबरे**
**मु.पो.- होर्टी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव**

---

**जाहीर प्रसिध्दीकरण** सिव्हील एम.ए. नं. १४/२०२६

### अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्यु. डी. यांचे कोर्टात

**सुरेश रेवणसिध्द पाटील** - **अर्जदार**
रा. बासलेगांव, ता. अक्कलकोट
विरुध्द
**कोणी नाही** - **सामनेवाला**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४/२०२६ हा बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वरसा प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे मयत भाऊ जगन्नाथ रेवणसिध्द पाटील हे दि. ०२/१०/२०२३ रोजी अविवाहीत मयत झाले आहेत. मयत जगन्नाथ रेवणसिध्द पाटील यांचे नावे बासलेगाव, ता. अक्कलकोट येथे गट नं. ४५, क्षेत्र ० हे. ८१ आर. ही मिळकत असून मयत जगन्नाथ रेवणसिध्द पाटील यांचे पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत जगन्नाथ रेवणसिध्द पाटील यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक १२/०६/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

**सही/-** **कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय अक्कलकोट

---

### महाळुंग श्रीपूर नगरपंचायत, कार्यालय

**ई-निविदा सूचना प्रसिद्धीकरण**

**जा.क्र. बांधकाम/२०२६/६६** **दिनांक : २८/०४/२०२६**

मुख्याधिकारी, महाळुंग श्रीपूर नगरपंचायत यांचेकडून अ. क्र. **(१)** शासनाच्या वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान, अ. क्र. **(२)** शासनाच्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना आणि अ. क्र. **(३)** शासनाच्या नागरी सेवा व सुविधेची कामे या योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या विकास कामाची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार / अर्हताप्राप्त निविदा धारकाकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण ३ कामे आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. २८/०४/२०२६ ते दि. ०८/०५/२०२६ पर्यंत सायं. ०५.०० वाजेपर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत, निविदा स्वीकृती, अटी व शर्थी इत्यादींची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरती उपलब्ध आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**महाळूंग श्रीपूर नगरपंचायत**

---

### सोलापूर जनता सहकारी बँक लि.

**मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक**

SJSB Multi-State Scheduled Coop. Bank

'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com
वेबसाईट : www.sjsbbank.com

**जाहीर ताबा नोटीस**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, सोलापूर जनता सहकारी बँक लि. (मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप. बँक) शाखा - मंगळवार पेठ, सोलापूर येथील कर्जदार/ गहाणकार- श्री. दत्तात्रय नागनाथ शिंदे व सौ. प्रिया दत्तात्रय शिंदे, यांच्या कर्जास रजि. गहाणखताने तारण असलेली त्यांचे नावावरील जिल्हा व उप जिल्हा सोलापूर, सोलापूर महानगर पालिका हद्दीतील बुधवार पेठ येथील जागा यासी टी.पी. स्कीम नं.२, फायनल प्लॉट क्र.२५/ब/२, म्युनिसिपल घर नं.१९३, याचे एकूण क्षेत्र ८२१.०० चौ.मी. यावर बांधलेल्या द्वारका रेसिडेन्सी मधील तळघर याचे क्षेत्र ८९.७६ चौ.मी. व तळमजल्यावरील दुकान नं.२ याचे क्षेत्र ३०.२० चौ.मी. व त्यावरील बांधकामासह ही मिळकत तारण आहे.

या तारण स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा मा. मुख्य न्यायदंडाधिकारी सोलापूर यांच्याकडील फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९७६/२०२५ मधील दि.३०/०७/२०२५ च्या आदेशानुसार नियुक्त मा. कोर्ट कमिशनर यांनी बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे दि.२७/०४/२०२६ रोजी सरफेसी ॲक्ट २००२ नुसार रोजी प्रत्यक्ष ताब्यात दिलेला आहे.

तरी बँकेच्या पूर्व परवानगीशिवाय या तारण स्थावर मालमत्तेचे होणारे कोणतेही हस्तांतरण पूर्णपणे बेकायदेशीर असून संबंधित गुन्ह्यास पात्र ठरतील. तसेच सदर मिळकतीमध्ये कोणीही कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करू नये. तसे केल्यास संबंधिता विरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : २९/०४/२०२६**

शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी-स्टेट शेड्युल्ड को.ऑप. बँक)**
**(०२१७) २७४१११५ / २७४१११६**

---

### जाहीर समन्स

मा. उपनिबंधक,
सहकारी संस्था (परसेवा),
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर १९३ (अ), सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखे शेजारी, सोलापूर-४१३००१.

**महेश अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर**
सोहम प्लाझा सैफुल एरिया सोलापूर -- अर्जदार
-विरुद्ध-
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) -- जाब देणार

| अ नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १३०२/२५-२६ | २,४५,०५०.८८ | ३ | **हसीना अब्दुल वहाब कच्छी** रा. घर क्रं - १८ शुक्रवार पेठ समाचार चौक सोलापूर - ४१३००२ |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने मंगळवार दि. १२.०५.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २४/४/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक,**
सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.

---

### पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

**आरोग्य विभाग**

**सन २०२६-२७ जाहीर वार्षिक निविदा सुचना क्र.१**

| अ. न. | नांव | अंदाजे परिमाण | एकूण किंमत | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रोपॉक्सर २% | आवश्यकतेप्रमाणे | २,९०,०००/- | ५,०००/- | ५०० |
| २ | मेलेथीऑन ५०% (इ.सी. लिक्विड) पुरविणे | आवश्यकतेप्रमाणे | २,९०,०००/- | ५,०००/- | ५०० |
| ३ | निरनिराळ्या वाहनासाठी बॅटरी पुरवठा करणे, ८० ॲम्पीअर १०० ग्रॅम्पीअर १५० ग्रॅम्पीअर बॅटरीचे वेगवेगळे दर देणे (जुनी बॅटरी वजा करून) | आवश्यकतेप्रमाणे | १,००,०००/- | २,०००/- | ५०० |
| ४ | नगरपरिषद मुख्य कार्यालय व इतर ठिकाणी दैनंदिन स्वच्छतेसाठी विविध प्रकारचे स्वच्छता साहित्य पुरविणे | आवश्यकतेप्रमाणे | | ३,०००/- | ५०० |
| १ | काळे फिनेल प्रति लिटर | | | | |
| २ | सुगंधी फिनेल प्रति लिटर | | | | |
| ३ | ॲसिड प्रति लिटर | | | | |
| ४ | वायपर प्रति नग | | | | |
| ५ | चांगल्या प्रतिचे झाडु प्रति नग | | | | |
| ६ | फरशी पुसण्याचा पोछा प्रति नग | | | | |
| ७ | स्वच्छता करणे करिता कापड प्रति मिटर | | | | |
| ८ | एअर फ्रेशनर प्रती लिटर | | | | |
| ९ | डांबर गोळी प्रती कि.ग्रॅ | | | | |
| १० | ८ फुटी बांबू केरसुणीसह असलेले झाडू पुरविणे प्रती नगाचा दर देणे | | | | |
| ११ | संडास, मुतारी स्वच्छता करणे कामी ब्रश पुरविणे प्रती नगाचा दर देणे | | | | |
| १२ | ३ फुट उंची असलेली चांगल्या प्रतिची लाकडी काठी पुरविणे प्रति नगाचा दर देणे. | | | | |
| १३ | चांगल्या प्रतिची शिट्टी पुरविणे प्रति नगाचा दर देणे | | | | |
| १४ | चांगल्या प्रतिची टॉर्च पुरविणे (सेल सह) प्रति नगाचा दर देणे | | | | |
| १५ | न.पा. सांगेल त्याप्रमाणे छपाई करुन टि-शर्ट पुरविणे प्रति नगाचा दर देणे. | | | | |

**शर्ती व अटी**

१ निविदांचे कोरे फॉर्म नगर परिषदेच्या आरोग्य विभागाडे दि. २९/०४/२०२६ ते दि. ०७/०५/२०२५६ अखेर दुपारी ५.०० पर्यत उपलब्ध होतील.
२ निविदा स्विकारण्याची तारीख दि. ०७/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत राहिल. सदर निविदा बारनिशी विभागाकडे सादर करणेची आहे.
३ स्वतंत्र कामाच्या स्वतंत्र निविदा भरणे आवश्यक आहे. बयाणा रक्कम डिडिने किंवा रोख स्वरूपात दि. ०७/०५/२०२६ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल.
४ निविदा दोन लिफाफा पध्दतीने भरणेची आहे. लिफाफा क्र.१ हा दि. ०८/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा व लिफाफा क्र.२ हा दि.११/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. उघडण्यात येतील.
५ टेंडर फॉर्ममध्ये नमुद केल्याप्रमाणे अधिकृत उत्पादक किंवा विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे
६ निविदासंबंधी अधिक माहिती आरोग्य विभागामध्ये सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल
७ इतर अटी व शर्ती निविदाफॉर्ममध्ये पहावयास मिळतील. सदर कामाची एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे.

**सही/-** **(श्री. शरद वाघमारे)** **प्र. आरोग्याधिकारी** **नगरपरिषद पंढरपूर**

**सही/-** **(श्री. महेश रोकडे)** **मुख्याधिकारी** **नगरपरिषद पंढरपूर**

---

### IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडकडून** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन न केल्यामुळे आणि त्यांचे व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे एनपीए (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्याकडून देय असलेली रक्कम, खालील तक्त्यात अधिक तपशीलवार वर्णन केल्यानुसार, जारी केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केली आहे आणि उक्त रकमेवर पुढे व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 138470029 | मालमत्तेवर कर्ज | 1. अण्णासो बाळासो कसबे 2. हेमा अण्णासाहेब कसबे | 14/03/2026 | INR 4,12,959.41/- |

**मालमत्तेचा पत्ता :** रहिवासी घराचा सर्व तुकडा आणि पार्सल ग्रामपंचायत मिळकत क्रमांक २८६, एकूण जमीन क्षेत्र ५३१ चौ. फूट. आणि बिल्ट-अप क्षेत्र ४००.०० चौ. फूट., गावात स्थित : सौंदरे, ग्रामपंचायत : सौंदरे, तालुका : बार्शी, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०१, आणि सीमा :- पूर्वेस - पाटील, पश्चिमेस - भावकी रोड, उत्तरेस - भागीरथी गुळवे, दक्षिणेस - देविदास पलंगे.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 127611836 | मालमत्तेवर कर्ज | 1. रमजान नझीर मुलाणी 2. रिजवाना रमजान मुलाणी | 02/04/2026 | INR 10,41,198.67/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत पुळूजच्या नोंदवहीमध्ये ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक १०० म्हणून नोंद असलेली, निवासी घराची संपूर्ण जागा व इमारत; एकूण जमिनीचे क्षेत्र १३८५ चौ. फूट; दगड, विटा आणि काँक्रीट वापरून बांधलेले हे घर असून, तळमजल्याचे क्षेत्र = १०८५.०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्र = १०८५.०० चौ. फूट आहे. गाव : पुळूज, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे ही मालमत्ता स्थित असून, तिच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत. पूर्व - रस्ता, पश्चिम - संदीपान गोरे, उत्तर - मनसूफ मुलाणी, दक्षिण - नझीर मुलाणी.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 122961647 | मालमत्तेवर कर्ज | 1. संदिपान गजेंद्र काळे 2. कविता सिध्दनाथ काळे | 20/03/2026 | INR 9,10,534.78/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १९४ चा दक्षिण बाजूकडील भाग (क्षेत्र ३३० चौ.फूट) आणि १९४/अ (क्षेत्र ३३० चौ. फूट), एकूण जमिनीचे क्षेत्र ६६० चौ.फूट; दगड, विटा आणि काँक्रीट वापरून बांधलेले निवासी घर, ज्याच्या तळमजल्याचे क्षेत्र ५२८.०० चौ. फूट आहे; एकूण बांधकाम क्षेत्र = ५२८.०० चौ. फूट. स्थित : गाव - वाडीकुरोली, ग्रामपंचायत - वाडीकुरोली (ग्रामपंचायत कार्यालयाच्या मागे), तालुका - पंढरपूर, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४. आणि खालील प्रमाणे सीमांकित : पूर्व - रस्ता, पश्चिम - घर क्र. १९५, उत्तर - घर क्र. १५१, दक्षिण - घर क्र. १९३.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 126622076 | मालमत्तेवर कर्ज | 1. गणेश बिरू गाडेकर 2. सीमा गणेश गाडेकर | 13/04/2026 | INR 7,18,538.21/- |

**मालमत्तेचा पत्ता :** दगड, विटा आणि काँक्रीटचा वापर करून बांधलेले निवासी घर; ज्याचा तळमजल्याचे क्षेत्रफळ ६५० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ ५४१.६६ चौ. फूट आणि एकूण जमिनीचे क्षेत्रफळ ११२५ चौ. फूट इतके आहे. सदर मालमत्ता मिळकत क्रमांक ११६, येवती गाव (तालुका मुधोळ, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र) येथे स्थित आहे. तसेच, सदर मालमत्तेच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत:- पूर्व - रस्ता; पश्चिम - कैलास ढेकणे; उत्तर - दत्ता गाडेकर; दक्षिण - परमेश्वर गाडे.

याद्वारे आपणास सूचित करण्यात येते की, वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) ला थकीत रक्कम, त्यावरील कराराप्रमाणे लागू होणारे व्याज आणि इतर खर्च व शुल्क, या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा करावेत. या मुदतीत पैसे भरण्यास कसुरी केल्यास, स्वाक्षरीकर्ता बँक अधिकारी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** थकबाकी वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण मालमत्तेवर सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यास बांधील राहतील. शिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत आपणास सदर तारण मालमत्ता विक्री, भाडेतत्त्व किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**सही/-**
**अधिकृत अधिकारी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : 29/04/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**






## महत्त्वाचे

### टेनिसपटू झ्वेरेवची विजयी घोडदौड सुरू

**माद्रिद :** अ‍ॅलेक्झांडर झ्वेरेवने माद्रिद खुल्या स्पर्धेचा दबाव असताना तो झुगारून शेवटच्या क्षणी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत एटीपी मास्टर्स स्पर्धेतील आपली विजयी घोडदौड सुरू ठेवली आहे. दुसरे मानांकन असलेला हा जर्मनीचा खेळाडू दुसऱ्या सेटमध्ये ५-३ असा आघाडीवर असताना त्याला विजयी सर्व्हिस करता आली नव्हती, त्यामुळे त्याचा प्रतिस्पर्धी टेरेंस आत्मान याने सामन्याला कलाटणी देण्याचा प्रयत्न केला. मात्र, झ्वेरेवने स्वत: सांभाळले व सामन्यातील विजय खेचून आणला. मनोलो सॅन्टाना स्टेडियमवर सुमारे दीड तास रंगलेल्या या सामन्यात झ्वेरेवने अखेर ६-३, ७-६ अशी बाजी मारली. दोनवेळेचा माद्रिद विजेता झ्वेरेव अशा तऱ्हेने नवव्यांदा स्पर्धेत सहभागी होताना नवव्यांदा अंतिम सोळात दाखल झाला.

### टेबल टेनिस स्पर्धेत खेळताना खेळाडूचा मृत्यू

**पुणे :** तामिळनाडूचे प्रौढ खेळाडू आय. एम. लुईस राज हे येथे आयोजित ३२ व्या राष्ट्रीय प्रौढ टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत सामना खेळत असताना अचानक खाली कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला. राज हे ६५ वर्षांवरील गटाचा सामना खेळत होते. पुण्याजवळील म्हाळुंगे-बालेवाडीस्थित शिवछत्रपती क्रीडा संकुलात आयोजित या स्पर्धेत पुरुष एकेरीचा तिसऱ्या फेरीचा सामना आंध्र प्रदेशच्या व्ही. व्ही. रमना यांच्याविरुद्ध राज खेळत असताना ही घटना घडली. सुरुवातीचे दोन गेम जिंकून २-० अशी आघाडी घेणारे राज तिसऱ्या गेममध्ये ५-४ असे पुढे असताना दुपारी सुमारे सव्वा बाराच्या सुमारास ते अचानक खाली कोसळले. स्पर्धा स्थळी असलेल्या पॅरामेडिक्स चमूने तातडीने कारवाई करीत त्यांच्यावर उपचार करण्याचा प्रयत्न केला. उपचाराला कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांना तातडीने नजीकच्या इस्पितळात नेण्यात आले असता तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. हृदयविकाराच्या धक्क्याने त्यांचा मृत्यू झाला असावा, असे सांगण्यात आले. शवविच्छेदनानंतर त्याची पृष्टी झाली. नंतर त्यांचे पार्थिव चेन्नईला पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली.

### फुटबॉलच्या अंतिम सामन्यात ओमान इराणविरुद्ध झुंजणार

**सान्या :** येथे सुरू असलेल्या आशिया बीच गेम्स स्पर्धेतील फुटबॉलच्या अटीतटीच्या उपांत्य सामन्यात ओमानने सौदी अरब संघाचा ५-४ असा पराभव करीत स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली आहे. सामी फैल अल बुलुशीची हॅट्ट्रिक या उपांत्य सामन्याचे आकर्षण ठरली. ओमानची अंतिम लढत उद्या बुधवारी इराणविरुद्ध होणार आहे. इराणने आपल्या उपांत्य सामन्यात फिलिस्तीनला एकतर्फी सामन्यात ९-१ असे नमविले होते. युद्धाच्या सावटाखाली असलेला इराणचा फुटबॉल संघ अंतिम सामन्यात कशी कामगिरी बजावतो, याकडे आता साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### स्नायुदुखीने त्रस्त एम्बाप्पे स्पर्धेबाहेर होण्याची शक्यता

**माद्रिद :** रियल माद्रिद संघाकडून आघाडीच्या फळीत खेळताना दिग्गज फुटबॉलपटू किलियन एम्बाप्पे सध्या स्नायुदुखीने त्रस्त आहे. या त्रासापायी त्याला



फुटबॉल लीग स्पर्धेच्या उर्वरित सत्राला मुकावे लागण्याची शक्यता आहे. ला लीगा फुटबॉल स्पर्धेतील शेवटच्या पाच साखळी सामन्यात एम्बाप्पे खेळेल की नाही, अशी शंका व्यक्त केली जात आहे. यात १० मे रोजी एफसी बार्सिलोनाविरुद्ध होणाऱ्या सामन्याचाही समावेश आहे. शुक्रवारी रात्री रियल बेटिसविरुद्ध सामना खेळताना एम्बाप्पेला स्नायुदुखीचा त्रास उद्भवला होता. हा सामना १-१ असा बरोबरीत सुटला होता. सामना संपल्यानंतर त्याने प्राथमिक उपचार घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुखणे जास्त वाढल्यामुळे त्याला इस्पितळात धाव घ्यावी लागली. संपूर्ण तंदुरुस्त होण्यासाठी त्याला काही दिवस विश्रांतीचा सल्ला दिला जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### पाकिस्तान हॉकी संघात खेळाडूंचा असंतोष

**कराची :** एफआयएच पुरुष प्रो लीग-२०२६ स्पर्धेतील भारताविरुद्ध होणाऱ्या सामन्याच्या आधीच पाकिस्तान हॉकी संघात असंतोष पसरला आहे. सामना महत्त्वपूर्ण असूनही पाकिस्तान हॉकी संघाच्या तयारीचा अजून काही पत्ता नाही. त्यामुळेच की काय पाकिस्तानी हॉकीपटू पाकिस्तान हॉकी महासंघावर नाराज आहेत. या खेळाडूंचे अजूनही प्रशिक्षण शिबिर सुरू झालेले नाही, विदेशी प्रशिक्षकाची नियुक्तीही करण्यात आलेली नाही. असमाधानकारक सोयी-सुविधा व कमी मानधन यामुळे हे खेळाडू नाराज आहेत व तशी तक्रारही त्यांनी केली आहे. स्पर्धेतील पाकिस्तानचे भारताविरुद्धचे सामने येत्या २३ व २६ जून रोजी युनायटेड किंगडम येथे खेळले जाणार आहेत.

# स्वप्न मोठी पाहा, ऑलिम्पिकची तयारी करा!

## पंतप्रधान मोदींचा उदयोन्मुख फुटबॉलपटूंना सल्ला

◆ **गंगटोक, २८ एप्रिल**

स्वप्न पाहा, परंतु मोठी स्वप्न पाहा. आपण ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, त्यासाठी तुम्ही आतापासूनच तयारीला लागा, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथील उदयोन्मुख फुटबॉलपटूंमध्ये जोष भरला. सिक्किमच्या गंगटोक शहराच्या दौऱ्यावर असताना त्यांनी या खेळाडूंसोबत फुटबॉल खेळाचा आनंदही घेतला. भारतीय फुटबॉलचे भवितव्य उज्ज्वल असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तुम्ही खेळाच्या सरावापर्यंतच सीमित राहू नका, तर ऑलिम्पिक स्पर्धेत खेळण्याचे लक्ष्य निर्धारित करा आणि या लक्ष्यप्राप्तीसाठी परिश्रम घ्या, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. येत्या जून महिन्यात फिफा विश्वचषक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यापृष्ठभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी फुटबॉलच्या चाहत्यांमध्येही या स्पर्धेबाबत आवड निर्माण व्हावी म्हणून जोष भरला. भारतात क्रिकेटसोबतच फुटबॉलचे चाहतेही मोठ्या प्रमाणावर आहेत. तुम्ही फुटबॉलला प्राधान्य द्या, असे मोदी म्हणाले. त्यांच्या या पावलामुळे विश्वचषक स्पर्धेसारख्या मोठ्या स्पर्धेत भारताच्या सहभागावरून नवीन चर्चा सुरू झाली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी उदयोन्मुख खेळाडूंसोबत फुटबॉल खेळताना

याप्रसंगी खेळाडूंसोबत फुटबॉल खेळताना त्यांच्यासोबत वेळही घालविला व त्यांना मार्गदर्शनही केले. एवढेच नव्हे तर मोदी यांनी फुटबॉल खेळताना गोलही केले. त्यांनी राईट विंग तर कधी सेंटर फॉर्वर्डवरून चेंडूला गोल पोस्टपर्यंत नेले. गोल करताना त्यांनी डाव्या व उजव्या पायांचा कौशल्याने वापर केला.


खेळामध्ये नुसता सराव करून काही उपयोग नाही, सोबत स्पर्धाही खेळायला पाहिजेत. त्यातूनच आपल्याला शिकायला मिळते. स्वत:मध्ये जोष निर्माण होतो. आपल्याला आगामी काळात फुटबॉलला आणखी लोकप्रिय करायचे आहे. आपल्याला माहिती असेलच की भारत २०३६ सालच्या ऑलिम्पिक स्पर्धेच्या यजमानपदासाठी प्रयत्न करीत आहे. तोपर्यंत तुम्ही परिपक्व खेळाडू व्हाल. त्यामुळे आपण आतापासून परिश्रम घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि ऑलिम्पिक स्पर्धेच्या तयारीचे लक्ष्य निर्धारित केले पाहिजे, असा सल्ला मोदी यांनी उपस्थित उदयोन्मुख खेळाडूंना दिला. 'गंगटोकची एक रम्य सकाळ, सिक्किममध्ये आपल्या लहान मित्रांसोबत फुटबॉल खेळण्याची मजा काही औरच आहे,' अशी पोस्ट पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर केली आहे. सोबत फोटोही टाकले आहेत. (वृत्तसंस्था)

# मुंबईसमोर हैदराबादचे कडवे आव्हान

◆ **मुंबई, २८ एप्रिल**

पाचवेळचा विजेता मुंबई इंडियन्स संघ विजयाच्या मार्गावर परतण्यासाठी धडपड करीत आहे. अशातच त्यांचा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेतील पुढील साखळी सामना सनरायझर्स हैदराबादसोबत उद्या बुधवारी खेळला जाणार आहे. वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या या सामन्यात यजमान मुंबई संघासमोर हैदराबाद संघाचे कडवे आव्हान असून त्याचा सामना यजमान संघ कसा करतो त्यावरच त्यांचे स्पर्धेतील भविष्य ठरणार आहे. हैदराबाद संघ सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे, त्यामुळे या सामन्यात यश खेचून आणायचे असेल तर मुंबईला सर्वच क्षेत्रात चांगली कामगिरी बजवावी लागणार आहे.

मुंबई संघाचे आतापर्यंत सात सामने झाले असून त्यापैकी पाच सामन्यांमध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला आहे. चार गुणांसह हा संघ गुणतालिकेत नवव्या स्थानी आहे. चेन्नई संघाकडून १०३ धावांनी पराभवाचा दणका सहन करावा लागल्यामुळे या संघाचा नेट रन रेटही गडबडला आहे. टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघातील चार खेळाडूंचा या मुंबई संघात समावेश असला तरी कर्णधार हार्दिक पंड्या (३ विकेट, ९७ धावा) आणि सूर्यकुमार यादव (११० धावा) यांनी अद्याप पाहिजे तशी कामगिरी बजावलेली नाही. तिलक वर्माने



गुजरात टायटन्सविरुद्ध खेळताना आयपीएलमधील आपल्या पहिल्या शतकाची नोंद केली होती आणि त्यामुळेच मुंबई संघाला सलग चौथ्या सामन्यातील पराभवाच्या नामुष्कीपासून वाचता आले होते. त्यानंतर चेन्नईने पराभूत केल्यामुळे मुंबईला आता पुन्हा एकदा विजयाच्या मार्गावर परतण्यासाठी अथक परिश्रम घ्यावे लागणार आहे. मुंबईचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यांचीही कामगिरी निराशाजनकच दिसून येत आहे. त्याला आतापर्यंत फक्त दोनच फलंदाज बाद करता आले आहेत. ट्रेंट बोल्ट व दीपक चाहर (प्रत्येकी एक विकेट्स) यांनाही अजून आक्रमक गोलंदाजीचे प्रदर्शन करता आलेले नाही. रोहित शर्माची अनुपस्थितीही मुंबई संघाला प्रकर्षाने जाणवत आहे. त्याच्या जागी डावाचा प्रारंभ करण्यासाठी येत असलेला दानिश मालेवारही अजून प्रभावी ठरलेला नाही.

मुंबई आपली पराभवाची मालिका तोडण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही, याची हैदराबाद संघाला चांगलीच जाणीव आहे. अशापरिस्थितीत फलंदाजीला अनुकुल असलेल्या वानखेडेच्या खेळपट्टीवर हैदराबादला फलंदाजांकडून मोठ्या अपेक्षा राहतील. याआधीच्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने शतक ठोकल्यानंतरही हैदराबादने राजस्थान रॉयल्स संघाचा पराभव केला होता.

टी-२० विश्वचषक स्पर्धेत अपेक्षित कामगिरी करू न शकणारा अभिषेक शर्मा याल सूर गवसलेला दिसून येत असून त्याचा फायदा हैदराबाद संघ घेऊ शकतो. त्याने आतापर्यंत २१२.२९ च्या स्ट्राईक रेट आणि ५४.२८ च्या सरासरीने ३८० धावा नोंदविल्या आहेत. यात एक शतक व तीन अर्धशतकांचा समावेश आहे. ईशान किशन आणि हेन्रिक क्लासेन यांनीही प्रभावी फलंदाजी केली आहे. कर्णधार पॅट कमिन्सच्या परतण्यामुळे हैदराबादचे गोलंदाजीचे आक्रमण मजबूत झाले आहे. मुंबईच्या फलंदाजांना या गोलंदाजापासून सावध राहावे लागणार आहे. हा हैदराबाद संघ गुणतालिकेत सध्या तिसऱ्या स्थानावर आहे. (वृत्तसंस्था)

> **आजचा सामना**
> **मुंबई इंडियन्स**
> **वि. सनरायझर्स हैदराबाद**
> **स्थळ :** वानखेडे स्टेडियम, मुंबई
> **वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
> **थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

## टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी इंग्लंडचा महिला संघ जाहीर

◆ **लंडन, २८ एप्रिल**

इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाने येत्या आयसीसी महिलांच्या टी-२० विश्वचषक-२०२६ क्रिकेट स्पर्धेसाठी इंग्लंडच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. अष्टपैलू नॅट स्कायवर ब्रंट या संघाचे नेतृत्व करणार आहे. ब्रंटच्या नेतृत्वाखालील हा संघ मे-जून महिन्यात भारत आणि न्यूझीलंड विरुद्ध खेळल्या जाणाऱ्या मालिकेतही भाग घेणार आहे. त्यानंतर टी-२० विश्वचषक स्पर्धा खेळली जाणार आहे. ब्रंटची ही सातवी टी-२० विश्वचषक स्पर्धा असेल.

भारतीय महिला संघ आपल्या इंग्लंड दौऱ्यात तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळेल आणि लॉर्डसवर एकमेव कसोटी सामना खेळेल. टी-२० सामने मेच्या शेवटच्या आणि जूनच्या सुरुवातीच्या आठवड्यात होईल. कसोटी सामना १० ते १३ जुलैदरम्यान खेळला जाईल. प्रतिष्ठेच्या मैदानावर होणाऱ्या या सामन्याप्रसंगी इंग्लंड महिला संघाच्या ५० व्या वर्षाचे औचित्य राहणार आहे. १८ वर्षीय सरेची फिरकीपटू टिली कोर्टिन कोलमन हा नवीन चेहरा इंग्लंड संघात दिसत आहे. याशिवाय वार्विकशायरची इसी वोंग आणि डरहॅमची लॉरेन फायलर यांनाही पहिल्यांदा इंग्लंडच्या टी-२० संघात स्थान देण्यात आले आहे.

**इंग्लंडचा महिला संघ :** नॅट स्वायवर ब्रंट, लॉरेन बेल, ॲलिस कॅप्सी, टिली कोर्टिन कोलमन, चार्ली डिन, सोफिया डंकली, सोफी एकलेस्टोन, लॉरेन फायलर, डॅनी गिब्सन, ॲमी जोन्स, फ्रेया कॅम्प, हीथर नाईट, लिन्से स्मिथ, इसी वोंग आणि डॅनी वॅट हॉज. (वृत्तसंस्था)

# भारतीय महिला उबेर चषक स्पर्धेतून बाहेर

## चीनकडून ०-५ फरकाने पराभूत ● आता लक्ष थॉमस चषकाकडे

◆ **होर्सेंस (डेन्मार्क), २८ एप्रिल**

दोन वेळेची ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू चांगल्या फॉर्ममध्ये असतानाही त्याचा फायदा तिला घेता आला नाही. एवढेच नव्हे तर तिच्या इतर सहकारी खेळाडूही महत्त्वाच्या क्षणी चांगली कामगिरी करू शकल्या नाही त्यामुळे भारतीय महिला पथकाला उबेर चषक बॅडमिंटन स्पर्धेच्या बाहेर व्हावे लागले. भारतीय महिला पथकाला चीनकडून ०-५ अशी एकतर्फी मात खावी लागली.

सुरुवातीच्या सामन्यात यजमान डेन्मार्ककडून २-३ असा पराभव पत्करावा लागल्यानंतर भारतीय महिला संघाने युक्रेनवर ४-१ अशी मात दिली आणि आपल्या उपांत्यपूर्व फेरीतील प्रवेशाच्या आशा कायम राखल्या होत्या. उबेर चषक स्पर्धेत १६ वेळा अजिंक्यपद पटकाविणाऱ्या चीनकडून भारताला स्पर्धेत आतापर्यंत झालेल्या तिन्ही सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे.

चीनविरुद्धच्या सामन्यात सिंधूने चांगली सुरुवात केली होती. निर्णायक सेटमध्ये ती १८-१२ अशी पुढे होती. शेवटी तिला जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानी असलेल्या वांग झियीकडून १६-२१, २१-१९, १९-२१ अशी मात खावी लागली. दरम्यान, उन्नती हुडा आणि तन्वी शर्माच्या जागी अन्य दोन एकेरीच्या सामन्यांसाठी ईशरानी बरुआ व देविका सिहाग यांचा संघात समावेश करण्यात आला होता. मात्र, त्याही प्रभावी कामगिरी करू शकल्या नाही. प्रिया कोंजेंगबद आणि श्रुती मिश्रा यांना पहिला दुहेरीच्या सामन्यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असणारी जोडी लियू शेंग शू आणि टॅन निंग यांनी २१-११, २१-८ अशी लिलया मात दिली. ईशरानीने टोकिओ ऑलिम्पिक विजेत्या चेन युफेईला चांगली लढत दिली. मात्र,




महत्त्वाच्या क्षणी मिळालेल्या संधी तिने गमावल्या आणि तिला २२-२०, २१-१३ असा पराभव पत्करावा लागला. दुसऱ्या एकेरीच्या लढतीत लुओ जू मिन आणि झांग शू जियान यांनी त्रिसा जॉली आणि कविप्रिया सेल्वम या भारतीय जोडीला तीन सेट्सच्या परिश्रमानंतर ५९ मिनिटांत २१-१०, १२-२१, २१-१९ असे पराभूत केले. जागतिक क्रमवारीत ४३ व्या स्थानी असलेल्या देविकाला चांगली सुरुवात करूनही त्याचे सातत्य कायम राखता आले नाही. तिसऱ्या एकेरीच्या लढतीत तिला ९७ वे मानांकन असलेल्या जू वेन झिंगने १९-२१, २१-१७, २१-१० असा पराभवाचा धक्का दिला.

आता भारतीय पथकाच्या आशा पुरुष संघावर आहेत. भारतीय पुरुषांच्या थॉमस चषक स्पर्धेतील आपल्या अ गटातील शेवटच्या साखळी सामन्यात चीनविरुद्ध झुंज द्यायची आहे. २०२२ सालचा विजेता असलेल्या भारतीय पुरुष संघाने ऑस्ट्रेलियाला ५-० असे नमविण्याआधीच आपला उपांत्यपूर्व फेरीतील प्रवेश निश्चित केला होता. भारत आणि चीन सध्या गटात आघाडीवर आहेत. भारताने कॅनडाला ४-१ असे नमवून विजयी शुभारंभ केला होता. चीननेही आपल्या सलामीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ५-० असाच धुव्वा उडविला होता. नंतर चीनने कॅनडाला ४-१ असेच पराभूत केले होते. भारत-चीन यांच्यात बुधवारी गटातील शेवटचा साखळी सामना होणार आहे. या सामन्यातील विजेता संघ अ गटात अव्वल ठरणार आहे. (वृत्तसंस्था)

# राष्ट्रकुल भारोत्तोलन स्पर्धेत भारताचा सोनेरी चौकार

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

भारतीय भारोत्तोलकांनी उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन करीत समोआच्या अपिया येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल ज्युनियर भारोत्तोलन अजिंक्यपद आणि युनिव्हर्सल चषक (सीनियर) दुसऱ्या दिवशी चार सुवर्णपदके पटकाविली आहेत.



सुनील सिंहने ६५ किलो पुरुष विभागात एकूण २७१ किलो (स्नॅच १२६ किलो, क्लीन ॲण्ड जर्क १४५ किलो) वजन उचलून सोनेरी शुभारंभ करून दिला. त्यानंतर ऐसांगफा गोगोईने ५८ किलो महिला विभागात आणि अभिनव गोगोईने ७१ किलो पुरुष विभागात सुवर्णपदक प्राप्त केले. ऐसांगफाने १८५ किलो (स्नॅच ७९, क्लीन ॲण्ड जर्क १०६ किलो) आणि अभिनवने एकूण २८४ (स्नॅच १२९, क्लीन ॲण्ड जर्क १५५ किलो) वजन उचलून सोनेरी यश संपादन केले. युनिव्हर्सल चषकमध्ये अरुणाचल प्रदेशच्या चारू पेसीने पुरुषांच्या ६५ किलो वजनगटात २८९ किलो (स्नॅच १२७, क्लीन ॲण्ड जर्क १६२) भार उचलून भारताला चौथ्या सुवर्णपदकाचा मान मिळवून दिला. दरम्यान, भारतीय भारोत्तोलन महासंघाचे अध्यक्ष सहदेव यादव यांनी स्पर्धेतील या कामगिरीसाठी खेळाडू, प्रशिक्षक आणि सहायक कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे (वृत्तसंस्था)

## धावपटू विस्मया दोन, श्रीनिवास चार वर्षांसाठी निलंबित

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

२०१८ सालच्या आशियाई स्पर्धेत चार बाय ४०० मीटर रिले दौड स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी भारतीय धावपटू व्ही. के. विस्मया बंदी असलेल्या अंमलपदार्थाचे सेवन केल्याचे सिद्ध झाल्यामुळे तिला दोन वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. नमुना देण्यास नकार दिल्याच्या आरोपाखाली वेगवान धावपटू एन. शन्मुगा श्रीनिवास याला चार वर्षांसाठी निलंबनाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

हा प्रतिबंधित पदार्थ सेवन केल्याप्रकरणी ती दोन वर्षांपूर्वीच दोषी आढळली होती. आता तिला डोपिंग विरोधी संस्था नाडाच्या डोपिंग विरोधी शिस्तपालन पॅनलने दोन वर्षांच्या निलंबनाची शिक्षा सुनावली आहे. प्रतिबंधित क्लोमिफिन पदार्थाचे सेवन केल्याचे सिद्ध झाल्यामुळे तिला २०२४ साली अस्थायी रूपात निलंबित करण्यात आले होते. तिची ही शिक्षा २९ ऑक्टोबर २०२४ पासून ग्राह्य धरली जाणार असल्यामुळे तीन आता सहा महिन्यांनंतर पुन्हा एकदा मैदानावर परतता येणार आहे. वेगवान धावक एन. शन्मुगा श्रीनिवास हा नमुना देण्यापासून स्वत:ला दूर ठेवत होता, नकार देत होता. त्यामुळे त्याच्यावर नमुना देण्यासाठी नकार देण्याचा आरोप ठेवून त्याला ६ फेब्रुवारी २०२५ पासून चार वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

# प्रभसिमरन सिंहचे संयमी; स्टॉयनिसचे आक्रमक अर्धशतक







◆ **मुल्लानपूर, २८ एप्रिल**

प्रभसिमरन सिंहच्या संयमी ५९ आणि मार्कस स्टॉयनिसच्या आक्रमक नाबाद ६२ धावा या जोरावर पंजाब किंग्ज संघाने राजस्थान रॉयल्स संघाविरुद्ध इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेतील आपला साखळी सामना खेळताना निर्धारित २० षटकांत ४ बाद २२२ धावा केल्या होत्या. पंजाबचा संघ सध्या गुणतालिकेत आघाडीवर असल्यामुळे या सामन्यात दमदार फलंदाजी करील, अशी अपेक्षा होती. प्रभ आणि मार्क या दोघांनी अर्धशतकी धावांची फलंदाजी करीत आपल्या चाहत्यांच्या अपेक्षा पूर्ण केल्या, त्यामुळे पंजाब संघाला २०० धावांचा पल्ला पार करता आला.

राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यानंतर पंजाब किंग्जच्या प्रभसिमरन सिंह आणि प्रियांश आर्य यांनी डावाचा प्रारंभ केला. या दोघांनी संयमीपणे डावाला सुरुवात केली. दोघांनी सलामीला ३७ धावा जोडल्या असता ही जोडी आर्चरने तोडली. प्रियांशचा एक झेल बर्गरने टिपला. ११ चेंडूंची फलंदाजी करताना प्रियांशने २९ धावा ठोकल्या. यात पाच चौकार व एका षटकाराचा समावेश होता. प्रियांशच्या जागी आलेल्या कूपर कॉनलीने दुसऱ्या गड्यासाठी प्रभसिमरनला ५९ धावांसाठी साथ दिली. मात्र, तोही जास्त वेळ खेळपट्टीवर टिकू शकला नाही. अवघ्या १४ चेंडूंची फलंदाजी करताना कूपरने दोन चौकार व तीन षटकारांच्या साह्याने ३० धावांचे भरीव योगदान दिले. त्याला पुंजाच्या गोलंदाजीत फरेराने झेलबाद केले. एका बाजूने दोन फलंदाज बाद झाले असताना दुसऱ्या टोकाला मात्र प्रभसिमरन समर्थपणे फलंदाजी करीत होता. त्याला नंतर कर्णधार श्रेयस अय्यरची साथ लाभली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ४८ धावा जोडून आपल्या संघाला शतकी धावांचा पल्ला पार करून दिला. सामना १४ व्या षटकांत आला असताना प्रभसिमरनला आपला डाव आटोपता घ्यावा लागला. यश पुंजाने त्याला रियानच्या हाती झेलबाद केले. आपल्या संघासाठी मोठे योगदान देताना प्रभसिमरनने ४४ चेंडूंत सहा चौकार मारले व ५९ धावा केल्या. त्याला फक्त एकच षटकार मारण्यात यश आले.

नंतर श्रेयस आणि मार्कस स्टॉयनिस यांनी आपल्या पंजाब संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न करीत धावफलक हलता ठेवला. कूपरपाठोपाठ श्रेयसनेही ३० धावांचे योगदान दिले. त्याने २७ चेंडू खेळून काढताना प्रत्येकी एक चौकार व षटकार मारला. श्रेयस बर्गरच्या गोलंदाजीत यष्टिमागे जुरेलकरवी झेलबाद झाला. त्याची जागा सूर्यांश शेडगे याने घेतली. त्याने स्टॉयनिसला उत्कृष्ट साथ दिली. स्टॉयनिसने आक्रमक फलंदाजी करताना २२ चेंडूंत नाबाद ६२ धावा काढल्या. यात चार चौकार व सहा षटकारांचा समावेश होता. दुसऱ्या टोकाला सूर्यांश नाबाद (३ धावा, २ चेंडू) राहिला. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी नाबाद ४१ धावा जोडल्या. (वृत्तसंस्था)

# दोन जन्मदाखले सादर करणारी महिला पहेलवान स्पर्धेपासून वंचित

◆ **नवी दिल्ली, २८ एप्रिल**

भारतीय कुस्ती महासंघाने संभाजी नगर येथे आयोजित राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेच्या पहिल्या दिवशी एका महिला पहेलवानाला स्पर्धेतील सहभागापासून रोखले आहे. कारण, तिच्या वडिलांनी वेगवेगळ्या राज्यांतील दोन जन्मदाखले सादर केले आहेत. शासकीय पातळीवर कसा सावळागोंधळ होत असतो, हे यातून स्पष्ट झाले आहे.

मध्य प्रदेश राज्याचे प्रतिनिधित्व करीत असलेली ५७ किलो वजनगटातील या महिला पहेलवानाच्या (नाव गुप्त ठेवण्यात आले आहे) जन्म प्रमाणपत्रात विसंगती आढळून आली, त्यानंतर तिला स्पर्धेतील सहभागापासून अधिकाऱ्यांनी रोखले. वृत्तसंस्थेला प्राप्त झालेल्या कागदपत्रांनुसार, हे जन्मप्रमाण पत्र मध्य प्रदेश सरकारतर्फे जारी करण्यात आले असून त्यात जन्मतारीख २६ ऑगस्ट २०१० दाखविण्यात आली आहे. मात्र, पंजीकरण आणि जारी करण्यात आलेली तारीख १६ नोव्हेंबर २०२१ दाखविण्यात आली आहे. ही तारीख जन्माच्या एक दशकानंतरची आहे. या प्रमाणपत्रावर श्योपूर जिल्ह्याचा पत्ता दिला आहे आणि ते ग्राम पंचायतने जारी केले आहे. महासंघाच्या सूत्रानुसार, पंजीकरणाच्या विलंबाबाबत चौकशी केली असता पहेलवानाच्या वडिलांनी लगेच राजस्थान सरकारतर्फे जारी करण्यात आलेले अन्य एक जन्मप्रमाणपत्र सादर केले. या नवीन प्रमाणपत्रात जन्मतारीख २६ ऑगस्ट २०१० नोंदविण्यात आली आहे. मात्र, त्यात पंजीकरणची तारीख १ सप्टेंबर २०१० दाखविण्यात आली आहे. हे पंजीकरण राजस्थानच्या श्रीगंगानगर येथे झालेले आहे आणि जन्मस्थानासाठी तेथील एका खाजगी नर्सिंग होमचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, हे प्रमाणपत्र मोठ्या कालावधीनंतर एप्रिल २०२५ मध्ये जारी करण्यात आले आहे. जन्मतारखेत कोणताही फेरफार करण्यात आलेला नाही, यावरच पहेलवानाच्या वडिलांचा जोर होता. आमचे कुटुंब मध्य प्रदेशात स्थानांतरित झाल्यानंतर त्या राज्याकडूनही नवीन प्रमाणपत्र प्राप्त झाले, जेणेकरून संबंधित पहेलवानाला त्या राज्याचे प्रतिनिधित्व करता यावे, अशी माहितीही वडिलांनी दिली.

दरम्यान, महासंघाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित महिला पहेलवानाला स्पर्धेत प्रवेश देण्यास नकार दिला. मूळ कागदपत्रांची तपासणी न करता कोणतेही राज्य दुसरे प्रमाणपत्र कसे काय जारी करू शकते, असा प्रश्नही अधिकाऱ्यांनी उपस्थित केला. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### एनएमएमएस परीक्षेत विठ्ठलरावजी शिंदे प्रशालेची श्रुती सुरवसे जिल्ह्यात पहिली

**कुर्डूवाडी, दि. २८ एप्रिल-**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत, सोजरताई बहुउद्देशीय विकास मंडळ निमगाव टे. संचलित कै. विठ्ठलरावजी शिंदे प्रशाला अंबाडा, या विद्यालयातील श्रुती सरवदे ही जिल्ह्यात पहिली आली आहे. विद्यालयातून १५ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. त्यापैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रशालेचा निकाल ८० टक्के एवढा लागला. २४ एप्रिल रोजी राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता यादी जाहीर झाली. त्याम ध्ये मागास वर्गातून (एस.सी.) श्रुती सरवदे हिने १४३ गुण मिळवून जिल्ह्यात पहिला क्रमांक पटकावला. तसेच भटक्या विमुक्त प्रवर्गातून (एनटीसी) उत्कर्षा सरक हिने १३० गुण मि ळवून जिल्ह्यात ९ वा क्रमांक पटकावला. इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) आरती टोणपे हिने १२३ गुण (जिल्ह्यात ६७ वी) मिळवले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना केंद्राकडून ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना ननवरे ए. एच., हुलगे बी. एस., तांबोळी एफ. जे. आणि चव्हाण डी एल. यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ. संजय शिंदे तसेच संस्थेचे सचिव प्राचार्य आर. ए. ठोंबरे, विद्यालयाचे प्राचार्य जे.एन.रजपूत, माध्यमिक विभागाचे प्रमुख एम. एस. पाटील, उच्च माध्यमिक विभागाचे प्रमुख व्ही. एन. घाडगे, यशवंत प्रायमरी स्कूल अंबाडचे प्राचार्य एस.आर. होनमोटे यांनी अभिनंदन केले.





### नवले सिंहगड महाविद्यालयाच्या आरती गायकवाडला राष्ट्रीय विचार प्रेरणा पुरस्कार


**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक व वैचारिक क्षेत्रातही उल्लेखनीय यश संपादन केल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. विद्यार्थिनी आरती गायाकवाडने कोल्हापूर येथे आयोजित कार्यक्रमात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय विचार प्रेरणा पुरस्कार प्राप्त करून महाविद्यालयाचा मान उंचावला आहे. कोल्हापूर येथे आयोजित सोहळ्यात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत तिला सन्मानित केले. सम ाजकार्य, वैचारिक प्रबोधन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाबद्दल आरती गायकवाड हिची निवड केली होती. तसेच, मा. आ. संतेज पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सतेज काव्य संमेलनात सहभाग नोंदवत तिने आपली साहित्यिक गुणवत्ताही सिद्ध केली. या सहभागाबद्दल तिला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. उल्लेखनीय यशाबद्दल एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले व प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते आरती गायकवाडचा सत्कार करण्यात आला.

### पंढरपूरमध्ये ५ मे रोजी पं.उल्हासजी कशाळकर यांच्या गायनाची मैफिल

**पंढरपूर, दि. २८ एप्रिल-**

पं.विकास कशाळकर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पं.विकास कशाळकर फाऊंडेशन पंढरपूरतर्फे मंगळवारी (दि. ५ मे) ५:३० वाजता आरती मंडप प्रांगण भक्तीमार्ग श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पं.विकास कशाळकर यांचा सत्कार माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते होणार आहे. सत्कारानिमित्त पद्मश्री पं.उल्हास कशाळकर यांच्या शास्त्रीय गायनाचा आनंद घेता येणार आहे. पं.उल्हास कशाळकर यांना तबला साथसंगत पद्मश्री तालयोगी पं.सुरेश तळवलकर हार्मोनियम डॉ.प्रवीण कासलीकर करणार आहेत. पं.विकास कशाळकर फाऊंडेशन पंढरपूरमधील अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताच्या प्रचारासाठी सदैव प्रयत्नशील आहे. २०११ सालापासून अनेक संगीत मैफिली आयोजित केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय किर्तीचे गायक आणि गायिका यांच्या सुरेल मैफिली आणि नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देत असल्याचे अध्यक्ष डॉ. प्रसाद कुलकर्णी यांनी सांगितले. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून मोठ्या संख्येने उपस्थितीचे आवाहन सचिव ज्ञानेश्वर दुधाणे, उपाध्यक्ष उदय उत्पात, सदस्य एस.पी.कुलकर्णी, राजेश खिस्ते, आण्णासाहेब सुरवसे, धनंजय मनमाडकर, माधूरी जोशी, स्वानंदी काणे, प्रज्ञा कुलकर्णी यांनी केले आहे.





## निधन वृत्त...

### शिवलिंगप्पा मल्लाबादे

**अक्कलकोट, दि. २८ एप्रिल-**

वागदरी येथील रहिवासी, माजी सी. टी. सर्व्हेअर अधिकारी शिवलिंगप्पा बी. मल्लाबादे (वय ६७) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. सध्या ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात मानसेवी तत्वावर नोडल अधिकारी या पदावर कार्यरत होते. सोलापूर विद्यापीठातील वरिष्ठ लिपीक राजेश्री मल्लाबादे यांचे ते वडील होत.



### शारदा धुम्मा

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

उत्तर कसबा येथील मल्लिकार्जुन मंदिराजवळील शारदा शिवानंद धुम्मा (वय ८३)यांचे अल्प आजाराने मंगळवारी निधन झाले . त्यांची अंत्ययात्रा उद्या (बुधवारी) सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे.कसबा गणपती प्रतिष्ठानचे विश्वस्त अनंतकुमार उर्फ बीपीन धुम्मा यांच्या त्या मातोश्री व नगरसेविका बबीता धुम्मा यांच्या सासू होत.



# पशु-पक्ष्यांच्या तृष्णेसाठी एकता महिला मंचचा पुढाकार

**एक मायेचा ओलावा उपक्रम सुरू; सेल्फी स्पर्धेच्या माध्यमातून जनजागृतीचा प्रयत्न**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २८ एप्रिल-**

सूर्याचा पारा चाळीशी पार करत असून, ग्रामीण भागासह शहरातील पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटू लागले आहेत. अशा परिस्थितीत अन्नावाचून नाही, तरी पाण्यावाचून अनेक पशु-पक्ष्यांचा जीव जाण्याची भीती आहे. याच संवेदनशील विषयाची दखल घेत, सोलापूर जिल्ह्यातील एकता महिला मंच परिवाराच्या वतीने एक मायेचा ओलावा हा हृदयस्पर्शी उपक्रम राबवण्यात येत आहे.

उपक्रमांतर्गत महिलांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या घराची गच्ची, बाल्कनी, खिडकी, टेरेस किंवा अंगणात पक्ष्यांसाठी पाण्याची छोटी भांडी, मातीची मडकी किंवा सखल पात्रे ठेवावीत.



**सेल्फी स्पर्धा**

केवळ उपक्रम राबवून न थांबता, जास्तीत जास्त लोकांपर्यंत हा संदेश पोहोचवण्यासाठी एकता महिला मंचने एका नाविन्यपूर्ण 'सेल्फी स्पर्धेचे' आयोजन केले आहे. सहभागी नागरिकांनी किंवा सदस्यांनी पक्ष्यांसाठी पाणी ठेवतानाचा एक बोलका सेल्फी काढायचा आहे. हा फोटो एकता महिला मंचच्या अधिकृत ग्रुपवर शेअर करायचा आहे. प्राप्त फोटोंमधून सर्वोत्कृष्ट फोटोंची निवड केली जाईल. संबंधित सदस्यांना आकर्षक प्रोत्साहनपर बक्षीस देऊन गौरविण्यात येईल.

एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी उपक्रमाची माहिती देताना २८ एप्रिल ते २ मे या कालावधीत ही विशेष मोहीम चालणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक घराबाहेर एक तरी पाण्याचे भांडे असावे, हेच आमचे स्वप्न आहे. असे भावनिक आवाहन केले आहे.

**आपणही सहभागी व्हा!**

एकता महिला मंचच्या वतीने जिल्ह्यातील नागरिकांना आपल्या घरी पक्ष्यांसाठी पाणी ठेवा आणि या पवित्र कार्यात खारीचा वाटा उचला. तुमचा एक छोटासा प्रयत्न एका जिवाचा प्राण वाचवू शकतो. उपक्रमात सहभागी व्हा असे आवाहन केले आहे,

### शेतकऱ्याची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

**सोलापूर :** एका ४५ वर्षीय शेतकऱ्याने स्वतःच्या शेतात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज दुपारी दीड वाजता उघडकीस आली. शिवानंद बसवेश्वर जवळे ( रा.कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर) असे त्या गळफास घेतलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. शिवानंद हे आज दवाखान्याला जाऊन येतो म्हणून घरातून सकाळी साडेअकरा वाजता बाहेर पडले होते. त्यानंतर दुपारी शिवानंद यांचा भाऊ व मुलगा हे शेताकडे जात असताना त्यांना एका झाडाला शिवानंद यांनी गळफास घेतला असल्याचे दिसून आले. त्यांनी त्वरित गळफास सोडवून शिवानंद यांना जवळच्याच अश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. दरम्यान वळसंग पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार शेख यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात दुपारी दाखल केला.

### अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवले

**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस एकाने फूस लावून पळवून नेले. याप्रकरणी एकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी महिलेची १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला दि.२८ रोजी रात्री १.३० वाजता एकाने अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. रंग सावळा, उंची १५५ सें.मी., शरीर सडपातळ, शिक्षण आठवी, अंगात आकाशी रंगाचा पंजाबी ड्रेस अशा वर्णनाची मुलगी कोणाच्या निदर्शनास आल्यास महिला पोलीस उपनिरीक्षक डॉ.आरती कणेरी (९३२५४७८१११) यांना संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

### साठे प्रशाला शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी साठे; उपाध्यक्षपदी मुल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २८ एप्रिल-**

सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी नितीन साठे तर उपाध्यक्षपदी डॉ. रईस मुल्ला यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

जिल्हा परिषदेच्या एकमेव अशा माध्यमिक प्रशालेची शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत करण्यासाठी नुकतीच पालक सभा पार पडली. प्रारंभी मुख्याध्यापक तथा समितीचे सचिव नागेश खेडकर यांनी प्रशालेची माहिती सांगितली. माढ्याच्या नगराध्यक्षा तथा व्यवस्थापन समितीच्या सदस्या मिनल साठे, शाळा व्यवस्थापन समितीचे माजी





अध्यक्ष धैर्यशील भांगे, उपाध्यक्षा माधुरी साठे, मुख्याध्यापक नागेश खेडकर, सदस्य भैय्या खरात, प्रवीण पवार, किरण पवार सुरवसे उपस्थित होते.

नूतन शाळा व्यवस्थापन समिती अशी - नितीन साठे (अध्यक्ष), डॉ. रईस मुल्ला (उपाध्यक्ष), रूपाली मोरे, रेखा रोटे, उज्वला टिंगरे, स्वाती पवार, भाग्यश्री वाघमारे, जरीना मुलानी, महेश भांगे, प्रदीप राऊत, कविता पवार, धैर्यशील भांगे.

## लवकरच मंद्रूपमध्ये होणार सुसज्ज बसस्थानक

**●गौरीशंकर मेंडगुदले; आमदार देशमुख यांचा मंद्रूप बस स्थानकासाठी पाठपुरावा सुरू●**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर,दि. २८ एप्रिल-**

सीना भीमा खोऱ्यातील मध्यवर्ती ठिकाण व सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या मंद्रूप येथे अत्याधुनिक व सुसज्ज बस स्थानक उभारण्यासाठी आमदार सुभाष देशमुख पाठपुरावा करीत आहेत. सोलापूर विभागातून नवीन बस स्थानकाचा प्रस्ताव परिवहन महाव्यवस्थापकाकडे गेला आहे. लवकरच परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर नवीन बसस्थानक होणार असल्याची माहिती भाजप संघटन सरचिटणीस गौरीशंकर मेंडगुदले यांनी दिली.

आमदार सुभाष देशमुख यांच्या कार्यालयात परिवहन विभागाचे उपअभियंता तुषार चौधरी व विभागीय व्यवस्थापक अमोल गोंजारी यांच्याबरोबर मंद्रूप बसस्थानकासंदर्भात बैठक झाली. यावेळी मेंडगुदले यांनी नवीन



बसस्थानकासाठी ग्रामपंचायतकडून ठराव व जागेचा उतारा दिला असून प्रस्ताव मंजूरीबाबत विचारणा केली. त्यावेळी परिवहन अधिकाऱ्यांनी मंद्रूप बसस्थानकाचा प्रस्ताव महाव्यवस्थापकाकडे पाठविला असून परिवहन मंत्र्यांच्या मंजूरीनंतर बसस्थानक सुरू होणार असल्याचे सांगितले. त्यामुळे लवकरच मंद्रूपमध्ये बसस्थानक सुरू होणार असल्याने प्रवाशांची सोय होणार आहे.

**गावतलावाजवळ होणार बसस्थानक**

मंद्रूप गावतलावाजवळ ग्रामपंचायतीच्या मालकीची दीड एकर जागा आहे. नवीन बसस्थानकासाठी ग्रामपंचायतीकडून ठराव दिल्याने गावतलावाच्या संजयनगरजवळ नवीन बसस्थानक होणार आहे. त्यामुळे सर्व प्रवाशांसाठी सोयीची जागा होणार आहे.

> **प्रवाशांच्या सोईसाठी ग्रामपंचायतीकडून पाठपुरावा**
> मंद्रूपमधील प्रवाशांची गैरसोय दूर व्हावी. सुसज्ज बसस्थानक उभारणीसाठी मंद्रूप ग्रामपंचायतीकडून पाठपुरावा सुरू आहे. नवीन बसस्थानकासाठी ग्रामपंचायतीने गावतलावानजीक दीड एकर जागा दिली आहे. शासनाकडून प्रस्ताव मंजूर झाल्यास नवीन बसस्थानकासाठी ग्रामपंचायतीकडून सहकार्य करण्यात येईल.
> **- अप्पाराव कोरे,**
> पॅनलप्रमुख, मंद्रूप ग्रामपंचायत.

## कवठेकर प्रशालेचे एनएमएमएस परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२८ एप्रिल -**

राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती (छचचड) परीक्षेत पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या कवठेकर प्रशालेने दैदीप्यमान निकालाची परंपरा कायम राखली आहे.परीक्षेत प्रशालेचे ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, चौघांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून वार्षिक १२ हजार रुपये शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सु. र. पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी प्रशालेच्या विद्यार्थी केंद्रित नियोजन आणि कष्टाची फलश्रुती म्हणजे आजचे हे अप्रतिम यश असल्याचे गौरवोदगार काढले. कवठेकर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाचे फळ आहे, अशी भावना मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील यांनी व्यक्त केली. वर्षभर विशेष जादा तासिका, नियमित सराव परीक्षा आदी उपक्रम शाळेतर्फे राबविण्यात येतात. यामध्ये प्रशालेचे शिक्षक बालाजी नरळे यांचे विशेष योगदान लाभले आहे. वाडिले, मोहोळकर, शेलार आणि उपमुख्याध्यापिका विश्वासे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पर्यवेक्षक एम.बी.गडदे, जे.एम. शेलार सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते. यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा वीणा जोशी, चेअरमन नाना कवठेकर, मानद सचिव सु.त्रि.अभ्यंकर व सर्व सदस्यांनी आनंद व्यक्त केला आहे.



**शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी**
- मेटकरी शरयू एनटीसी प्रवर्गातून जिल्ह्यात प्रथम.
- गोरे दिग्विजय एनटीबी प्रवर्गातून जिल्ह्यात ९ वा.
- वसावे अनिकेत एसटी प्रवर्गातून जिल्ह्यात १४ वा.
- अधटराव ओंकार एसटी प्रवर्गातून जिल्ह्यात २५ वा.

## दोन दिवस पाणीपुरवठा बंद; गाळ साफ करण्यासाठी जॅकवेलवर काम

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २८ एप्रिल**

उचेठाण जॅकवेल येथील पाईपलाइन गाळाने चोक अप झाल्याने मंगळवेढा शहरात ३० एप्रिल आणि १ मे या दोन दिवसांत संपूर्ण पाणीपुरवठा बंद राहणार आहे. नगरपरिषदेने शहरवासीयांना जपून पाणी वापरण्याचे आवाहन केले आहे.

नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने जारी केलेल्या जाहिरातीनुसार, नदीपात्रातील इंटक वेलमधून जॅकवेलमध्ये पाणी आणणारी पाईपलाइन गाळाने बंद झाल्याने पंपाला अपुरे पाणी मिळत आहे. या दोषाचे निराकरण करण्यासाठी २९ एप्रिलपासून पाईपलाइनम धील गाळ काढण्याचे काम सुरू होत आहे. हे काम अत्यंत अडचणीचे आणि धोकादायक असल्याने पंपिंग बंद राहील. विभागाकडून दिवसरात्र प्रयत्न करून काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, ''शहरातील कोणत्याही भागात पाणीपुरवठा होणार नाही. नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि नगरपरिषदेला सहकार्य करावे.'' या काळात टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची सोय करण्यात येणार का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या दोषामुळे शहरवासीयांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता जाणवत असताना हा पुरवठा बंद होणे अडचणीचे ठरणार आहे. नगरपरिषदेकडून लवकरात लवकर काम पूर्ण करण्याची अपेक्षा आहे.

## वंदे भारतचा डबा रुळावरून घसरल्याने गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले

**सिद्धेश्वर ६-७ तास उशिरा धावली तर वंदे भारत एक्स्प्रेस रद्द**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

पुण्याजवळ वंदे भारत एक्सप्रेसचा डबा रुळावरून घसरल्यामुळे दी. २७ व २८ एप्रिल २०२६ सोलापूर-मुंबई मार्गावरील गाड्यांचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले. सोलापूरहून सुटणारी इंटरसिटी व सिद्धेश्वर एक्सप्रेस ६-७ तास उशिराने धावली. २८ एप्रिलची वंदे भारत एक्सप्रेस रद्द करण्यात आली, तर अनेक गाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आले.

पुणे स्टेशनवर अपघात झाल्यामुळे २८ एप्रिल २०२६ रोजी सोलापूरहून मुंबईकडे जाणारी वंदे भारत एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. मुंबई-सोलापूर वंदे भारत अपघातामुळे सिद्धेश्वर एक्सप्रेस ७ तासांहून अधिक उशिराने धावली.

रेल्वे प्रशासनाने तांत्रिक कारणास्तव अनेक गाड्यांचे मार्ग बदलले. काही गाड्या होटगी मार्गे वळवण्यात आल्या. सोलापूर स्टेशनवर सिग्नलच्या कामासाठी गुरुवारी ५ तासांचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे, ज्यामुळे गाड्यांच्या वेळेत बदल होईल. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना नॅशनल ट्रेन इन्क्वायरी सिस्टम किंवा भारतीय रेल्वेच्या अधिकृत वेबसाईटवरून गाडीची सद्यस्थिती तपासूनच प्रवास सुरू करण्याचे आवाहन केले आहे.



## विरुध्द दिशेने पिकअप चालवून दिली धडक; मोटरसायकलस्वार जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २८ एप्रिल-**

ब्रह्मपुरी-मंगळवेढा मार्गावरील कारखाना पाटीजवळ विरुद्ध दिशेने पिकअप चालवून एका मोटर सायकलस्वारास जोराची धडक दिली. धडकेत मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाला. मात्र घटनेनंतर पलायन केल्या प्रकरणी पिकअपचालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी आरती माने (वय ४०, रा.भोसे) यांचा जखमी पती दत्तात्रय माने हे बेगमपूर येथे श्रीकांत पाटील यांच्या टिपरवर ड्रायव्हर म्हणून कामाला आहेत.




दि.१८ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता ते मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ ई.बी. ८५६८ वरुन बेगमपूर येथून मंगळवेढयाकडे येत होते. दामाजी कारखाना पाटीजवळ पिकअप क्र.एम.एच.०९ सी यू.४८६० च्या चालकाने विरुद्ध दिशेने भरधाव वेगात येवून मोटर सायकलीस समोरुन धडक दिली. धडकेत दत्तात्रय यांच्या डोके, उजवा पाय, उजवा खुबा, बरगडीस मार लागून गंभीर जखमी झाले. मोटर सायकलचेही नुकसान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अपघातानंतर रस्त्याने जाणाऱ्या अण्णासाहेब पुजारी व बसस्थानकावरील प्रवासी गीता नामक महिला यांनी अॅम्ब्युलन्स बोलावून जखमीला सोलापूरला पाठविले. पिकअप भरधाव वेगाने मुंढेवाडी शिवारात कडबा भरण्यास गेल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. अपघाताचा तपास पोलीस करीत आहेत.

## वैराग ग्रामीण रुग्णालयाचा मार्ग मोकळा; लवकरच होणार पायाभरणी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २८ एप्रिल-**

वैराग व परिसरातील हजारो नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या वैराग ग्रामीण रुग्णालयाच्या कामाला आता मोठी गती मिळाली आहे. रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या जागेचा सातबारा व ताबा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. लवकरच या भव्य रुग्णालयाचा पायाभरणी समारंभ पार पडणार आहे.

वैराग ग्रामीण रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता.




मात्र, तहसीलदार शेख यांनी पुढाकार घेत दि. ४ मार्च रोजी या जागेचा अधिकृत करारनामा करून दिला. यामुळे रुग्णालयाच्या उभारणीतील कायदेशीर अडथळा दूर झाला आहे. दिनांक २ एप्रिल रोजी प्रत्यक्ष जागेवर सर्व विभागांच्या उपस्थितीत जागेचा ताबा देण्यात आला. यावेळी नगरपंचायत वैरागचे मुख्य अधिकारी, मंडळ अधिकारी, बार्शी भूमी अभिलेखचे उपाध्यक्ष (मोजणीदार), बार्शी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक, ग्राम महसूल अधिकारी आणि वैरागचे पोलीस निरीक्षक यांच्या उपस्थितीत जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर यांना जागेचा प्रत्यक्ष ताबा देण्यात आला. रुग्णालयासाठी निश्चित केलेल्या जागेची नोंदणी आता आरोग्य विभागाच्या नावे झाली आहे. गट नंबर: ४२२/२, एकूण क्षेत्र: ४ हेक्टर ४५ आर, रुग्णालयासाठी दिलेले क्षेत्र: २ हेक्टर ४५ आर. अशी नोंदणी झाली आहे. २० मार्च २०२६ रोजी या क्षेत्राचा सातबारा आणि आठ-अ उतारा जिल्हा शल्य चिकित्सक, सोलापूर यांच्या नावे झाला आहे.

**अमरराजे निंबाळकर यांच्या पाठपुराव्याला यश**

वैराग ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते अमरराजे निंबाळकर यांनी सातत्याने शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या या अविरत प्रयत्नांना अखेर यश आले असून, वैरागच्या सार्वजनिक हिताच्या या प्रकल्पासाठी त्यांनी घेतलेली मेहनत फलद्रुप ठरली आहे.

**लवकरच भूमिपूजन सोहळा**

जागेचे सर्व तांत्रिक आणि कायदेशीर सोपस्कार पूर्ण झाल्यामुळे आता इमारतीच्या बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. वैरागच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या या रुग्णालयाची पायाभरणी लवकरच एका भव्य कार्यक्रमात होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. या रुग्णालयामुळे ग्रामीण भागातील सामान्य रुग्णांना तातडीने आणि दर्जेदार उपचार मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

# सोलापूरकरांच्या 'मत'रुपी कर्जाची विकासाच्या माध्यमातून उतराई होवू

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली 'कृतज्ञता'



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सोलापूर शहर-जिल्ह्यातील मतदारांनी भारतीय जनता पार्टीच्या सर्व सदस्यांना भरभरून मतदान केले आणि एकहाती सत्ता दिली. सोलापूरकरांच्या 'मत'रुपी कर्जाची विकासाच्या माध्यमातून उतराई होवू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. भारतीय जनता पार्टी शहर-जिल्ह्याच्या वतीने आयोजित विजयी मेळावा व कृतज्ञता सोहळ्यात ते बोलत होते.

व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.सुभाष देशमुख, आ.विजयकुमार देशमुख, आ.देवेंद्र कोठे, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.समाधान आवताडे, आ.योगेश टिळेकर, माजी खासदारद्वय जयसिध्देश्वर महास्वामी, रणजितसिंह निंबाळकर, 'भाजपा'चे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, माजी आ.राजन पाटील, राम सातपुते, प्रशांत परिचारक, यशवंत माने, दिलीप माने, नरसिंग मेंगजी, शहाजी पवार आदी उपस्थित होते.

शहर-जिल्ह्यातील तमाम जनतेने मनपा, पंचायत समिती, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाला भरभरून यश दिले असून, या जनतेच्या भाजपकडून विकासाच्याही तितक्याच अपेक्षा आहेत. मी सर्व लोकप्रतिनिधींना सांगतो की, मी माझ्यामुळे निवडून आलो, असे कधी म्हणायचे नाही? जनतेसोबत चांगला व्यवहार करा, जनतेची कामे करुन त्यांचा विश्वास संपादन करा, विश्वास मोडू नका. पारदर्शी कारभार करा, भ्रष्टाचार मी खपवून घेणार नाही. भ्रष्टाचार केला की माझ्याकडे चुकीला माफी नाही, हे लक्षात ठेवावे, असा दमही नवनिर्वाचित सदस्यांना यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिला.

### रखरखत्या उन्हातही सभेला हजारोंची गर्दी

सोलापूरचे तापमान ४४ च्या घरात गेले होते आणि शासनाकडून हायअलर्टही जारी केला होता; तरीही अशा रखरखत्या उन्हातही शहर-जिल्ह्यातून ३० ते ४० हजाराच्या आसपास नागरिकांनी सभेला उपस्थिती लावली होती. या आलेल्या नागरिकांना पाण्याची सोय करून उन्हापासून संरक्षण मिळावे म्हणून १०० मोठे कुलर लावण्यात आले होते. तसेच ४ टनाची ६ वातानुकूलित यंत्रणा उभारण्यात आली आहे.

### अनेक कामांची घोषणा

सोलापुरातील शासकीय अभियांत्रिकीचे १९९६ पासून भिजत घोंगडे होते; या नवीन शैक्षणिक वर्षात इंजिनिअरिंग कॉलेज सुरु करणार आहे, शहरातील आयटी पार्कची घोषणा नाहीतर लवकरच अंमल करणार आहे. शहरात रेडिमेड गारमेंट पार्क उभारणी, रोजच शहरवासियांना पिण्याचे पाणी देणार, उड्डाणपुलांचा विषय याच वर्षी मार्गी लावणार आहे, विमानतळावर नाईटलँडिंगची सुविधा करणार आहे. नवी मुंबई विमानतळावर सोलापूरकरांसाठी सकाळच्या प्रवासासाठी स्लॉट मिळवून देणार आहे. मंगळवेढा येथे बसवेश्वर महाराजांच्या स्मारकाचा प्रश्न निकाली लावणार आहे. नाशिक-सोलापूर-अक्कलकोट महामार्ग निर्माण करण्यात येणार आहे. सोलापूर शहरातील आरोग्यसेवाही सुधारु, असे एक ना अनेक कामांची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी करताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.

### पंढरीत कॉरिडॉर होणारच

पंढरपूरला येणाऱ्या भाविकांना उज्जैन, काशी तीर्थक्षेत्राच्या धर्तीवर सुविधा मिळाव्यात म्हणून येथील कॉरिडॉरचा प्रश्न लवकर मार्गी लावणार आहे. या ठिकाणच्या लोकांची जागा भूसंपादन करताना त्यांना चांगला मावेजा देणार असून, दुकानदारांना दुकानेही देणार आहे. विरोधी पक्षातील कोणीही नेत्याने कितीही उसकावले तरी स्थानिकांना विश्वासात घेवून आणि त्या सर्वांचं योग्य पुनर्वसन करून कॉरिडॉर उभारणी करणार असल्याचा निर्धार मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.




# पत्नी घरात बसून पित होती दारु; पतीने विरोध केला असता मारहाण

## पत्नी, मेहुणीसह चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

पत्नी घरात बसून दारु पित असताना पतीने अटकाव केला असता उलट पतीवरच चाकुने वार करण्यात आल्याची घटना रविवार, दि.२६ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास लिमयेवाडी येथे घडली.

याप्रकरणी पत्नी, मेहुणीसह चौघा जणांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत यल्लप्पा लालू गायकवाड (वय-३८, रा.लिमयेवाडी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, रविवारी मध्यरात्री मी कामावरुन घरी आलो असता माझी पत्नी अश्विनी गायकवाड, मेहुणी पूजा दळवी, गुरुदेवी जाधव व रोहित जाधव हे सर्वजण आमच्या घरात बसून दारु पित बसले होते.

दारु पिण्यास मी विरोध केला असता पत्नीने माझी मर्जी, मी कोणालाही घेऊन दारु पिणार, मी अजून चार पोरांना घेऊन दारु पीत बसणार असे म्हणत माझ्याशी वाद केला. गुरुदेवी जाधव हिने मला ढकलून दिले. रोहित जाधव याने शिवीगाळ करत धमकी दिली. माझ्या बहिणीचे घर आहे असे म्हणत पूजा दळवी हिने माझ्यावर चाकुने वार केला, असे फिर्यादीत नमूद आहे.

# गाडीच्या काचा फोडून रोख रकमेसह ३१ हजाराचे साहित्य पळविले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

दोन वेगवेगळ्या ठिकाणी गाडीच्या काचा फोडून गाडीतील रोख रकमेसह ३१ हजार रुपये किमतीचे साहित्य पळविल्याची घटना घडली. याप्रकरणी दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली घटना २२ एप्रिल रोजी सायंकाळी ४.४५ ते ७ वाजण्याच्या सुमारास सिव्हिल चौक परिसरात घडली. चोरट्याने गाडीतील २१ हजार २०० रुपये किंमतीचे मंगळसूत्र, एक पावर बँक चोरून नेले. याबाबत गुरुसिध्दप्पा रमेश जम्मा (रा.नागणसूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार लांबतुरे हे पुढील तपास करीत आहेत. दुसरी घटना २३ एप्रिल रोजी सात रस्ता येथील पिझ्झा दुकानासमोर घडली. चोरट्याने फिर्यादीच्या गाडीची काच फोडून गाडीतील १० हजार रुपये रोख, बँक पासबुक, घराची चावी, मेकअप साहित्य लंपास केले.

याबाबत प्रतीक भिवा उंबरजकर (रा.माढा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार चव्हाण हे पुढील तपास करीत आहेत.

### दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी परीक्षेत

# सोलापूरचा प्रथमेश शिंदे राज्यात द्वितीय



सोलापूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी परीक्षेत सोलापूरचे सुपुत्र प्रथमेश रमेश शिंदे यांनी महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक पटकावून यश संपादन केले आहे.

सन २०१७ मध्ये त्यांनी कायद्याची पदवी संपादन केली. सोलापूर विद्यापीठामधून सुवर्णपदक पटकावलेले होते. एलएलएम ही पदव्युत्तर पदवी संपादन करताना पहिल्याच प्रयत्नात विधी या विषयातून सेट देखील पूर्ण केलेले आहे. या यशाचे श्रेय आई-वडील, बहीण-भाऊ, पत्नी मोनाली, गणेश पवार, ॲड.गणेश शिरसाट यांना दिले.

# 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन'चा महाराष्ट्र दिनी शुभारंभ

## आ. सुभाष देशमुख यांची संकल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरेचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या 'विश्वमंगल मराठी फाउंडेशन' या नव्या व्यासपीठाचा भव्य शुभारंभ महाराष्ट्र दिनी, शुक्रवार दि. १ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता आळंदी येथे होणार आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या कृपासानिध्यात फ्रुटवाले धर्मशाळा येथे हा सोहळा पार पडणार आहे. या फाउंडेशनची संकल्पना माजी मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांची असून, ते संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष आहेत. मराठी भाषा, संस्कृती आणि उद्योजकतेला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी त्यांनी हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. शुभारंभ कार्यक्रमासाठी ज्येष्ठ निरूपणकार व प्रख्यात वक्ते विवेक घळसासी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ यांचीही उपस्थिती लाभणार आहे. 'झेंडा मराठीचा मराठी भाषेचा मराठी कर्तृत्वाचा' हे फाउंडेशनचे घोषवाक्य असून, मराठी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्य करण्याचा निर्धार संस्थेने व्यक्त केला आहे. संत ज्ञानेश्वरांच्या ७५० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर 'पसायदान'मधील विश्वकल्याणाचा संदेश जगभर पोहोचविणे हे संस्थेचे प्रमुख ध्येय आहे. यासोबतच मराठी शाळांचे पुनरुज्जीवन, जागतिक स्तरावर मराठी समाजाचे एकत्रीकरण, तसेच शिक्षण, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातील मराठी व्यक्तींना एकत्र आणून विकासाला चालना देण्याचा संस्थेचा मानस आहे. या निमित्ताने उद्योजकीय परिसंवादाचेही आयोजन करण्यात आले असून नवउद्योजकांना मार्गदर्शन व नेटवर्किंगची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.



# मुख्यमंत्री देवाभाऊंच्या गाडीचे स्टेअरिंग आमदार देवेंद्रदादांच्या हाती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या ऐतिहासिक यशानंतर त्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आला. हा कार्यक्रम पार पडल्यानंतर कार्यक्रमस्थळ ते विमानतळापर्यंत आमदार कोठे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या गाडीचे सारथ्य केले.



या विजयी मेळाव्याचे नियोजन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी नियोजनबध्द केले होते. कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सारथ्य आमदार देवेंद्र कोठे यांनी केले. आ.कोठे गाडी चालवताना शेजारी बसलेले मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले सध्या त्यांचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले आहेत. एकंदरीत, आमदार कोठे यांनी पहिल्याच टर्ममध्ये आणि अत्यल्प काळात शहरातील विविध विकासकामांचा धडाका लावून मुख्यमंत्री फडणवीस यांच्याजवळ आपले वजन चांगलेच वाढविले असल्याची चर्चाही शहरातील जाणकार नागरिकांतून आज दिवसभर झाली.

# लाच घेताना बार्शीचा मंडल अधिकारी जाळ्यात

**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर वारस नोंद करण्यासाठी एका अर्जदाराकडून ३ हजार रुपयांची लाच स्वीकारताना बार्शी तहसील कार्यालयातील उपळे दुमालाचा मंडल अधिकारी हेमंत चंद्रकांत फुलारी (वय-५३, रा.प्लॉट नंबर ४०७, मनमित ब्लॉसम, जुनी आयएमएस शाळेजवळ) यास लाचलुचपत पथकाने रंगेहात पकडले.

यातील तक्रारदाराने त्यांच्या आजीचे नाव शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर वारस म्हणून नोंद करण्यासाठी अर्ज केला होता. मात्र, ही नोंद प्रमाणित करण्यासाठी आणि ७/१२ उताऱ्यावरील लॉक काढण्यासाठी यातील आरोपी फुलारी यांनी अर्जदाराकडे ३ हजार रुपये लाच म्हणून मागितले होते. दरम्यान, तक्रारदाराने सोलापूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दिली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवार, २८ एप्रिल रोजी सापळा रचला असता मंडल अधिकारी हेमंत फुलारी हा लाच स्वीकारताना जाळ्यात ओढला गेला.

याबाबत वैराग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. लाचलुचपत प्रतिबंधक सोलापूर विभागाचे पोलिस निरीक्षक शैलेश पवार, पोलिस निरीक्षक रविंद्र लांभाते, पोलिस हवालदार सलीम मुल्ला, स्वामीराव जाधव, चालक अक्षय श्रीराम यांनी ही कामगिरी पार पाडली.

# ईच्छा भगवंताची, लक्ष्मण जाधव परिवाराला मुख्यमंत्र्यांचे शुभाशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी सोलापुरात भाजपाच्या विजयी मेळावा व कृतज्ञता सोहळ्यासाठी हरिभाई देवकरण प्रशाला येथे आले होते. या पार्श्वभूमीवर पालिकेचे प्रभाग क्र. २२ चे भाजपा नगरसेवक किसन जाधव यांनी आपल्या परिवारातील विवाह सोहळ्यास उपस्थित राहण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना केली होती.



मुख्यमंत्र्यांच्या व्यस्त शेड्युलमुळे ते विवाह सोहळ्याच्या कार्यक्रमाला जावू शकले नाहीत मात्र लक्ष्मण जाधव परिवाराला मोबाईलद्वारे मुख्यमंत्र्यांचे शुभाशीर्वाद लाभले. ईच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ लक्ष्मण जाधव यांचा नातू ॲड. अनिल लक्ष्मण जाधव यांचे ज्येष्ठ सुपुत्र अजिंक्य आणि तनिषा यांच्या विवाह सोहळ्यानिमित्त ही विनंती करण्यात आली होती. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या अत्यंत व्यस्त दौऱ्यामुळे त्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही. तरीही माजी आमदार राम सातपुते यांच्या मोबाईलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी किसन जाधव यांच्याशी संवाद साधत नवदांपत्यास मनःपूर्वक शुभाशीर्वाद दिले. तसेच लवकरच सोलापूर दौऱ्यादरम्यान जाधव परिवाराची भेट घेण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

मुख्यमंत्री स्वतः उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांच्या मोबाईलद्वारे दिलेल्या शुभेच्छांमुळे जाधव कुटुंबीयांमध्ये मुख्यमंत्र्याच्या या साधेपणाने व कार्यकर्त्याप्रती असलेल्या जिव्हाळ्यामुळे जाधव कुटुंबियांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वसामान्य कार्यकर्त्यांची जाण असलेला नेता, अशी भावना किसन जाधव यांनी व्यक्त केली.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याप्रसंगी युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी केले आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ एप्रिल-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल धीरेंन्द्र शास्त्री यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ शहर युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याप्रसंगी आंदोलन केले.

नागपूर येथे झालेल्या एका कार्यक्रमात धीरेंन्द्र शास्त्री यांनी दस्तुरखुद्द मुख्यमंत्री फडणवीस यांच्या साक्षीने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. तरीपण, मुख्यमंत्री यावर गप्प का? असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकर, श्रीपाद छिंदम यांनीही यापुर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांची बदनामी युवक काँग्रेस कदापि सहन करणार नाही, असे यावेळी सांगण्यात आले. युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष गणेश डोंगरे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सहप्रभारी शांभवी शुक्ला, पश्चिम महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रभारी प्रथमेश आबनावे, मेघशाम धर्मावत, प्राची ताकतोडे, निखिल सुतार, पंकज पौळ यांच्या नेतृत्वाखाली सदर आंदोलन करण्यात आले.



या आंदोलनात अनंत म्हेत्रे, महेश लोंढे, सुनील सारंगी, शशिकांत शेळके, महेंद्र शिंदे, धीरज खंदारे, सचिन पवार, यासीन शेख, आशुतोष वाले, सोपान मिसाळ, आकाश जांभळे, कृष्णा नाईक, अस्लम शेख, हणमंतु जावीर, दिनेश डोंगरे, चंद्रकांत नाईक, युवराज दोडमनी आदी सामील झाले होते.

# नृसिंह यात्रेनिमित्त मोट्याळ येथे उद्यापासून विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ एप्रिल-**

अक्कलकोट तालुक्यातील मोट्याळ येथील ग्रामदैवत श्री नृसिंह यात्रेनिमित्त विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. गुरुवारी (दि.३०) एप्रिलपासून यात्रेला सुरुवात होणार आहे. त्याआधीच विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात केल्याची माहिती नृसिंह देवस्थान यात्रा पंचकमिटीच्या वतीने देण्यात आले आहे.

गुरुवारी सायंकाळी सात वाजता श्री नृसिंह महाराज जन्मोत्सव व रात्री ठीक नऊ वाजता ह.भ.प. आबा महाराज पाटील कुरनूरकर यांचे सात ते नऊ दरम्यान कीर्तन होणार आहे. शुक्रवारी (दि.१) सकाळी सात वाजता नृसिंह महाराज यांच्या पालखीची भव्य सवाद्य मिरवणूक होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद वाटप व सायंकाळी चार वाजता जंगी कुस्त्यांचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती यात्रा पंच कमिटीने दिली आहे.





### शुक्रवारी रक्तदान शिबीर

नृसिंह यात्रेनिमित्त शनिवारी (दि.२५) पासून ज्ञानेश्वरी परायण सोहळ्यास सुरुवात झाली आहे. त्याच निमित्ताने जगदंबा एक्का तर्फे शुक्रवारी (दि.१मे) रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविकांनी रक्तदान करावे, असे आवाहन नृसिंह यात्रा कमिटीने केले.

### एमपीएल क्रिकेट स्पर्धेला सुरुवात

नृसिंह महाराज यात्रेनिमित्त मोट्याळ प्रमियअर लिगच्या वतीने हा पिच भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धाचे शनिवारी (दि.२५) पासून सुरुवात झाले आहे. त्या स्पर्धेचा सेमी फायनल, फायनल सामना शुक्रवारी (दि.१मे) ला होणार आहे.

### शुक्रवारी लावण्यांचा कार्यक्रम

पुणे येथील राम चौधरी यांचे लावण्यरंग कार्यक्रम शुक्रवारी (दि.१) होणार आहे. त्यासाठी यात्रा कमिटीकडून जय्यत तयारी सुरु असून, या कार्यक्रमाला लावणी रसिकांनी हजेरी लावावे, असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पत्रकाराला शिवीगाळ प्रकरणी कर्मचाऱ्याच्या निलंबनाची मागणी



तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२८ एप्रिल -
परंडा शहरातील पत्रकाराशी फोनवर अरेरावी करत जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या प्रकरणी नगरपरिषद कर्मचारी जगदीश सोंडगे यांना तात्काळ निलंबित करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी तालुक्यातील पत्रकारांनी केली आहे.

तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात कचरा उचलण्याबाबत विचारणा केली असता संबंधित कर्मचाऱ्याने गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा निषेध व्यक्त करत नागरिकांशी सुसंवाद राखण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

या निवेदनावर पत्रकार आनंद खर्डेकर, सुरेश घाडगे, प्रमोद वेदपाठक, अविनाश इटकर, भजनदास गुडे, तुकाराम गंगावणे, आप्पासाहेब शिंदे, गणेश राशिनकर यांच्यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### धाराशिव शहरात नोकरी मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

धाराशिव, दि.२८ एप्रिल -
धाराशिव येथील समर्थ मंगल कार्यालयात आयोजित भव्य नोकरी मेळावा उत्साहात पार पडला. जिल्ह्यातील मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी उपस्थित राहून युवकांना करिअर व रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी केवळ पदवीवर न राहता व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. विविध नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या प्राथमिक मुलाखती घेत मार्गदर्शन केले. मोठ्या प्रतिसादामुळे मेळाव्याला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले.

### आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी खिजर मोरवे यांची निवड

धाराशिव, दि.२८ एप्रिल -
राष्ट्रीय ओबीसी, बहुजन शिक्षक संघाच्या वतीने दिला जाणारा क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले आदर्श



शिक्षक पुरस्कार यंदा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक खिजर मोरवे यांना जाहीर झाला आहे. संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपते व राज्य सरचिटणीस संतोष भोजने यांनी मोरवे यांच्या शैक्षणिक, सामाजिक तसेच राष्ट्रीय स्तरावरील कार्याची दखल घेत हा पुरस्कार जाहीर केला. मोरवे हे तुळजापूर तालुक्यातील वडगाव (देव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. या पुरस्काराबद्दल मोरवे यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### ॲड. संजय भोरे यांची सहसचिवपदी बिनविरोध निवड

धाराशिव, दि.२८ एप्रिल -
धाराशिव जिल्हा विधिज्ञ मंडळाच्या सहसचिव (सर्वसाधारण) पदी ॲड. संजय भोरे यांची बिनविरोध




निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे वकील वर्तुळात आनंद व्यक्त केला जात आहे. मनमिळावू व सर्वसमावेशक वृत्तीमुळे त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. निवडीनंतर त्यांनी वकिलांच्या प्रश्नांवर काम करून मंडळ बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. वरिष्ठ वकील व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



### गोमाता सम्मान अभियानांतर्गत तहसीलदारांना निवेदन

परंडा, दि.२८ एप्रिल -
परंडा येथे गोमाता सम्मान अभियानाच्या अनुषंगाने तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल व मुख्यमंत्री यांना देण्यासाठी हे निवेदन तहसीलदार कार्यालयामार्फत पाठविण्यात आले असून सुमारे ९०० नागरिकांच्या स्वाक्षऱ्या जोडण्यात आल्या. गोमातेचे संरक्षण, संवर्धन व सन्मान राखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात आणि गोवंश रक्षणासाठी कडक कायदे करावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. यावेळी गोसेवक, सामाजिक कार्यकर्ते व गोभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### प्रणव जाधव महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षेत राज्यात प्रथम

तुळजापूर, दि.२८ एप्रिल -
तुळजापूर येथील प्रणव जाधव यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत असिस्टंट टाउन प्लॅनर ऑफिसर पदासाठी राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे तुळजापूरसह धाराशिव जिल्ह्याचा गौरव वाढला आहे. प्रतिकूल परिस्थितीत चिकाटी व मेहनतीच्या जोरावर त्यांनी हे यश मिळवले. त्यांच्या सत्कार समारंभाला विविध मान्यवर उपस्थित राहून अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


# धाराशिवात उष्णतेचा पारा वाढला; तापमान ४२.१ अंश सेल्सिअस

### पुढील काही दिवसांत ४३ @ चा अंदाज...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ एप्रिल -
एप्रिल महिन्याच्या अखेरीस जिल्ह्यात उष्णतेचा प्रचंड कहर जाणवत असून सोमवारी तापमान ४२.१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. येत्या काही दिवसांत पारा ४३ अंशांच्या उंबरठ्यावर जाण्याची शक्यता व्यक्त होत असून संपूर्ण जिल्हा उष्णतेच्या लाटेत होरपळून निघत आहे.

हवेचा वेग मंदावल्यामुळे उन्हाची तीव्रता अधिकच वाढली आहे. वातावरणातील आर्द्रता कमी झाल्याने उन्हाचा चटका वाढला असून सकाळी ९ वाजल्यापासूनच उन्हाची झळ बसू लागते. सायंकाळी ५ वाजेपर्यंत कडक उन्हाचा तडाखा कायम राहतो.

दुपारच्या वेळेत नागरिक घराबाहेर पडणे टाळत असून प्रमुख रस्ते व बाजारपेठांमध्ये शुकशुकाट दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांत तापमानात सातत्याने वाढ होत असून ३० एप्रिल रोजी तापमान




४२.२ अंशांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. तसेच ३ मेपर्यंत तापमान ४३ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. किमान तापमानही २७ ते २९ अंशांच्या दरम्यान राहणार असल्याने रात्रीचाही उकाडा वाढत आहे.

उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेमुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता आरोग्य विभागाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

भरपूर पाणी पिणे, दुपारच्या वेळेत बाहेर जाणे टाळणे, सावलीत राहणे, सुती व सैलसर कपडे परिधान करणे, तसेच डोक्यावर टोपी किंवा रुमाल बांधणे, अशी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर काम करणाऱ्यांनी विशेष दक्षता घेणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले आहे.

उष्णतेच्या या 'रुद्र' अवतारामुळे मे महिन्यात परिस्थिती आणखी तीव्र होण्याची शक्यता असून प्रशासन व आरोग्य यंत्रणा सतर्क आहेत.

नागरिकांनीही आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यावश्यक बनले आहे.

## तेरखेड्यात खंडोबा मंदिर सभागृहाचे लोकार्पण



तभा वृत्तसेवा
वाशी, दि.२८ एप्रिल -
वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे आ. तानाजी सावंत यांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या खंडोबा मंदिर सभागृहाचे लोकार्पण उत्साहात पार पडले. याचवेळी गावातील ज्योतिबा मंदिरासाठी नव्या सभागृह इमारतीचे भूमिपूजनही करण्यात आले.

भैरवनाथ समूहाचे व्हा. चेअरमन केशव सावंत यांच्या हस्ते विधिवत लोकार्पण व भूमि पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला शिवसेना तालुकाप्रमुख सत्यवान गपाट, माजी जि.प. सदस्य उद्धव साळवी, उपसरपंच कलाम पठाण, शिवसेना नेते बालाजी नकाते, अक्षय चव्हाण यांच्यासह योगीराज फरताडे, शरद मनगिरे, बालाजी हलकरे, अच्युत शिंदे, संदीप घुले, कृष्णा माळी, रामलिंग शिंदे, मंगेश कडवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## हुंडाबळीचा संशय : विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या; पतीसह चौघांवर गुन्हा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ एप्रिल -
विवेकानंदनगर परिसरात १९ वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून हुंड्यासाठी छळ केल्याच्या आरोपावरून पतीसह पाच जणांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नम्रता शुभम कदम (वय १९, रा. शेकापूर, ता. जि. धाराशिव) यांनी दि.२४ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ११.४५ वाजता तुळजापूर येथील विवेकानंदनगर परिसरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

या प्रकरणी निता गणेश गरड (वय ४०, रा. विवेकानंदनगर, तुळजापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शुभम मोहन कदम, जयश्री मोहन कदम (दोघे रा. शेकापूर), अंजली अशोक यादव (रा. अमृतवाडी), दिपाली संतोष सुरवसे (रा. बार्शी) आणि सोनाली बालाजी मोहिते (रा. सांजा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, आरोपींनी नम्रता हिला माहेरहून पाच तोळे सोने आणण्याची मागणी करत सोने आणले नाही तर तुला घरात घेणार नाही व पतीचे दुसरे लग्न लावून देऊ अशी धमकी दिली. तसेच तिच्यावर मारहाण करून शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप आहे. या सततच्या त्रासाला कंटाळून नम्रता हिने आत्महत्या केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या घटनेप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## युरिया खताचा तीव्र तुटवडा; शेतकरी अडचणीत

### तातडीच्या उपाययोजना करण्याची डॉ. प्रतापसिंह पाटील यांची मागणी...





तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ एप्रिल -
जिल्ह्यात सध्या युरिया खताचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी बांधव मोठ्या अडचणीत सापडले आहेत. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, मागील काही दिवसांपासून जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना युरिया खत उपलब्ध होत नसल्याने पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होत आहे. शेती हंगामाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर खताची कमतरता भासत असल्यामुळे उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय, काही ठिकाणी शेतकऱ्यांना खतासाठी लांबच लांब रांगा लावाव्या लागत असून, काळाबाजार व साठेबाजीच्या तक्रारीही समोर येत आहेत. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

डॉ. पाटील यांनी जिल्ह्यात युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून देणे, खताचे पारदर्शक व न्याय्य वितरण सुनिश्चित करणे, तसेच काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. प्रत्येक शेतकऱ्याला आवश्यक त्या प्रमाणात खत मिळेल याची हमी देण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून २० वर्षीय तरुणीवर अत्याचार

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ एप्रिल -
लग्नाचे आमिष दाखवून एका २० वर्षीय तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एका गावातील २० वर्षीय तरुणीला आरोपीने दि. २९ नोव्हेंबर २०२१ ते दि. १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

तसेच घडलेली बाब आई-वडिलांना सांगितल्यास तुझे छायाचित्र व्हायरल करीन अशी धमकी देत तिचा छळ केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी पीडितेने दि. २७ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## सविता जाधव यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.२८ एप्रिल -
महाराष्ट्र दिनानिमित्त ३० एप्रिल २०२६ रोजी पुणे येथील यशदा सभागृहात आयोजित कार्यक्रमात लोहारा येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलच्या सविता शहाजी जाधव यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षिका' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन व गुणवत्तापूर्ण शिक्षण देत २५ वर्षे उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल त्यांची निवड झाली आहे. या कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना सन्मानित केले जाणार असून त्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## 'भैरवनाथ शुगर' चा गाळप हंगाम रोलर पूजन संपन्न



तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२८ एप्रिल -
येथील भैरवनाथ शुगर वर्क्स लि. युनिट क्र. १ या साखर कारखान्यात गाळप हंगाम २०२६-२७ साठी रोलर पूजन सोहळा दि.२८ एप्रिल रोजी पार पडला. राजेश शेळके व कारखान्याचे जनरल मॅनेजर प्रल्हाद ठोंबरे यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले.

परंडा विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कारखान्याचे चेअरमन अनिल सावंत व व्हा. चेअरमन विक्रम सावंत यांच्या नियोजनातून गाळप हंगामासाठी कारखाना लवकरच सज्ज करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या सोहळ्यास डिस्टिलरी मॅनेजर अजित भोसले, चीफ केमिस्ट दादासाहेब बोरकर, शेती अधिकारी बापुसाहेब देशमुख, चीफ अकाउंटंट गोविंद कुलकर्णी, उदयसिंह गडगे, दादा काळे, बाळासाहेब लांडगे, जीवन दाढे, आबा अनवणे, भैरू गरडाडे, बालाजी लोंढे, बाळासाहेब धुमाळ, सोमनाथ सूर्यवंशी, लक्ष्मण ढगे, संदीप कवठे, हरिदास ढगे, सुरेश साळुंके, जेजेराम सूर्यवंशी तसेच ऊस उत्पादक शेतकरी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ३१२ वाहनांवर कारवाया; २.६० लाख दंड वसूल

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ एप्रिल -
धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी २७ एप्रिल रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर ३१२ कारवाया केल्या. या कारवाईतून एकूण २ लाख ६० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

## हिंस्त्र प्राण्याचा थरारक हल्ला; ८० कोकरांचा मृत्यू

### मेंढपाळांचे ४ लाखांचे नुकसान

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२८ एप्रिल -
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील खरोळी शिवारात हिंस्त्र प्राण्याने केलेल्या हल्ल्यात तब्बल ८० कोकरांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना दि. २७ एप्रिल रोजी दुपारी घडली. या घटनेत मेंढपाळांचे सुमारे ४ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

जळकोट परिसरात धनगर समाजातील अनेक कुटुंबे पारंपरिक मेंढपाळ व्यवसायावर उदरनिर्वाह करतात. उन्हाळ्याच्या काळात मेंढ्या शेतात बसवण्याची प्रथा असल्याने, दि. २७ रोजी सुरवसे यांच्या शेतात मेंढ्या ठेवण्यात आल्या होत्या. मोठा कळप चराईसाठी रानात नेण्यात आला असताना चालू न शकणाऱ्या लहान कोकरांना गावातील एका शेतकऱ्याच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये सुरक्षित ठेवण्यात आले होते.

याचवेळी दबा धरून बसलेल्या हिंस्त्र प्राण्याने शेडखालील जमीन उकरून आत प्रवेश करत ८० कोकरांचा फडशा पाडला. या हल्ल्यात दयानंद भोगे, दत्तात्रय सोनटक्के, बालाजी सोनटक्के, हरीबा सोनटक्के, मनोज कदम, राजू भोगे आणि अमोल सुरवसे यांच्या कोकरांचा मृत्यू झाला. मेंढपाळ परत आल्यानंतर त्यांना घटनास्थळी रक्ताचा सडा आणि मृत कोकरे आढळून आले.

या घटनेमुळे मेंढपाळ बांधवांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. घटनेची माहिती मिळताच पंचायत समिती सदस्य ड. आशिष सोनटक्के यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना याबाबत माहिती दिली.

आमदार पाटील यांनी नुकसानग्रस्त मेंढपाळांना शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले असून घटनेचा तात्काळ पंचनामा करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार वनविभागाचे कोकाटे व तलाठी खमीतकर यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे.

## तुळजापूर नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा
## अतिक्रमणावर कारवाईसाठी समिती नियुक्तीचा निर्णय



तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२८ एप्रिल -
सोमवारी नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत विषयपत्रिकेवरील सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा होऊन सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.

सभेत नगरपरिषदेच्या आरक्षित जागांवरील अतिक्रमणाचा मुद्दा विशेष चर्चेत आला. शहरातील काही आरक्षित जागांवर अतिक्रमण झाल्याची बाब विरोधकांनी उपस्थित करत ते हटविण्याची मागणी केली. यावर नगराध्यक्षांनी अतिक्रमणासंदर्भात समिती नेमून दोन महिन्यांत अहवाल मागविण्यात येईल, त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले. शहर विकास प्राधिकरणाच्या दृष्टीने प्रत्येक नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील विकासासाठी आवश्यक जागांची माहिती लेखी स्वरूपात सादर करावी, असेही आवाहन करण्यात आले. तसेच सध्या सुरू असलेले अतिक्रमण केवळ नगरपरिषदेपुरते मर्यादित नसून त्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाचाही समावेश असल्याचे सांगण्यात आले. धाराशिव-लातूर-नळदुर्ग राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिल्याची माहितीही देण्यात आली.

दरम्यान, प्रशासक काळात मंदिराजवळील घाटशीळ वाहनतळाची जागा जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मंदिर संस्थेकडे हस्तांतरित करण्यात आली होती. ही जागा पुन्हा नगरपरिषदेकडे घेण्यात यावी, अशी एकमुखी मागणी सर्व नगरसेवकांनी केली. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात येईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या बैठकीस मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे, कार्यालय अधीक्षक वैभव पाठक, गटनेते औदुंबर कदम, विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ तसेच सत्ताधारी व विरोधी पक्षाचे नगरसेवक उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### एनएमएस परिक्षेत शास्त्री विद्यालयाचे घवघवीत यश



बजगीरे साधना | नागेश वंगाटे | समिक्षा लाडवते
जावरे आदिती | हरिओम डोंगरे | श्रावणी जाधव
राठोड मोहन | राठोड सोहम | आनंदी हाळ्ळे

तभा वृत्तसेवा

**उदगीर दि. २८ एप्रिल :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक योजना परीक्षेचा निकाल फेब्रुवारी महिन्यात जाहीर झाला होता. या परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर झाली असून लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील ९ विद्यार्थी एन एम एम एस शिष्यवृत्तीस पात्र ठरले व ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत . पात्र ठरलेले विद्यार्थी खालील प्रमाणे

१)बजगिरे साधना बालाजी २)वंगाटे नागेश लिंगराम ३) लाडवते समीक्षा सतीश ४) जावरे आदिती रणजीत ५)डोंगरे हरिओम लक्ष्मीकांत ६)जाधव श्रावणी सुनील ७)राठोड मोहन संजय

८) राठोड सोहम विकास ९) हळे आनंदी दीपक या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह शंकरराव लासुणे विद्यालयाचे मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर , पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट माधव मठवाले एनएमएस विभाग प्रमुख दिलीप पाटील सह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# महावितरणचा हलगर्जीपणा आढळल्यास थेट कारवाई : आ. पवार

तभा वृत्तसेवा

**औसा दि. २८ एप्रिल :** शेतकरी तसेच वीज ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी दि. २७ एप्रिल रोजी औसा येथे आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत आमदार अभिमन्यू पवार यांनी महावितरण प्रशासनाला अत्यंत कडक आणि स्पष्ट शब्दांत धारेवर धरत तातडीने कामकाजात सुधारणा करण्याचे ठोस निर्देश दिले. एमएसईबी ही पूर्णतः सेवा क्षेत्रातील संस्था आहे. तुमचे कार्य लोकसेवेचे आहे. त्यामुळे डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर ठेवून अत्यंत संयमाने, शिस्तबद्ध आणि जबाबदारीने काम करणे अपेक्षित असून दुर्लक्ष, निष्काळजीपणा, हलगर्जीपणा आढळल्यास थेट कारवाई करण्याचा इशाराआ.अभिमन्यू पवार यांनी आढावा बैठकीत दिला.



औसा येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शेतकऱ्यांच्या समस्या आणि अडचणींचा सखोल आढावा घेताना सर्व अडथळे तात्काळ दूर होतील असे नसले तरी होणाऱ्या समस्यांची तीव्रता किमान पातळीवर आणणे अत्यंत आवश्यक आहे. एका शाखा अभियंत्याकडे सुमारे १० ते १५ गावांचा भार असल्याने कामाचा प्रचंड ताण असल्याचे मान्य करतानाच, नागरिकांचे फोन वेळेवर उचलणे, त्यांच्या तक्रारी काळजीपूर्वक ऐकणे आणि त्यावर तत्परतेने कार्यवाही करणे ही तुमची मूलभूत व अपरिहार्य जबाबदारी आहे. असे आ. अभिमन्यू पवार यांनी ठणकावून सांगितले.

### आठ तास वीज द्या, पण सुरळीत द्या– माजी आ. दिनकरराव माने

पाणी आहे, पण वीज वेळेवर मिळत नाही. ही गंभीर समस्या समोर आली आहे. जलस्रोत उपलब्ध असूनही सुरळीत आठ तास वीजपुरवठा होत नाही. महावितरण केवळ वीज पुरवठा करण्यासाठी राहिली असून पायाभूत सुविधा देण्यासाठी महवितरण अपयशी ठरत आहे. शेतकऱ्यांना जळालेले ट्रान्सफॉर्मर स्वतः बसवावे लागतात. ही बाब चिंताजनक असून वाकलेले पोल, खराब लाईन यामुळे त्रास वाढला आहे.आठ तास वीज द्या, पण सुरळीत द्या.अशी मागणी माजी आमदार दिनकरराव माने यांनी केली

आमदार पवार म्हणाले, औसा तालुक्यासाठी स्वतंत्र निधी मिळणार असल्याची माहिती यावेळी दिली. तसेच. मुख्यमंत्री स्तरावर सविस्तर चर्चा झाली असून औसा मतदारसंघासाठी स्वतंत्र व विशेष बजेट उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यामुळे निधीबाबत कोणतीही चिंता करू नका. आवश्यक असलेल्या कामांची स्पष्ट माहिती द्या, ती पूर्ण करण्याची जबाबदारी घेतली जाईल. असे आश्र्वासन त्यांनी यावेळी दिले. तसेच मी जनतेने निवडून दिलेला लोकप्रतिनिधी आहे आणि त्या विश्र्वासाला न्याय देण्याची माझी जबाबदारी आहे. त्यामुळे आता केवळ बैठका किंवा चर्चा पुरेशा नाहीत.प्रत्यक्ष जमिनीवरील अंमलबजावणी आणि परिणाम दिसले पाहिजेत. असे त्यांनी यावेळी स्पष्टपणे नमूद केले.

### कामात हलगर्जीपणा करणाऱ्यावर कठोर कारवाई : मुख्य अभियंता अरविंद गुलबुले

कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. प्री-मान्सून कामे सकाळी ६ ते दुपारी १२ दरम्यान पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत करण्यावर भर दिला जाणार आहे. नवीन उपकेंद्रांमुळे वीज अडचणी कमी होतील, ग्राहकांच्या तक्रारींकडे दोष म्हणून नव्हे तर समस्या सोडवण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. ट्रान्सफॉर्मर बदलण्याचा कालावधी पूर्वीच्या दोन-तीन महिन्यांवरून आता तीन दिवसांपर्यंत आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी नमूद केले.औसा मतदारसंघात दिवसा शंभर टक्के वीजपुरवठ्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, सोलार पंप योजनेलाही प्रोत्साहन दिले जाणार आहे. टीमवर्क, थकबाकी वसुली आणि नागरिकांचे सहकार्य मिळाल्यास उत्तम सेवा देणे शक्य आहे, असे सांगत त्यांनी शंभर टक्के दर्जेदार सेवा देण्याचे आश्र्वासन यावेळी दिले.

यानंतर आ. अभिमन्यू पवार यांनी महावितरण अधिकाऱ्यांना ठोस, स्पष्ट आणि कठोर निर्देश देत शेतकऱ्यांशी संवाद व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर विशेष भर दिला. दुर्लक्ष, निष्काळजीपणा किंवा हलगर्जीपणा आढळल्यास थेट कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. आठ तासांचा वीजपुरवठा अखंड, स्थिर आणि सुरळीत राहणे बंधनकारक असल्याचे सांगत त्यांनी वाकलेले पोल, जीर्ण तारा आणि खराब झालेली पायाभूत यंत्रणा तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश दिले. तसेच लाईनमनने अत्यंत जबाबदारीने, तत्परतेने आणि शिस्तबद्ध पद्धतीने काम करावे, असेही त्यांनी निर्देशित केले. मंजूर, अपूर्ण आणि प्रलंबित कामांचा संपूर्ण, पारदर्शक व सविस्तर आढावा ठेवण्यावरही त्यांनी विशेष भर दिला.या बैठकीला माजी आमदार दिनकरराव माने,महवितरण मुख्य अभियंता अरविंद गुलबुले, कार्यकारी अभियंता प्रशांत दाने,पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, उपसभापती अमोल पाटील, जिल्हा परिषद सभापती कविता गोरे, सभापती अश्र्विनी बालाजी माने आदीसह शाखा अभियंता उपस्थित होते.

## मूल्यमापन समितीवर पत्रकार ओमकार सोनटक्के यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा



**जळकोट दि. २८ एप्रिल :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान ' या अंतर्गत पंचायत समिती पातळीवरील उत्कृष्ट ग्रामपंचायतला पुरस्कार दिला जातो . या ग्रामपंचायतीची पाहणी करण्यासाठी तालुकास्तरावर समिती गठित करण्यात येते , जळकोट पंचायत समितीमध्ये देखील गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय मूल्यमापन समिती स्थापन करण्यात आली असून , या समितीवर अक्कलकोट तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीचे मूल्यमापन करणाऱ्या महत्त्वपूर्ण अशा समितीवर जळकोट पत्रकार ओमकार सोनटक्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे .

अक्कलकोट तालुक्यातील विविध गावांची तपासणी करण्यात येणार आहे .गटविकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय मूल्यमापन समिती स्थापन करण्यात आली आहे . या समितीमध्ये .अध्यक्ष म्हणून गटविकास अधिकारी ऐश्र्वर्या चितारी यांनी सदस्य म्हणून विस्तार अधिकारी पंचायत. पटवारी एन. ए. , विस्तार अधिकारी सांख्यिकी पंचायत समिती जळकोट शृंगारे ए . जी , अंगणवाडी पर्यवेक्षिक श्रीमती बोईनवाड एम.पी. , वरिष्ठ सहाय्यक पंचायत समिती मुस्कावाड नितीन यांचा देखील या पथकामध्ये समावेश आहे .

महाराष्ट्र शासनाच्या वतीने तालुकास्तरीय मूल्यमापनासाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती, जळकोट यांना पंचायत समिती, अक्कलकोट जि. सोलापूर ही निश्र्चित करुन देण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायतचे मूल्यमापन करणाऱ्या समितीवर पत्रकार ओमकार सोनटक्के यांची नियुक्ती झाल्याबद्दल पंचायत समितीचे सभापती सौ.सुनिता कोळंबे , उपसभापती माधव वाघमारे,मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नाना पवार, प्रेस संपादक पत्रकार संघाचे अध्यक्ष माधव होनराव, अखिल भारतीय पत्रकार संघाचे अध्यक्ष राजकुमार धुळशेट्टे , व्हॉइस ऑफ मीडिया संघाचे अध्यक्ष अमोल कळसे, पत्रकार एम .जी मोमीन, शिवशंकर काळे, विवेक पोतदार, अजिज मोमिन, अनंत धुळशेट्टे , संगम डोंगरे , कैलास पाटील , माधव होणराव, मारोती फुलारी, महेश देशमुख , नामदेव केंद्रे . नामदेव राठोड, कमलाकर वाघमारे हनुमंत केंद्रे , राम चोले, माधव केंद्रे , अंबादास गणुचे, विश्र्वनाथ काळे , ओमकार टाले, सुखानंद सोनटक्के , यांच्यासह तालुक्यातील सर्व पत्रकारांनी अभिनंदन केले आहे .

## गोमातेला राष्ट्रमातेचा म्हणून दर्जा द्या



तभा वृत्तसेवा

**उदगीर दि. २८ एप्रिल :** गोमाता संरक्षण व तिला 'राष्ट्रमाते'चा दर्जा देण्याच्या मागणीसाठी उदगीर शहरात दि. २७ एप्रिल रोज सोमवारी गोसन्मान रॅली काढून ५ हजार जणांच्या सह्यांचे निवेदन काढण्यात आलेल्या रॅलीतील विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांमार्फत महामहिम राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल व मुख्यमंत्री यांना देण्यात आले.

गोसन्मान रॅलीला सुरुवात सकाळी १० वाजता आर्य समाज येथून झाली. ही रॅली आर्यसमाज , छत्रपती शिवाजी महाराज चौक, तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आली. यावेळी तहसीलदार राम बोरगावकर यांच्यामार्फत देशाचे राष्ट्रपती,पंतप्रधान यांना गोमातेस राष्ट्रमातेचा दर्जा देण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात देशातील हिंदू धर्मीयांच्या श्रद्धेचा विषय असलेल्या गोमातेच्या संरक्षणासाठी तसेच तिला राष्ट्रीय दर्जा मिळावा, या प्रमुख मागणीसाठी गो सन्मान अभियान देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत लाखो नागरिकांच्या सह्यांचे निवेदन देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल व मुख्यमंत्री यांना पाठविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या रॅलीत श्री गोरक्षण संस्था, श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ,संघर्ष मित्र मंडळ, नारायणा ऍग्रो प्रा. लि., श्रीराम प्रतिष्ठान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बजरंग दल, पतंजली योग समिती, प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्र्वरीय विश्र्वविद्यालय, मोरया ढोल पथक, अजय कनाडे व गोरक्षक मित्र संघ, ज्येष्ठ नागरिक संघ, जिव्हाळा ग्रुप, माहेश्र्वरी समाज, आर्य वैश्य समाज, मारुधर गरबा मंडळ, आर्य वैश्य समाज, वीरशैव समाज, सिंधी समाज, विश्र्व हिंदू परिषद, रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल, लॉयन्स क्लब उदगीर, भाजप शहर व तालुका पदाधिकारी, उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय या संघटनेसह शहरातील विविध संस्थांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

# ग्रामीण भागातील रस्ते मुख्य रस्त्यांना जोडून लवकरच कामाला सुरुवात करणार : बाबासाहेब पाटील

तभा वृत्तसेवा

**चाकूर दि. २८ एप्रिल :** तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते मुख्य रस्त्यांना जोडून ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न करणार असून लवकरच कामाला सुरुवात करणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी बोथी तालुका चाकूर येथे केले. ते बोथी येथे एक कोटी चार लक्ष रुपयांच्या विविध विकास कामाचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा प्रसंगी बोलत होते.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभाकर पिटले होते. व्यासपीठावर स्वागत अध्यक्ष बळीराम पाटील, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, सिद्धी शुगर अलाईट इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव, सभापती प्रतिनिधी मच्छिंद्र नागरगोजे, चापोलीचे सरपंच डॉ भालचंद्र चाटे, पंचायत समितीचे उपसभापती भुजंग शिंदे, पद्माकर पाटील, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, माजी नगराध्यक्ष मिलिंदराव महालिंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुदर्शन मुंडे, बालाजी सूर्यवंशी, अनिल वाडकर ,मधुकर कांबळे, अर्जुन मद्रेवार, गणपत नितळे, गणपत कवठे, सिद्धेश्र्वर अंकलकोटे, राष्ट्रवादी युवक तालुकाध्यक्ष संदीप शेटे, देविदास माने, अशोक पाटील, मधुकर मुंडे, अंतेश्र्वर पाटील, धनाजी राठोड, मेघराज पाटील, राजाराम करले, नाथा मद्रेवार, विश्र्वनाथ पाटील, नारायण काचे, सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, आगामी काळात जलतारा हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असून सर्व शेतकऱ्यांनी हा प्रकल्प आपल्या शेतात राबवला पाहिजे यासाठी आपल्या सिद्धी शुगर साखर कारखान्याकडून मदत व मार्गदर्शन केलं जाईल. चाकूर तालुक्यातील क्रीडा संकुल आणि ट्रॉमा केअर सेंटरचा प्रश्र्न लवकरच आपण मार्गी लावणार असून तसेच पाणंद रस्त्याचा सुद्धा लवकरच प्रशासकीय मान्यता देऊन पानंद रस्ते करणार आहोत. शेतकर्यांनी शेतीला ड्रिपच्या माध्यमातून पाणी द्यावे.मंदिरासबोतच शिक्षणाकडे जास्त लक्ष देण्याची गरज आहे.शिक्षण, आरोग्यच्या योजनेवर जास्त भर दिला जाणार आहे. शेतकऱ्यांनी ए.आय सारखे तंत्रज्ञान शेतीत वापरून शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.बोथी ते तांडा या रस्त्याच्या कामाचे लवकरच उद्घाटन करणार आहे.सर्वसामान्य माणसाला भौतिक सुविधेसोबतच आर्थिक सुबत्ता देणार आहे. चाकूर तालुक्याला विकासाकडे नेत असताना मतदारसंघाला सुजलाम सुफलाम करणे हाच आमचा संकल्प असून या पदाचा उपयोग यासाठी आम्ही करणार असल्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले. बोथीच्या विकासासाठी मी कधीही कमी पडणार नाही.लागेल तेवढा निधी विकास स्वरूपात आपण देऊ अशी ग्वाही सुद्धा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष बळीराम पाटील यांनी केले. यावेळी सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश जाधव, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, चापोलीचे सरपंच भालचंद्र चाटे, यांनी समायोजित मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर कांबळे यांनी केले.या कार्यक्रमासाठी बोथी गावातील सरपंच बालाजी आवळे,चेअरमन सुर्यकांत केंद्रे ,परमेश्र्वर नवगण, सुर्यकांत डिगोळे, गोविंद घुगे, बाळासाहेब पाटील, धर्मपाल पवार,उपसरपंच संतोष घुगे,प्रगतशील शेतकरी राजाराम महात्मे, बालाजी शेवाळे व पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला होता.

## काँग्रेस नगरसेवकांकडून नगराध्यक्षांना महापुरुषांच्या प्रतिमा भेट

तभा वृत्तसेवा

**निलंगा दि. २८ एप्रिल :** निलंगा नगर परिषदेत नगराध्यक्षांच्या दालनात महापुरुषांच्या प्रतिमा लावण्यासाठी काँग्रेस नगरसेवकाकडून नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांना महापुरुषांच्या प्रतिमा भेट देण्यात आले .



नगरपरिषद निलंगा येथे नगराध्यक्षांच्या दालनात देशातील महान महापुरुषांच्या प्रतिमा नसल्यामुळे शहरातील नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

महापुरुषांच्या विचारांवर समाज उभा असून महापुरुषांचे विचार समाजाला नवी दिशा देतात, म्हणून शहरातील नागरिकांच्या संतप्त भावना लक्षात घेऊन निलंगा नगरपरिषदेतील काँग्रेसच्या नगरसेवकांनी पुढाकार घेत नगराध्यक्षांना महापुरुषांच्या प्रतिमा भेट दिल्या व त्या तात्काळ दालनात लावण्याची मागणी केली. हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून जनतेच्या भावना आणि वाढत्या संतापाचा स्पष्ट इशारा असल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी वंचित बहुजन आघाडीच्या लातूर महिला जिल्हाध्यक्षा मंजुषाताई निंबाळकर यांनी थेट नगराध्यक्षांच्या दालनात जाऊन जाब विचारत प्रशासनाला कठोर शब्दांत धारेवर धरले होते. त्यांनी संतप्त स्वरात स्पष्ट केले की, महापुरुषांचा सन्मान हा केवळ परंपरा नसून आपल्या अस्तित्वाचा पाया आहे. त्यांच्या विचारांमुळेच आपण आज या स्थितीत आहोत. अशा महापुरुषांना दालनात स्थान न देणे म्हणजे त्यांच्या संघर्षाचा आणि बलिदानाचा अपमान होय.त्यांच्या या भूमिकेमुळे वातावरण अधिकच तापले असून, उपस्थित नागरिकांनीही या मुद्द्यावर तीव्र भावना व्यक्त केल्या. महापुरुषांच्या विचारांशिवाय प्रशासन चालू शकते का? असा थेट सवाल उपस्थित करत अनेकांनी नगराध्यक्षांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

सामाजिक व राजकीय वर्तुळात या घटनेची जोरदार चर्चा सुरू असून, हा विषय आता केवळ एका दालनापुरता मर्यादित न राहता संपूर्ण शहराच्या अस्मितेशी जोडला गेला आहे. महापुरुषांचा सन्मान राखणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधीची नैतिक जबाबदारी असताना, अशा प्रकारची घटना घडणे अत्यंत खेदजनक असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

निलंगा नगरपरिषद प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ योग्य ती कार्यवाही करावी तसेच भविष्यात अशा प्रकारचे दुर्लक्ष होणार नाही, याची खात्री द्यावी, अशी तीव्र मागणी नागरिकांकडून होत आहे.

महापुरुषांचा सन्मान हा केवळ भिंतीवरील प्रतिमांपुरता मर्यादित नसून तो विचार आणि कृतीतूनही प्रतिबिंबित झाला पाहिजे, हीच जनतेची अपेक्षा आहे.

या वेळी नगरसेवक अजित नाईकवाडे, सिराज देशमुख,डॉ. गजेंद्र तरंगे, इस्माईल मणियार, सौ. विजया वांजरवाडे, सौ. सरोजा भोसले, सौ. शिवगंगा पेठकर, सौ. राधिका पेठकर, स्वाती सूर्यवंशी, तुषार सोमवंशी आदी उपस्थित होते

### ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणूक मतमोजणीनिमित्त मद्यविक्री बंद

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २८ एप्रिल :** जिल्ह्यातील लातूर, औसा, निलंगा आणि अहमदपूर या चार तालुक्यांतील एकूण १३ ग्रामपंचायतींमध्ये सरपंच व सदस्य पदांच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी २९ एप्रिल २०२६ रोजी होणार आहे. त्यामुळे मुंबई दारुबंदी कायदा १९४९ च्या कलम १४२ (१) नुसार मतमोजणी ठिकाणच्या परिसरातील मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी निर्गमित केले आहेत.

२९ एप्रिल रोजी मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत मतमोजणी केंद्राच्या परिसरातही मद्यविक्रीस पूर्णतः बंदी असेल. या कालावधीत आदेशाचे उल्लंघन करून मद्यविक्री करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात येतील, तसेच त्यांच्यावर महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत फौजदारी कारवाई देखील करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## वर्षा केंद्रे यांना डॉ.भीमराव आंबेडकर उत्कृष्ट सरपंच राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

तभा वृत्तसेवा

**उदगीर दि. २८ एप्रिल :** वर्ल्ड एक्सलन्स बुक ऑफ रेकॉर्ड स्टार्टअप शिक्षा फाउंडेशन दिल्ली च्या वतीने कुमठा खुर्द तालुका उदगीर येथील सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार )पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष युवा नेते सुनील केंद्रे यांच्या पत्नी वर्षा सुनील केंद्रे यांना स्टार्टअप शिक्षा फाउंडेशन दिल्ली वर्ल्ड एक्सप्रेस बुक ऑफ रेकॉर्ड च्या वतीने डॉ.भीमराव आंबेडकर उत्कृष्ट सरपंच राष्ट्रीय पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला. समता बंधुता न्याय महिला सक्षमीकरण ग्रामपंचायतच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची सोय रस्ते तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना प्रभावीपणे राबवून एक आदर्श निर्माण केल्यामुळे हा मानाचा पुरस्कार त्यांना अनेक सामाजिक संघटनांच्या शिफारशीमुळे जाहीर करण्यात आला. त्यांच्या सरपंच पदाच्या कार्यकाळामध्ये गावामध्ये शांतता एकोपा व समानता निर्माण करण्याचे काम त्यांनी केलं अतिशय गरीब परिस्थितीतून त्यांनी आपले पती युवा नेते सुनील व्यंकटराव केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवले कुमठा खुर्द या गावांमध्ये आज तगायत जी कामे झाली नव्हती की त्यांच्या काराकीर्दीत झाली म्हणून त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या अभियानामध्ये सहभाग घेऊन आपल्या गावाचे महाराष्ट्रात नाव लौकिक होण्यासाठी पुढाकार घेतला व ते यशस्वीपणे राबवला.



वृक्षारोपण असेल किंवा गावातील प्रलंबित असलेली रस्ते त्यांच्या नेतृत्वात खुले करण्यात आले एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून युवा नेते सुनील केंद्रे आणि त्यांच्या पत्नी उत्कृष्ट सरपंच वर्षाताई सुनील केंद्रे आज सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत या पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून पाच महिलांची निवड करण्यात आली त्यात प्रथम नाव वर्षाताई सुनील केंद्रे यांचं आहे येत्या काही दिवसात कुमठा खुर्द तालुका उदगीर या गावात हा पुरस्कार प्रदान सोहळा पार पडणार आहे हा मानाचा पुरस्कार मिळाल्यामुळे अनेक सामाजिक संघटना पक्ष यांच्याकडून अभिनंदन असा वर्षाव होत आहे.


# जिव्हाळ्याचे प्रश्न ऐरणीवर घेणार; थोर महात्म्यांच्या विचारांचा जागर

## सोमवार पासून अंबाजोगाई ते कळंब लोकसंवाद पदयात्रेचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** अंबाजोगाई ते कळंब तालुक्यांतील सुमारे २० गावांमधून लोकशक्तीच्या चैतन्याला साद घालणारी आणि थोर महात्म्यांच्या विचारांचा जागर करीत जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचे लोकशिक्षण करणारी आश्वासक लोकसंवाद पदयात्रा सोमवार, दिनांक २७ एप्रिल पासून अंबाजोगाई तालुक्यातील चनई येथून सुरू झाली असून, कळंब येथे १ मे २०२६ रोजी या लोकसंवाद पदयात्रेचा समारोप होणार आहे. ही माहिती पदयात्रेचे प्रमुख संयोजक डॉ.सोमनाथ रोडे यांनी येथे दिली.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे द्विशताब्दी स्मृतीवर्ष, सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती, कस्तुरबा व महात्मा गांधी यांची १५७ वी जयंती आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेली ही पदयात्रा केवळ जनाधारावर चालणार आहे. त्यामुळे जनतेने स्वेच्छेने पदयात्रेसाठी आर्थिक मदत करण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. विविध संस्था व संघटनांच्या समन्वयातून ही पदयात्रा आयोजित करण्यात आलेली असून साधारणतः दररोज तीन ते चार गावातून सेंद्रीय शेती, गोबर गॅस, गांडूळ खत निर्मिती, पारंपरिक बियाणांचे जतन, स्वदेशीचा वापर, पर्यावरण संतुलन, अंधश्रध्दा निर्मूलन, ग्रामसफाई, महिला सक्षमीकरण, कुटुंब नियोजन, वृक्ष संगोपन, जमीन आणि पाणी व्यवस्थापन, रक्तदान, संविधानात्मक मूल्यांची जोपासना, व्यसनमुक्ती, योग आणि आरोग्य शिक्षण, लोकनीतीचे सक्षमीकरण, एड्स समज आणि गैरसमज, सौरऊर्जा, प्लॅस्टीक निर्मूलन इत्यादी प्रश्नांबाबत लोकजागरण करण्यात येणार



आहे. लोकसंवाद पदयात्रेच्या दरम्यान महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचे व मान्यवरांचे बहुमोल मार्गदर्शनही ग्रामस्थांना लाभणार असल्याचे संयोजकांनी सांगितले. राळेगण सिद्धी, हिवरे बाजार (अहिल्यानगर), आनंदवन (चंद्रपूर), कडवंची (जालना), पाटोदा (छत्रपती संभाजीनगर) आणि लेखा-मेंढा (गडचिरोली) या गावांच्या धर्तीवर स्थानिक ग्रामस्थांच्या व विशेषतः तरूणांच्या सामूहिक प्रयत्नांतून नवे गाव, नवे चैतन्य साकार व्हावे ह्या प्रामाणिक जाणीवेतूनच ही जनाधारित लोकसंवाद पदयात्रा आयोजित करण्यात आलेली आहे. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबा भावे व लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण, स्वावलंबी भारत निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणजेच ही जनाधारीत पदयात्रा होय. लोकसंवाद पदयात्रेच्या कालावधीत ग्रामविकास व अन्य परिवर्तनाच्या चळवळीस उपयुक्त ठरणाऱ्या पुस्तकांचे प्रदर्शन व विक्रीची व्यवस्था पदयात्रेसोबत राहणार आहे. पक्षनिरपेक्ष विचारांशी बांधिलकी मानणारी आणि सांप्रदायिक सद्भावना जागवणारी ही एक विचार दिंडीच आहे. गाव, ग्रामस्थांशी अस्मिता असणाऱ्यांनी या लोकसंवाद पदयात्रेत सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन लातूर जिल्हा सर्वोदय मंडळ, लातूर, जयप्रभा ग्रामीण विकास मंडळ, अंबाजोगाई, मराठवाडा जनता विकास परिषद (शाखा-लातूर, अंबाजोगाई, कळंब) व अंधश्रध्दा निर्मूलन समिती (शाखा - लातूर, अंबाजोगाई, कळंब) च्या वतीने प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, शिवाजी खोगरे, माधव बावगे, शरद देशपांडे, नागनाथ तोंडारे, प्रदीप चव्हाण, शिरिष आपेट, दयानंद देशमुख, हरीदास तम्मेवार, नरसिंग घोडके, के.ई.हरिदास, दादाराव शिंदे व प्रा.शंकर भोसले यांनी केले आहे.

पदयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन :

लोकसंवाद पदयात्रा आयोजित करण्यात आली असल्याचे डॉ.सोमनाथ रोडे म्हणाले. या लोकसंवाद पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळ (मुंबई), जिल्हा सर्वोदय मंडळ (लातूर), समाज भारती (लातूर), माध्यम (लातूर), स्वराज अभियान (लातूर), राष्ट्रसेवा दल व अंधश्रद्धा निर्मूलन समिती (लातूर, अंबाजोगाई आणि कळंब), जी-२४ (लातूर), सत्यशोधक समाज (छत्रपती संभाजीनगर), जयप्रभा ग्रामीण विकास मंडळ (अंबाजोगाई) व ग्रामस्वराज्य प्रतिष्ठान (वसमत) आदी संस्था-संघटनांनी केले आहे.

# सरस्वती नदीतील प्रस्तावित कॉंक्रीटीकरणामुळे अर्ध्या परळीवर भविष्यात जलसंकट

### धोकादायक काम त्वरित रद्द करण्यात यावे - अश्विन मोगरकर

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ |** सरस्वती नदीपात्रात केले जाणारे प्रस्तावित भूजल पातळीला धोका निर्माण करणारे सिमेंट कॉंक्रीटीकरण रद्द करण्याची मागणी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी परळी नगरपरिषदेकडे केली आहे.



बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिर असलेल्या परळी शहरातील जुन्या गावभागातून वाहणारी सरस्वती नदी वैद्यनाथ मंदीरासमोरील स्मशानभूमी पासून, अंबेवेस, कृष्णा नगर, बरकत नगर मार्गे गंगाखेड रोडकडे नदीत मिसळते. सरस्वती नदीतून सर्वसाधारणपणे जून पासून जानेवारी पर्यंत सहा ते आठ महिने पावसाचे पाणी वहात असते. याच नदीवर सार्वजनिक स्मशानभूमी जवळ नाथ पॅटर्न चा बंधारा बांधण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन नदी संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर विविध उपाय योजना करीत असते. मात्र परळी नगरपरिषद आपल्या शहरातील नदी पात्राचे सिमेंटीकरण करत आहे. महाराष्ट्र आपत्ती सौमीकरण प्रकल्प अंतर्गत परळीतील सरस्वती नदीपात्रात कॉंक्रीटीकरण करण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेण्यात आला मात्र यामुळे पर्यावरणाला व भूजल पातळीला धोका निर्माण होणार असल्याचा इशारा अश्विन मोगरकर यांनी दिला आहे.

सरस्वती नदीमुळे जवळपास अर्ध्या परळी शहरात भूजल पातळी वाढण्यास मदत होते. या नदीतून वाहणारे पाणी जमिनीत मुरून गावभागातील आड (घरातील छोट्या पाण्याच्या विहिरी) बोअरवेल ला पाणी टिकून असते व जमिनीत पाण्याचे पुनर्भरण होते व भूजल पातळी वाढते. मात्र नुकत्याच मंजूर झालेल्या सरस्वती नदीपात्राचे संपूर्ण सिमेंट कॉंक्रीटीकरण यामुळे गावभागातील परिस्थिती भविष्यात गंभीर होणार आहे. गावभागातील संपूर्ण नैसर्गिक परिसंस्था (eco-system) बदलून जाणार आहे. भविष्यात पाण्यावरची परळी ही बिनपण्याची परळी होऊन जाईल. याविषयात गावभागातील रहिवाश्यांना कुठलीही माहिती न देता हा प्रस्ताव तयार करण्यात आला असल्याचा आरोप अश्विन मोगरकर यांनी केला आहे.

सरस्वती नदीपात्रात केले जाणारे प्रस्तावित पर्यावरण व भूजल पातळीला धोका निर्माण करणारे सिमेंट कॉंक्रीटीकरण रद्द करण्याची मागणी करत परळी नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांना २७ एप्रिल, सोमवारी दिलेल्या निवेदनात भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

# मसू जाधव यांच्यावर टोळक्याकडून सशस्त्र हल्ला

### 7 जणांविरुद्ध ठाण्यात गुन्हा दाखल

**बीड|प्रतिनिधी**

आंबेडकरी चळवळीतील सक्रिय नेते,अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवून सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी कायम तत्पर असणारे सामाजिक नेते मसू जाधव यांच्यावर दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याकडून मसू जाधव यांना मारहाण आणि गलिच्छ शिवीगाळ करण्यात आली, या घटनेने नाळवंडी सह परिसरात खळबळ उडाली असून परिसरात दूषित आणि भयभीत वातावर तयार झाले आहे.

काल रात्री साडे दहाच्या सुमारास भीमनगर नाळवंडी येथे एका युवकाला मारहाण झाली,त्या मारहाणीच्या संदर्भात मसू जाधव यांना फोन आल्या नंतर मसू जाधव सह अन्य चार जण मसू जाधव सोबत मारहाण झालेल्या युवकाच्या घरी गेले,घरी गेल्यानंतर मारहाण झालेल्या युवकाला विचार पूस करत असताना काही नीच वृत्तीच्या लोकांनी दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याकडून मसू जाधव आणि त्यांच्या साथीदार यांना घरात घुसून तू इथे कस काय आला म्हणत मारहाण आणि अश्लील खालच्या पातळीची शिवीगाळ करण्यात आली.

तू आमच्या पेक्षा लई मोठा झाला का तुझी काय औकात आहे म्हणत दहा ते पंधरा जण मोठ्या मोठ्या आवाजात आज तुला जीवच मारून टाकू,याला मारायला हत्यार काढा,गोळ्या घाला,तुझा डोळाच फोडून टाकू, आमच्या इकडे यायची तुझी हिंमत कशी झाली आम्ही इथले डॉन आहोत असे म्हणत गंभीर मारहाण करण्यात आली.

या टोळीकडून मसू जाधव यांच्या गाडीची तोडफोड देखील केली असून मोठे नुकसान झाले आहे. या घटनेने नाळवंडी सह सर्वत्र खळबळ उडाली असून सामाजिक कार्यकर्ते मसू जाधव यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

मात्र तेथील काही लोकांनी मसू जाधव सह अन्य चार जणांची त्या टोळक्याच्या जमावातून सुटका केली,आणि तत्काळ तिथून पळ काढून पिंपळनेर पोलीस ठाण्या कडे धाव घेतली.रात्री उशिरा पिंपळनेर पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

मसू जाधव यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून अश्या सर्वसाधारण नेतृत्वाला काही जळाऊ प्रवृत्तीच्या टोळक्याकडून झालेल्या मारहाणीचा सर्वत्र जाहीर निषेध होत असून आरोपीवर कठोर शासन व्हावे असे नाळवंडी सह परिसरातील नागरिकांतून म्हंटले जात आहे.

# आ.संदिप क्षीरसागरांनी घेतला विविध विभागांचा आढावा

### मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या केल्या संबंधितांना सुचना

तभा. वृत्तसेवा

**बीड दि.२७ (प्रतिनिधी) |** बीड विधानसभा मतदारसंघातील विविध महत्वाच्या प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी वेगवेळ्या शासकीय विभागांची सोमवारी (दि.२७) रोजी आढावा बैठका घेतल्या. यामध्ये संबंधित विभागांशी निगडीत असलेले नागरिक, शेतकरी यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सुचना संबंधित अधिका-यांना केल्या.

सोमवार (दि.२७) रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे बीड पंचायत समिती, शिरूर कासार पंचायत समिती, जलसंधारण विभाग, जलसंपदा विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या विभागांचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न, शेतक-यांचे प्रश्न, विकास कामांचा आढावा या बाबत चर्चा करण्यात आली. यावेळी आ.संदिप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आणि सामान्य नागरिक उपस्थित होते.



**पुल कम बंधा-याच्या कामासाठी महामार्ग प्राधिकरण, जलसंपदा, जलसंधारण विभागांची संयुक्त बैठक**

बीड शहरातील बार्शी नाका येथे सुरू असलेल्या पुल कम बंधारा कामाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जलसंपदा विभाग आणि जलसंधारण विभाग या तीन विभागांची संयुक्त बैठक झाली. पुढिल येत्या काळात पाणी टंचाई होऊ नये यासाठी लवकरात लवकर पुल कम बंधा-याचे काम पुर्ण होऊन पाणी अडविण्या बाबतच्या नियोजना संदर्भात यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. येत्या पावसाळ्यातच या ठिकाणी पाणी अडवून बीड शहर आणि परिसरातील गावांची पाणी पातळी वाढविण्याच्या अनुषंगाने ही बैठक महत्वपुर्ण ठरली आहे.

# वडवणी तालुक्यात तरुणाचा मृतदेह आढळला

### नातेवाईकांची घातपाताची शक्यता व्यक्त



वडवणी : वडवणी तालुक्यातील पुसरा शिवारात चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या तरुणाचा संशयास्पद अवस्थेतील मृतदेह आढळून आला. निवास राठोड (३५) असे या तरुणाचे नाव असून या प्रकरणात सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

तिगांव ग्रामपंचायत हद्दीतील गांडगे वस्ती येथील रहिवासी निवास गोविंद राठोड (वय ३५) हे आयुर्वेदिक औषध विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. शांत, मनमिळावू स्वभावामुळे ते गावात परिचित होते. गुरुवार, २३ एप्रिल रोजी सकाळी ते नेहमीप्रमाणे घराबाहेर पडले; मात्र रात्रीपर्यंत परत न आल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. कुटुंबीयांनी स्वतःच्या पातळीवर शोध घेतला. मोबाईलवर संपर्क साधण्याचे अनेक प्रयत्न निष्फळ ठरले.

नातेवाईक, मित्रमंडळी आणि गावकऱ्यांनी परिसरातील गावांमध्ये, ओळखीच्या ठिकाणी तसेच रुग्णालयांमध्ये चौकशी केली; मात्र काहीही धागेदोरे मिळाले नाहीत. अखेर पत्नी संगीता राठोड यांनी २५ एप्रिल रोजी वडवणी पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली.

मोबाईल लोकेशन, संपर्कातील व्यक्ती यांचा तपास सुरू असतानाच रविवारी (दि. २६ एप्रिल) दुपारी सुमारे ४ वाजता पुसरा शिवारातील एका शेतात तरुणाचा मृतदेह आढळल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता मृतदेहाची ओळख निवास राठोड अशी पटली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सर्व पुरावे जप्त केले असून मृतदेह अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पाठवण्यात आला.

# अर्वाच्य भाषा वापरुन लोकशाहीची गळचेपी हीच संस्कृती का? : माकप

### आ.संजय गायकवाड, बागेश्वर बाबा प्रकरणी कारवाईची मागणी-कॉ.अजय बुरांडे

तभा. वृत्तसेवा

**परळी , प्रतिनिधी |** छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास जनतेसमोर आणणाऱ्या कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे संपादक प्रशांत अंबी यांना अत्यंत वाईटरित्या शिवीगाळ करत धमक्या दिल्या. माता भगिनी वरून त्यांनी वापरलेली भाषा कोणत्याही सभ्य माणसाला सहन होणार नाही अशी आहे. आमदार संजय गायकवाड यांचा व त्यांच्या पक्षाचा देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला पाठिंबा आहे.लोकशाही मध्ये व्यक्त होणाऱ्या व्यक्तीला अशा पद्धतीने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देणे, हीच आपल्या पुरोगामी महाराष्ट्राचा वारसा आणि संस्कृती आहे का असा प्रश्न करत सरकारला पाठिंबा देणाऱ्या संजय गायकवाड यांच्या वक्तव्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करत आपली भूमिका जाहीर करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष बीड यांनी केली आहे.



कॉ.गोविंद पानसरे लिखित पुस्तकावरून प्रकाशकाना आ. संजय गायकवाड यांनी खालच्या पातळीवर जाऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. या कथित संभाषणात स्त्री जातीबद्दल अवमानकारक शब्द प्रयोग करण्यात आले.एकीकडे नारी वंदनाची भाषा करायची व दुसरीकडे महिलांबद्दल अर्वाच्य भाषा वापरणाऱ्यांचा पाठिंबा घेत त्यांच्या कृतीचे, मौन बाळगत समर्थन करायचे का? योग्य कारवाई करणार याबाबत भूमिका स्पस्ट करण्याची मागणी केली तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत यांच्या उपस्थितीमध्ये कथा वाचक बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अतिशय वादग्रस्त विधान केले या सर्व प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मोहन भागवत समर्थन करत आहेत काय ? असा प्रश्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने उपस्थित केला असून याबाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट करावी असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष बीड जिल्हासचिव कॉ.ॲड. अजय बुरांडे यांनी केले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार संजय गायकवाड व कथावाचक बागेश्वर बाबा या दोघांवरही कडक कारवाई करावी अशी मागणी ही वतीने करण्यात आली आहे.

# रामकीसन मुंडे यांचे निधन



तभा. वृत्तसेवा

**केज दि.२८ ( प्रतिनिधी ) |** केज तालुक्यातील देवगांव येथील रहिवासी जेष्ठ नागरिक रामकीसन पांडूरंग मुंडे वय ९० वर्षे यांचे २८ एप्रिल मंगळवारी सकाळी वृध्दपकाळाने निधन झाले.

त्यांच्यावर मंगळवारी अंतिम संस्कार करण्यात आले.रामकीसन मुंडे यांच्या पश्चात दोन मुले,सुना, मुली जावाई,नातावंडे अशा परिवार आहे.देवगांवचे माजी उपसरपंच विठ्ठल मुंडे व उध्दोजक नितीन नागरगोजे यांचे ते आजोबा होतं.

# ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामामुळे बीडमध्ये सकारात्मक परिवर्तन!

### अंजली व अनिश दमानिया यांचा दोन दिवशीय कृषीकुल दौऱ्यात प्रभावी सुसंवाद, माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचीही भेट; शेती, मातीच्या विषयावर सखोल चर्चा

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) |** कधीकाळी तीव्र दुष्काळ, शेतीचे अपयश आणि मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर यासाठी ओळखला जाणारा बीड जिल्हा आज हळूहळू सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसत आहे. या परिवर्तनामागे ग्लोबल विकास ट्रस्टच्या सातत्यपूर्ण आणि शाश्वत कामाची मोठी भूमिका असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले. २०१२ साली बीड जिल्ह्यात प्रथम दौरा केल्याच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या, “त्या वेळी अनेक गावांमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती होती. पाण्याचा तीव्र दुष्काळ, शेती संकटात आणि गावात केवळ लहान मुले व वृद्धच दिसत असत. मात्र गेल्या काही वर्षांत झालेल्या कामांमुळे आज या परिस्थितीत लक्षणीय बदल झालेला दिसतो.”

त्या पुढे म्हणाल्या की, २०१६ पासून माझे बंधू मयंक गांधी आणि संजय परमार यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे हा बदल शक्य झाला आहे. फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन, आधुनिक तांत्रिक मार्गदर्शन आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिलेला आधार यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. परिणामी, शेतीकडे पुन्हा ओढ निर्माण झाली असून जिल्ह्यातील स्थलांतरालाही आळा बसला आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे शेतीला पाणी उपलब्ध होणे ही या बदलाची सर्वात महत्त्वाची बाजू असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या “कृषीकुल” प्रशिक्षण केंद्राला दिलेल्या दोन दिवसीय भेटीत अंजली दमानिया आणि त्यांचे पती अनिश दमानिया यांनी विविध उपक्रमांची सखोल पाहणी केली. डेमो प्लॉट्स, माती परीक्षण प्रयोगशाळा, जलसंधारण प्रयोगशाळा, पीक संरक्षण प्रयोगशाळा, सेंद्रिय शेती प्रयोग आणि बायोगॅस संयंत्र यांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेत संवाद साधला. यावेळी संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले की, “देशातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या ध्येयाने आम्ही काम करत आहोत. हजारो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक तंत्रज्ञान व प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. मात्र अजूनही अनेक अडचणी आहेत, शेतीसाठी आवश्यक रस्त्यांची कमतरता,



प्रशासनाचे अपुरे सहकार्य आणि सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे गंभीर आहेत.” या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी या कामात सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अनिश दमानिया, जे महाराष्ट्र शासनाच्या धोरणनिर्मिती संस्थेतील “मित्रा”चे सचिव आहेत, यांनी सांगितले की, “ग्लोबल विकास ट्रस्टमुळे हजारो शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या संस्था अत्यंत कमी आहेत. या कार्याला अधिक बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनात व्यापक परिवर्तन घडवण्यासाठी आम्ही कायम त्यांच्या सोबत राहू.” तसेच शासनाच्या लोककल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ट्रस्टसोबत समन्वयाने काम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या दौऱ्यादरम्यान बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी तथा माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनीही कृषीकुलची पाहणी करून उपक्रमांची माहिती घेतली आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाचे कौतुक केले. एकूणच, बीड जिल्ह्यातील बदलाची ही कहाणी केवळ प्रकल्पांची नाही, तर शाश्वत शेती, पाणी व्यवस्थापन आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर उभ्या राहिलेल्या ग्रामीण पुनरुत्थानाची आहे—आणि त्यात कृषीकुलसारख्या उपक्रमांची भूमिका निर्णायक ठरत असल्याचे या भेटीतून अधोरेखित झाले.

कायम ग्लोबल विकास ट्रस्टच्या सोबत राहू - अंजली दमानिया

केवळ बिड जिल्यातील नव्हे तर राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था काम करत आहे. जलनायक मयंक गांधी आणि संजय परमार यांच्या प्रयत्नातून संस्थेचा विस्तार झपाट्याने वाढत असल्याचा मला मनस्वी आनंद असून, आगामी काळात शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या ग्लोबल विकास ट्रस्टसोबत सर्व पातळीवर काम करणार असल्याचेही सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बोलताना सांगितले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ■ जिल्हाधिकाऱ्यांकडून ग्राम रोजगार सहायकांच्या आंदोलनाची दखल ■

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सेवक संघ, जिल्हा लातूर यांच्या वतीने प्रलंबित मागण्यांसाठी सोमवार दि. २७ एप्रिल पासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने उष्माघाताने होणाऱ्या परिणामामुळे जिल्हाधिकारी यांनी आजच्या आज ग्राम रोजगार सहाय्यकांच्या आंदोलनाची दखल घेऊन मंत्रालयाला पत्र पाठवून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. ग्राम रोजगार सहाय्यकांनी त्यांच्या विनंतीला मान देऊन आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

शासनाच्या ३ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी, तसेच इतर प्रलंबित व न्याय्य मागण्यांसाठी जिल्ह्यातील सर्व रोजगार सहाय्यकांनी १ एप्रिल पासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. मात्र, अनेक वेळा प्रशासनाशी पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या पार्श्र्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व रोजगार सहाय्यक, जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन, मागण्या पूर्णपणे मान्य झाल्याशिवाय काम बंद आंदोलन मागे घेतले जाणार नाही, अशी ठाम भूमिका घेण्यात आली. त्यानुसार सोमवार दि. २७ एप्रिल पासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर ग्राम रोजगार सहाय्यकांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. जिल्हाधिकारी आंदोलनाची दखल घेऊन मंत्रालयाला पत्र पाठवून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. ग्राम रोजगार सहाय्यकांनी त्यांच्या विनंतीला मान देऊन आंदोलन तात्पुरते स्थगीत केले आहे.



## विविध वृत्त...

## लातूरचा पाणीपुरवठा सुरळीत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पावरील विद्युत पुरवठ्यात रविवारी (दि.२६) बिघाड झाल्यामुळे धनेगाव येथील मांजरा प्रकल्पावरून शहराला होणारा पाणीपुरवठा खंडित झाला होता. परंतु, सायंकाळीच बिघाड दुरुस्त करण्यात आला. त्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत झाला असल्याचे महापालिका प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले.

रविवारी धनेगाव येथून पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पाला एक्सप्रेस फीडरद्वारे होणारा पाणीपुरवठा तांत्रिक कारणांनी खंडित झाला होता. युद्धपातळीवर काम करून तो सायंकाळपर्यंत पूर्ववत करण्यात आला. परंतु, या बिघाडामुळे रविवारी दुपारी १२ ते सायंकाळी ७ या कालावधीत प्रकल्पावरून पाणी उचलण्याची प्रक्रिया थांबलेली होती. सायंकाळी ती पुन्हा सुरू झाली. यामुळे काही काळासाठी शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन विस्कळीत झाले होते. सोमवारी ते पूर्ववत सुरू झाले आहे. शहरातील नागरिकांना दर पाचव्या दिवशी नियमितपणे पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाळ्याचे दिवस असले तरी पाणी वेळेत मिळावे, याची काळजी प्रशासनाच्या वतीने घेतली जात आहे. तांत्रिक बाबींमुळे काही वेळा अडचणी निर्माण झाल्या तरी तत्काळ उपाययोजना करून पाणीपुरवठा सुरळीत केला जात असल्याची माहिती महापालिकेच्यावतीने देण्यात आली.

## वासवीदेवी जयंतीनिमित्त मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** आर्य वैश्य समाजाची कुलस्वामिनी वासवीदेवी जयंतीनिमित्त शहरात भक्तिभावाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आर्य वैश्य यूथ संघटनेने येथील शासकीय रुग्णालयात रुग्ण व नातेवाईकांना खिचडी व बर्फी वाटप केले. आर्य वैश्य समाजाच्या वतीने काढण्यात आलेल्या मिरवणुकीत समाजबांधवांनी सहभाग नोंदविला.

यात आकर्षक रथावर माता वासवीदेवींची प्रतिमा सजविण्यात आली होती. पारंपरिक वेशभूषेत महिला, युवकांनी सहभाग नोंदविला. ढोल-ताशांच्या गजरात वातावरण भक्तिमय झाले होते. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भजन-कीर्तन आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील ऐक्य, बंधुता वाढवण्याचा संदेश देण्यात आला. शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकीनंतर नगरेश्र्वर मंदिरात वासवीदेवीची आरती झाली. समाज बांधवांनी स्नेहभोजन केले. या मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी सोमनाथ बोरलेपवार, संगम कोटलवार, संजय पंपटवार, आर्य वैशय समाज अध्यक्ष दीपक कोटलवार, सचिव सुनील बच्चेवार, उषा बट्टेवार, विठ्ठल तगडपल्लेवार, संजय पंपटवार यांच्यासह समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

## जिल्हा परिषदेत होणार ओपीडी सोय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** हल्ली जीवघेण्या उन्हामुळे नागरिकांना सकाळपासून सायंकाळपर्यंत प्रचंड अस्वस्थ होत आहे. गेल्या आठवडाभरात जिल्हा परिषदेत एक, दोघांना चक्कर येण्याचा प्रकार घडला. ही बाब जि. प. अध्यक्षा उषा पाटील यांच्यापर्यंत गेल्याने त्यांनी जिल्हा परिषदेत एक स्वतंत्र ओपीडी सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला.

जिल्हा परिषदेत सुरू केल्या जाणाऱ्या ओपीडीत अधिकारी, कर्मचाऱ्यांसह कामानिमित्त जिल्हा परिषदेत येणाऱ्या अभ्यंगतांनाही आरोग्य सुविधा दिल्या जाणार आहेत. जिल्हा परिषदेकडे स्वतंत्र आरोग्य विभाग कार्यरत आहे. या विभागात चार, पाच तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आहे. तसेच औषध, गोळ्यांचीही उपलब्धता आहे. जिल्हा परिषदेतल्या तळमजल्यावरील आरोग्य विभागाच्या नजीक स्वतंत्र ओपीडी कक्ष स्थापन करण्याचा मनोदय अध्यक्षा पाटील यांनी व्यक्त केला.

# भगवंताच्या सेवेसाठी आपला देह अर्पण करावा : उत्तरेश्वर पिंप्रीकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** भगवंताचे नामचिंतन घेतले तर ते स्थान पवित्र होते. चांगल्या जागेत सकारात्मक संकल्प सतत येत असतात. त्यामुळे हा देह भगवंताच्या सेवेसाठी अर्पीत करावा. जेथे संतांचे स्थान असते तेथे भगवंताचे अधिष्ठान असते. तिथली माती सुद्धा पवित्र होते. आज विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची वास्तू हे विश्वाचे कल्याण करेल असे मौलीक विचार ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर यांनी व्यक्त केले.



विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी, पुणे व समस्त गावकरी रामेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन रामेश्वर येथे संत गोपाळबुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह आणि शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सप्ताहाचा समारोप ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाला. विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची वास्तुशांती होम हवन आणि अध्यात्मिक अनुष्ठानाच्या माध्यमातून करण्यात आली.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड हे होते. यावेळी रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम कराड, प्रगतीशील शेतकरी काशीराम कराड, लातूर ग्रामीणचे आ. रमेशअप्पा कराड, एमआयटी एडीटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेशबापू कराड, सौ. उषा विश्वनाथ कराड, कमल राजेखाँ पटेल, संत गोपाळबुवा कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, सरपंच सचिन कराड यांच्यासह रामेश्र्वर आणि पंचक्रोशितील भाविक भक्त मोठ्या संख्येनी उपस्थित होते. या सप्ताहात तानाजी पांचाळ यांच्या पुढाकाराने मुस्लिम मुलांनी सात ही दिवस विष्णुसहस्त्र नाम, मधुराष्टकम, भगवतगीतेतील १५ वा अध्याय, श्री पांडुरंग अष्टकम आणि पसायदान यांचे पठण केले ही सर्वात विशेष बाब होती.

ह.भ.प. नारायण महाराज पिंप्रीकर म्हणाले की, नामचिंतनात शक्ती असते. त्यामुळे भगवंताचे नामस्मरण सतत करावे. संकल्पांना सत्यात पूर्ण करण्याचे कार्य संतांच्या हस्ते होत असते. जन्म देणारी भूमी आणि माता ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ असते. तर याप्रसंगी बोलताना डॉ. राहुल कराड म्हणाले राज्यात वारकरी संप्रदायाचा प्रभाव आहे. त्यातच कराड घराण्यात ही संस्कृती तयार झाली. प्रत्येक व्यक्तीची नाळ ही गावाशी जुळली जावी. आज रामेश्र्वर गावाचे नाव संपूर्ण जगभरात मानवतेचा व विश्र्वशांतीचा संदेश देणारे गाव म्हणून ओळखले जात आहे. २१ व्या शतकात भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगाला सुख, समाधान व शांतीचा मार्ग दाखवेल. तसेच ज्ञानाचे दालन म्हणून उदयास येईल. त्याची सुरूवात रामेश्र्वर या गावातून झाली आहे.

आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, ज्या गावात संप्रदाय वाढतो, त्या गावात एकी निर्माण हाते. डॉ. विश्र्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाने रामेश्वर गावात राम मंदिर, दर्गा मस्जिद, बुद्ध विहार, राम-रहिम सेतू, गोपाळबुवा मंदिर आणि विश्र्वधर्मी मानवतातीर्थ भवन उभारल्याने गावाचे स्वरूप बदलले आहे. या सप्ताहात सर्व जाती धर्माचे लोग सहभागी झाले आहेत, हे अभिमानस्पद आहे.

डॉ. मंगेश कराड म्हणाले की, आपली जन्मभूमी स्वर्गापेक्षा अधिक प्रिय आहे. गाव आणि समाज बदलत चालला आहे. या बदलेल्या काळात गावातील सर्वांना एकत्रित आणणे गरजेचे असून त्यासाठी हरिनाम सप्ताहाचे आयोजन अतिशय महत्वाचे आहे. गावातील प्रत्येकाचे नाते हे या मातीशी जुळलेले असले पाहिजे. तर राजेश कराड म्हणाले की, मानवतातीर्थ भवन हे अद्वितीय आहे. ज्याची निर्मिती विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी केली आहे. सर्वांना प्रेरणा देणारी ही वास्तू आहे. सप्ताहात रामेश्वर येथील प्रत्येक जाती धर्माचे व्यक्ती सहभागी झाले हे जगातील एकमेव उदाहरण आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प. शालिकराम खंदारे यांनी केले.

# लातुरात 'गो सन्मान अभियान'ची अभूतपूर्व शोभायात्रा





**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** 'न भूतो न भविष्यती' अशी भव्य आणि अद्भुत गो सन्मान अभियानाची शोभायात्रा सोमवारी लातूर शहरात उत्साहात पार पडली. हभप श्रीरंग महाराज औसेकर, हभप विद्याधरसागर महाराज गातेगावकर, हभप बाळकृष्ण महाराज वृंदावन गातेगावकर, बाबामहाराज काटेगावकर, हभप सुगावकर महाराज आदी संतांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अजित पाटील कव्हेकर, मोटेगावकर सर, ललितभाई शहा, विनय भुतडा, संजय बोरा यांच्या प्रमुख उपस्थितीत या शोभायात्रा काढण्यात आली. लातुरातील हनुमान चौक येथून शोभायात्रेला प्रारंभ करण्यात आला. प्रारंभी शांतीनाथ जैन मंदिरात मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर श्री गणेश पूजन, श्रीराम पूजन व गोपूजन करून शोभायात्रेला सुरुवात झाली. या शोभायात्रेत गोमातेची भव्य प्रतिकृती, भगवान श्रीरामांचा आकर्षक रथ, भगवे झेंडे तसेच गोमातेच्या महत्त्वावर प्रकाश टाकणारे विविध फलक यांचा समावेश होता. जवळपास १०० गायी आणि हजारो गोभक्त व गोप्रेमी सहभागी झाल्याने वातावरण भक्तिमय झाले होते.

'गोमाता की जय', 'गोहत्या बंद करो' अशा घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. टाळ-मृदुंगाच्या गजरात वारकरी, विद्यार्थी आणि पारंपरिक वेशभूषेतील सहभागी यांनी शोभायात्रेला रंगत आणली. महिलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. ही शोभायात्रा गांधी चौक, लोकमान्य टिळक चौक मार्गे तहसील कार्यालयात विसर्जित करण्यात आली. तहसील कार्यालयात साधू-संत व गोप्रेमींनी तहसीलदारांना निवेदन दिले. यात गाईला 'राष्ट्रमाता' घोषित करणे, गोवंश हत्याबंदी कायद्याची कडक अंमलबजावणी, गोशाळांना वाढीव अनुदान व गोविज्ञानाला प्रोत्साहन देण्याच्या मागण्या करण्यात आल्या. हे निवेदन राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे. या शोभायात्रेने लातूरकरांचे विशेष लक्ष वेधले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीकांत रांजनकर, शरद डुंगरवाल, गोविंद कोठारी, निळकंठ महाराज, नितीन चापसी, किरण ब्रहोचा, सत्यनारायण सोनी, अतुल शहा, अजय गंभीरे, केयूर कामदार, आदर्श जैन, विवेक कुचेरिया, शुभम संकलेचा, प्रसिध्दी प्रमुख राजेश डुंगरवाल तसेच गोपाल गोसेवा न्यास मंडळ व सर्व गोप्रेमींनी परिश्रम घेतले.

## युरिया व डीएपी विक्री बंद ठेवण्याचा असोसिएशनचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** रासायनिक खतांचे मार्जिन व लिंकिंग, खतांची विक्री करताना थेट गुन्हा दाखल करणे आणि 'साथी' ॲपच्या माध्यमातून बियाणे विक्री अनिवार्य केल्याच्या निषेधार्थ दि. २७ एप्रिलपासून खत विक्री बंद करण्याचा निर्णय लातूर जिल्हा फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशने घेतला आहे. ऐन खरीपाच्या पेरणीच्या तोंडावर खत विक्री बंद झाल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणीचा डोंगर उभा राहिला आहे.

महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइडस सीड्स डिलर्स विशाल कृतीचा असोसिएशन 'माफदा' यांनी सोमवारपासून बेमुदत बंदची हाक दिली आहे. 'माफदा'च्या या बंदला लातूर जिल्हा फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशनने पाठिंबा दिला आहे. कृषी निविष्ठा विक्रेत्यांना होणाऱ्या त्रासाच्या विरोधात 'माफदा'ने हा बंद पुकारला आहे. कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी सीलबंद खतांची विक्री केली तरी त्यांच्याविरोधात थेट फौजदारी स्वरुपाची कारवाई केली जाते. खत विक्रेत्या कंपन्यांकडून लिंकिंगची सक्ती केली जाते. साथी ॲपचा अग्रह, चनावट एचटीबीटी बियाणे आदी मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'माफदा'ने बेमुदत बंदची हाक दिली आहे. त्यास लातूरच्या खत विक्रेत्यांनी पाठींबा दिल्याने सोमवारी लातूर जिल्ह्यतील खत विक्री बंद होती.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी युरिया व डीएपी विक्री बाबत गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत आम्ही कोणताही डीएपी व युरिया उतरवून घेणार नाही व विक्री करणार नाही, असे निवेदन जिल्हा कृषी अधिकारी यांना देण्यात आले. लातूर जिल्हा फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रदीप सोनवणे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने लातूर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्या समोर जिल्ह्यातील युरिया व डीएपी विक्री करताना येणाऱ्या अडचणींचा पाढा वाचला. भावातील तफावत व खत विक्रीबाबत स्पष्ट स्वरुपात नसलेल्या गाईडलाईन यामुळे शेतकरी ग्राहक व विक्रेते दुकानदार यांच्यात अनेकदा वाद होतात. यामुळे दुकानदारांना शेतकऱ्यांना योग्य दरात व वेळेवर खत मिळावे यासाठी खत विक्रेते मोठ्या प्रमाणात गुंतवणुक करतात तरी ही अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांना विनाकारण प्रशासकीय कार्यवाहीचा सामना करुन आपला व्यवसाय करावा लागतो, असे सांगुन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी यांनी युरिया व डीएपी विक्रीबाबतची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात दिल्यास शेतकऱ्यांत व दुकानदारांमध्ये वाद होणार नाही.

# खरीप हंगामात शेतकऱ्यांना कुठलीही अडचण येऊ नये : आ. रमेशअप्पा कराड

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. २८ एप्रिल :** समाधानकारक पाऊस पडला की खरीप हंगामाच्या पेरणीसाठी शेतकऱ्याची घाई असते अशावेळी शेतकऱ्यांना हवे ते खत बी बियाणे मिळायला हवे मात्र अनेकदा शेतकऱ्यांची अडवणूक, फसवणूक होते जाणीवपूर्वक तुटवडा निर्माण केला जातो याची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी येणाऱ्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना कसलीही अडचण येणार नाही सुरळीत हंगाम पार पडावा याची दक्षता घ्यावी अशा सूचना लातूर ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड यांनी दिल्या.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघ कार्यक्षेत्रातील खरीप हंगाम २०२६ पूर्वतयारी व नियोजन आढावा बैठक लातूर ग्रामीणचे आमदार. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार २७ एप्रिल २०२६ रोजी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात झाली. या बैठकीस किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख, जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, रेणापूरचे उपसभापती शरद दरेकर, लातूर तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, रेणापूर तालुका कृषी अधिकारी नितीन कांबळे, औसा अधिकारी दत्तात्रय हाके, यांच्यासह विमा कंपनीचे संबंधित अधिकारी, गुण नियंत्रण कृषी अधिकारी, मंडल अधिकारी, उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी व इतर संबंधित उपस्थित होते.

या बैठकीत खरीप हंगाम २०२६ पूर्वतयारी अनुषंगाने पर्जन्यमान, पीक पेरणी व नियोजन, विविध कंपन्याची खते आणि बी बियाणे, पीक विमा स्थिती, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सहानुग्रह अनुदान योजना, पीएम किसान योजना, आपत्कालीन पीक नियोजन, क्षेत्र विस्तार व उत्पादकता वाढ, फलोत्पादन, सोयाबीन बियाणे नियोजन, पाणलोट विकास, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, नैसर्गिक आपत्ती यासह विविध विषयाचा तालुका निहाय आढावा आ. रमेशअप्पा कराड यांनी घेतला.

शेतकऱ्यांच्या गरजेनुसार युरिया, डीएपी खताचा आणि बियाण्याचा वेळेत पुरवठा करण्यात यावा, पेरणीसाठी खताची अडचण शेतकऱ्यांना येणार नाही याची काळजी घ्यावी. गावोगावच्या कृषी सेवा केंद्राकडून शेतकऱ्यांची अडवणूक आणि फसवणूक होणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दक्ष रहावे असे सांगून बैठकीत बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, पेरणीच्या काळात हव्या त्या नामांकित कंपनीचे बियाणे मिळत नसल्याने बाजारात विविध कंपन्यांच्या नावाचे बोगस बियाणे उपलब्ध असते, सदरील बियाणे कुठल्या कंपनीचे आहे, ते अधिकृत आहे का, सर्टिफाईड आणि दर्जेदार आहे का याची माहिती घेतली जावी जेणेकरून शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

घरचे बियाणे पेरणी केल्यास उत्पादन कमी होते ही वस्तुस्थिती असल्याने नामांकित बियाण्याच्या मागणीकडे शेतकऱ्याचा कल असतो. महाबीजच्या बियाणेची टंचाई निर्माण झाल्यास त्याच तोडीचे पर्याय उपलब्ध करावे, खरीप पेरणी बरोबरच ऊस आणि फळबागासाठी खताची टंचाई होणार नाही याची काळजी घेऊन नियोजन करावे, येणारा खरीप हंगाम हा सुरळीत पार पडावा. सरकार विषयी राग रोष निर्माण होऊ नये. शेतकऱ्यांना समाधान मिळाले पाहिजे. शेतकऱ्यांची तक्रार येणार नाही त्यांची अडवणूक आणि अडचण होणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दक्ष राहून काम करावे असेही लातूर ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

## शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविणार : मंत्री पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** राज्यातील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्र्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्र्वासन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी येथे दिले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने आयोजित गुरूगौरव पुरस्कार व उपक्रम शाळांच्या सन्मान सोहळ्याचे उद्घाटन करतेवेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षक परिषदेचे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आ. विक्रम काळे, जि. प.चे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, जि. प.तील भाजपचे गटनेते रामचंद्र तिरूके, महिला व बाल कल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा शोभा आकनगिरे, अंबेजोगाई डायटच्या प्राचार्या भागिरथी गिरी, मराठवाडा कार्याध्यक्ष बालाजी पाटील, प्रशांत भिंगोले उपस्थित होते. याप्रसंगी जिल्ह्यातील ७१ प्राथमिक, माध्यमिक शिक्षक व १२ शाळांना उपस्थितांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गुरूगौरव पुरस्काराने सन्मानित केले. उन्हाळे म्हणाले, सध्या देशात टीईटी परीक्षेचे भूत शिक्षकांच्या मानगुटीवर बसले आहे. यासंदर्भात, न्यायालयीन लढा चालू आहे. शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, यासाठी संघटनेद्वारे प्रयत्न सुरू आहेत.

# जिल्ह्यातील २१ शिक्षकांचा गुरूगौरव पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि.२८ एप्रिल :** अक्षय तृतीयाच्या शुभ मुहूर्तावर अखिल भारतीय शैक्षिक महासंघ सलग्र असलेल्या महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद लातूर जिल्हा व लातूर महानगर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यातील २१ शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ चा गुरु गौरव पुरस्कार महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष वेनुनाथ कडू पाटील व नागपूर विभागाचे माजी शिक्षक आमदार नागो गाणार सर यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील २१ शिक्षकांचा गुरु गौरव पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद लातूर जिल्हा व लातूर महानगर च्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी लातूर जिल्ह्यातील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याची परंपरा कायम ठेवत जिल्ह्यातील होतकरू, विद्यार्थी प्रिय शिक्षकांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन २१ शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर आपल्या केलेल्या कामाची छोटीशी पावती समजून त्यांचा सन्मान ऋषितुल्य व्यक्तिमत्व असणारे माजी आमदार महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद नेते नागो गाणार सर व राज्य अध्यक्ष माननीय वेनुनाथ कडू पाटील व संघटन मंत्री किरण भावठाणकर यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सपत्नीक शिक्षकांचा गौरव करण्यात आला सदरील गुरु गौरव कार्यक्रमासाठी अत्यंत उत्साहाने आदर्श शिक्षक पात्र शिक्षक व त्यांचे मित्र मंडळी व त्यांचे नातेवाईक मोठ्या उत्साहाने उपस्थित झाले होते.

सदरील गुरु गौरव कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यासाठी राज्याध्यक्ष वेणुनाथ कडू पाटील यांनी संघटनेबद्दल बहुमोल असे मार्गदर्शन केले संघटनेमुळे प्रत्येकाला आपल्यावर झालेल्या अन्यायाबद्दल संघर्ष करण्याची ताकद निर्माण होते आणि आपल्याला न्याय संघटना मिळवून देते. संघटनेत काम करण्याची प्रत्येकाला गरज वाटली पाहिजे.माजी आ. नागो गाणार यांनी आपल्या भाषणात जुनी पेन्शन योजना व नवीन योजना यामधील फरक त्रुटी कशा पद्धतीने दूर करता येतील याबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले आणि प्रत्येक व्यक्तीला संविधानाने दिलेल्या अधिकाराप्रमाणे नियत वयो मानाने सेवानिवृत्त झाल्यानंतर शासनाला पेन्शन द्यावेच लागते असे ठणकावून सांगितले.

सदरील कार्यक्रमात संघटन मंत्री किरण भावठाणकर राज्य विस्तारक प्रा. मधुकर कुलकर्णी शेळगावकर जिल्हाध्यक्ष शिवकुमार मुर्गे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्ता पाटील यांनी केले व आभार सुधाकर बुर्गे आणि मांडले.कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.